# ।। ब्रम्हचारी विठ्ठलराव को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:–  रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ ब्रम्हचारी विठ्ठलराव को संवाद लिखंते ।।

अथ ब्रम्हचारी विठ्ठलराव को समाद जलोद मे हुवो ।।

बस्ती त्याग बन मे आया ।। त्राटक ध्यान लगायो ।।
उलटी दिस्ट खेंच कर फेरो ।। वहा जा मे सुख पायो ।।
ब्रम्हचारी जी तोभी कच्चा ।। अे नाहक त्याग कियो तम घर को ।।
गुरू नही मिलिया सच्चा ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना ब्रम्हचारीने सांगीतले की,मी वस्तीचा त्याग केला आहे.मी वनात राहायला आलो आहे आणि वनात येऊन त्राटकचे ध्यान लावतो.दृष्टी उलटी खेचून भृगुटीत फिरवतो.या कारणाने वर भृगुटीत मला आनंद मिळतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी ब्रम्हचारीला सांगीतले की,तुम्ही वस्ती त्यागून वनात आले आहे,वनात त्राटक ध्यान लावतात.तेथे ध्यानाचे सुख घेतात.तरीही तुम्ही कच्चे आहात.रामजी प्राप्त करण्याकरीता कोणालाही घर संसाराचा त्याग करण्याचे काही कारण राहत नाही आणि तुम्ही घर संसाराचा त्याग केला आहे.याचा अर्थ तुम्हाला खरे गुरु मिळाले नाही.खरे गुरु मिळाले असते तर तुम्हाला तुमच्या गुरुने घरदाराचे त्यागन करुच दिले नसते.घटातच रामजी प्रगट करुन दिले असते ।।१।।

राम तुमारे हें घट माही ।। प्रेम प्रीत सूं पावो ।।
हट तो कियां राम नही रीजे ।। कोई मूरख समझावो ।।२।।

अरे ब्रम्हचारी राम सर्व व्यापी आहे.सर्व साधु संत तसेच वेद सांगतात.याचा अर्थच रामजी घटा घटात आहे.जेव्हा रामजी सर्व घटा घटात आहे तर तो तुमच्या ही घटात आहे.असा रामजी त्याच्याशी प्रेम प्रीत केल्यानेच प्राप्त होतो.तो राम ज्याने सर्व सृष्टी बनविली आहे. सर्वांचे घट बनविले,पाच तत्व बनविले आणि सर्वांना महासुख देतो.तो मनाचे किंवा तनाचे व तनाचा हट्ट करणे हे कोणी मुर्ख्याला खुटा करणे आहे.रामजी मुर्ख नाही.याकरीता ही रीत रामजीला प्रसन्न करण्याची रीत बनु शकत नाही. ।।२।।

ब्रम्हचारी भेद न पाया । अे नाहक त्याग कियो तम घर को । तन कूं बन किंऊं लाया ।।

ब्रम्हचारी तु घरात राहून घटात रामजी प्राप्त करण्याचा भेद प्राप्त केला नाही.घरात राहून घटातच रामजी प्राप्त करण्याचा खरा गुरु शोधून भेदातच रामजी प्राप्त करण्याचा खरा गुरु शोधून भेद प्रात करायचा होता.त्याच्या जागी बिना कारणच घराचा त्याग केला आणि तनाला वनात घेऊन आले.ब्रम्हचारी हे तन वनात का आणले घरात बसून घटातच रामजी मिळतील असा भेदी गुरु का नाही शोधला? ।।३।।

ब्रम्हचारी बुज्यो तम कोण मुद्रा मे रेता हो ।।

तब सुखराम जी महाराज बोलिया ।। चोपाई ।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**हे ब्रम्हचारी कहुँ में तोई ।। मुद्रा जे नर साजे सोई ।।**
**ज्यारे प्रेम उमंग नही आयो ।। वां मुद्रा मे मन लगायो ।।१।।**

ब्रम्हचारी बुज्यो तम कोण मुद्रा मे रेता हो ।। तब सुखरामजी महाराज बोलिया ।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना ब्रम्हचारीने विचारले की,आमण कोणत्या मुद्रेत राहतात तेंव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला बोलले की,हे ब्रम्हचारी ज्या मनुष्याच्या हंसाच्या घटात प्रेम उमंग आले नाही अश्या मनुष्याने ही मनाचा हट करुन मुद्रा साधण्या तन लावले आहे. ।।१।।

**जहां लग मुद्रा साझे कोई ।। तब लग नर बेगारी होई ।।**
**ब्रम्हचारी पद कदे न पावे ।। साझन हट मुढ कूं भावे ।।२।।**

अरे मनुष्य जो पर्यत मुद्रा साधनेत मन लावतात तोपर्यत ते मनुष्य बेगारीच राहतात. म्हणजे काळाच्या दु:खातच राहतात.अश्या मनुष्यांना महासुखाचे आनंदपद कधीही मिळत नाही.असे मनुष्य चतुर नसतात,मुर्ख असतात.जगात हट करुन साधना करणे हे मुर्ख मनुष्यालाच चांगले वाटते,असा हट करुन साधना करणे हे चतुर मनुष्याला कधीही आवड्त नाही ।।२।।

**मेरी मुद्रा तोय बताऊँ ।। उमग्यो प्रेम बहोत सुख पाऊँ ।।**
**सहेज समाध रात दिन होई ।। सूरत निरत को काम न कोई ।।३।।**

अरे ब्रम्हचारी मी तुला माझी मुद्रा सांगतो.मला घटातच रामजी मिळाल्याने माझ्या निजमनात रामजीशी प्रेम उमंग करुन येते.ज्यामुळे मला खुप सुख मिळते.अश्या रामजी सोबत सहजच माझी रात्रं दिवस समाधी लागलेली असते.मला मनाचा हट करुन मुद्रा साधणाऱ्या सारखे मुद्रा समाधी बनून राहण्याकरीता जसे सुरत निरतचा उपयोग नेहमी करावा लागतो.तसे मला समाधी लावण्यात सुरत निरतचा काही उपयोग ही करावा लागत नाही.(याकरीता मला सुरत निरतचे काही काम नाही.) ।।३।।

**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। गिगन मंडळ मे रेण हमारी ।।**
**ताळी लगे न तूटे कोई ।। मन पवना झूटा मिल दोई ।।४।।**

अरे ब्रम्हचारी ऐक–मी जगात वास करीत नाही.मी गगन मंडळात वास करतो.गगन मंडळात माझी(रामजी सोबत)टाळी लागली आहे.ती टाळी तुटत नाही.त्या टाळीला लावण्याकरीता मन व श्वास या दोघांचाही आधार चालत नाही.मन व श्वासाच्या आधाराने रामजीशी न तुटणारी टाळी लागेल,हे समजणे खोटे आहे.कारण मन व श्वासाच्या पोहचच्या पलिकडे रामजीचे पद आहे.ती टाळी हंसाच्या घटात प्रेम प्रीत उंमग आल्यानेच लागते. ।।४।।

**मन पवना को काम न कोई ।। कुदरत कळा घट मे होई ।।**

**ब्रम्हचारी आ कोई न पावे ।। ज्यां सुण रीत उलट चढ जावे ।।५।।**

हे ब्रम्हचारी–कुद्रतकला ज्याच्याने हंस घटातच उलटून गगणात चढून जातो ती रीत घटातच आहे.अशी कुद्रतकला जागृत करण्यात मन व श्वासांच्या साधनेचा उपयोग होत नाही.याकरीता मन व श्वासाच्या आधाराने साधना करणाऱ्याच्या घटात उलटून गगणात चढून जाण्याची रीत मिळत नाही. ।।५।।

**मुद्रा पांच हद मे होई ।। जो साझे ज्यां प्रेम न कोई ।।**
**करम करे ब्रम्हचारी सारा ।। सो पवन सुं पचणे हारा ।।६।।**

ज्या साधकांना रामजीशी प्रेम येत नाही ते पाच प्रकारची खेचरी,भुचरी,चाचरी,अगोचरी व उन्मुनी ह्या मुद्रा व मायाचे कर्मकांड करणारे साधक राहतात किंवा मायेचे कर्मकांड,वा पचून पचून श्वासाच्या आधाराने योग प्राप्तीचे साधना करतात.ते सर्व मनुष्य हदमध्ये म्हणजे होणकाळातच राहतात.ते अगम म्हणजे रामजीच्या देशात गगन मंडळात कधीही पोहचत नाही ।।६।।

**करम करे सो तन हट भाई ।। मुद्रा पाच मन हट माही ।।**
**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। सतशब्द की हे बिध न्यारी ।।७।।**

ब्रम्हचारी ऐक,मायेचे कर्मकांड हे तनाचे हट्ट आहे.तर पाच मुद्रा साधणे हा मनाचा हट्ट आहे.सतशब्दाची प्राप्ती,सतशब्दाची विधी तन हट्ट आणि मन हट्टापेक्षा वेगळी आहे. सतशब्दाची प्राप्ती हंसाच्या उरातून प्रेम उमंग आल्यानेच होते. ।।७।।

**केई उन्मुनी सूं मन लगावे ।। केई खेचरी सु हट चावे ।।**
**केई चाचरी साझे भाई ।। केई भूचरी गहे जन आई ।।८।।**

ब्रम्हचारी(काही)साधक उन्मुनीत मनाला लावतो.तर काही खेचरीत मनाचा हट्ट करतात.तर काही चाचरीची साधना करतात तर काही भुचरीला धारणा करतात,तर काही अगोचरीत मनाचा हट्ट करतात. याप्रकारे मनाचा हट्ट करुन पाच प्रकारची मुद्रेची साधना करतात. ।।८।।

**कहे सुखराम अगोचर आगे ।। ज्हां लग ओ मन जायर लागे ।।**
**मन छिट कावे जब बिध भाई ।। ब्रम्हचारी रेहे रीत न काई ।।९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात की,ज्याचे निजमन(हंस निजमन) अगोचारीच्या पुढे जाऊन लावतो.अश्या संताचे निजमन मायेच्या मनाच्या हट्टची(मन) सर्व मुद्रा साधण्याच्या विध्या त्यागून देतो.याकारणाने अश्या संतामध्ये मनाच्या हटची मुद्रा साधण्याच्या विध्या राहतच नाही. ।।९।।

**मुद्रा पांच जोग के माही ।। भक्त जोग मे मुद्रा नाही ।।**
**सप्त भोमका सब जन गावे ।। से जोगारंभ मांय नही पावे ।।१०।।**

पवन योगात(श्वासाच्या योगाने)ह्या पाच मुद्रा आहे.जसे की,कुद्रतकलेच्या कैवल्य भक्तीयोगात ह्या पाच मुद्रा नाहीत.म्हणजे पाच मुद्रांनी पवन योगाची प्राप्ती होते.परंतु या पाच मुद्रांनी कैवल्य भक्तयोगाची कधी प्राप्ती होत नाही.जसे काही जण सप्तभोमकाची साधना करतात.ते सप्तभोमकाची विधी पाच प्रकारच्या मुद्रा साधकाच्या योग प्राप्तीच्या विधीमध्ये नाही.तसेच पवन योगात ज्या पाच मुद्रा आहेत.त्या मुद्रा कुद्रतकलेच्या भक्तयोगात नाही. ।।१०।।

**द्वादस मंत्र सन्यास बखाणे ।। सो बेराग हिर्दे नही आणे ।।**
**गीता सकळ अेककर गावे ।। गायत्री सब बेद बतावे ।।११।।**

संन्याशी द्वादश मंत्राचा जप करतो.असे द्वादस मंत्राचा जप करणे हे वैरागी आपल्या ह्रदयातही आणत नाही.याप्रकारे कैवल्य भक्त योगीच्या मनात योगारंभीच्या सारखी मुद्राची(मुद्रेची)साधना करणे हे येत नाही.गीतेमध्ये कृष्ण सर्व चल अचल मध्ये एकमात्र आहे असे गातो.तर ब्रम्हा सर्व वेदांमध्ये गायत्रीच सर्व काही आहे असे गातो.ज्याप्रकारे गीतेमध्ये कृष्ण एकमात्र आहे असे सांगीतले आहे.तसेच वेदांमध्ये गायत्री सर्व काही आहे हे सांगीतले आहे.याप्रकारे पवन योग पाच मुद्रा ह्या सर्व काही आहे,हे गातो. ।।११।।

**पवन जोग क्रम कर साजे ।। भक्त जोग करमा सु लाजे ।।**
**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। प्रमभक्त युं सब सुं न्यारी ।।१२।।**

याप्रकारे पवनयोग मायेचे कर्म करुन साधले जाते.तर भक्तियोग मायेचे कर्म करुन साधले जात नाही.याप्रकारे परमभक्तियोग हा पवनयोग,सप्तभोमका,द्वादस मंत्र,गीता, गायत्री साधना यांच्यापेक्षा वेगळा आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे. ।।१२।।

**गावे बजावे नाचे कोई ।। सो नवध्या भक्त अंग कहुं तोई ।।**
**बाचे सुणे अर्थ जो कर हे ।। पूजा अर्चा पात सिर घर हे ।।१३।।**

गाणे वाजवणे,नाचणे,वाचणे,ऐकणे,अर्थ करणे,पुजा अर्चना करणे,पान फुल पाणी चढविणे हे सर्व नवविद्या भक्तीचे अंग आहे. ।।१३।।

**बिसन क्रम अे नाव कहावे ।। नव प्रकार सकळ जन गावे ।।**
**जोग कर्म इन सुं हे न्यारा ।। पवन जोग का ओर बिचारा ।।१४।।**

सर्व वैष्णव साधु हे नऊ प्रकारचे कर्म करुन विष्णू भक्ती साधतात.तर ब्रम्हाचे सांख्ययोगी, सांख्ययोगीचे कर्म करुन साधतात.परंतु हा सांख्ययोग कर्म वैष्णव कर्मापेक्षा वेगळा आहे.याप्रकारे शंकराचा पवनयोग नऊ प्रकारची विष्णू भक्ती व ब्रम्हाचा साख्ययोग या दोघांपेक्षा वेगळा आहे.जसे विष्णू,ब्रम्हा,शंकर यांच्या भक्त्या वेगवेगळ्या आहेत.त्या

प्रकारे परम–भक्ती या सर्व,विष्णू भक्ती,ब्रम्हाची भक्ती तसेच शंकराच्या भक्तीपेक्षा वेगळी आहे.।।१४।।

**आ हद बेहद की क्रिया होई ।। दोन्या परे न जावे कोई ।।**
**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। निजनाव की भक्ति न्यारी ।।१५।।**

पाच मुद्रा,सप्तभोमका,द्वादस मंत्र,गायत्री मंत्र,विष्णू भक्ती,सांख्ययोग,पवनयोग या सर्वाच्या कर्म किया हद बेहदच्या पोहचच्या आहेत.हद बेहदच्या पलिकडे पोहचण्याच्या नाहीत.परंतु निजनावाची भक्ती हद बेहदच्या पलिकडे अगम मध्ये जाण्याची आहे. याकरीता निजमनाची भक्ती सर्व कर्म क्रियेपेक्षा वेगळी आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात ।।१५।।

**दुर्वासा तप जोग कमाया ।। गोतम कपल उद्यालक भाया ।।**
**बिश्वामिंत्र साज्यो सोई ।। निजनाम की गम न कोई ।।१६।।**

दुर्वासा,गौतम,कपील,उद्दालक,विश्वमित्र यांनी मन व तनाचे तप करुन पवनयोग प्राप्त केला परंतु या कोणालाही निजमनाचा अनुभव झाला नाही. ।।१६।।

**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। नही मानो तो वसिष्ट मुनिधारी ।।**
**निजनांव वशिष्ट मुनि पाया ।। ज्या बेद कर्म सबही छिटकाया ।।१७।।**

ब्रम्हचारीला आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जर तु माझ्या गोष्टीला मानीत नाही.तर ऐका,ही माझी निजनामाची विधी वशिष्ठमुनीने धारण केली.वशिष्ठ मुनीने दुर्वासा,गौतम,कपील,उद्दालक,विश्वमित्रासारखे वेद कर्म केले नाही.वशिष्ठ मुनीने वेद कर्म त्यागून निजनामाची विधी धारण करुन निजनामाचा अनुभव केला. ।।१७।।

**सुखदेव प्रेम प्रीत मे भीना ।। बिना नांव कोई क्रम न कीना ।।**
**जनक बदे राजा सुण भाई ।। निजनांव की भक्ति पाई ।।१८।।**

जसे वशिष्ठ मुनी वेदाचे कर्म त्यागुन निजमनात प्रेम,प्रितने रंगुन गेला.(निजनावा शिवाय आणखी कोणती विधी केली नाही.)तसेच सुखदेव व राजा जनक विदेही ही निजनामात भिनले आणि निजनावाची भक्ती करुन निजनाम प्राप्त केले. ।।१८।।

**तां परताप सुखदेव भीना ।। बिना नांव कोई क्रम न कीना ।।**
**संक्राचार्ज के पत आई ।। तब रिष कर्म सब दिया बहाई ।।१९।।**

वेद व्यासाचा पुत्र सुखदेव जनक राजाच्या प्रतापाने निजनामाची भक्तीमध्ये रंगून गेला. सुखदेव नाम जपाशिवाय दूसरे वेदाचे कोणते ही कर्म केले नाही.याप्रकारे शंकराचार्याला जेंव्हा निजमनाचा प्रताप समजला तेंव्हा शंकराचार्याने ऋषी लोकांचे सर्व वेद कर्म सोडून दिले.।।१९।।

**हस्तामल कुं दत्त समझायो ।। तब निजनांव को प्रचो आयो ।।**

**जोगी तपी पिंडत रिष ध्यानी ।। पच पच मुवा बोहोत बिध आनी ।।२०।।**

योगी,तपस्वी,पंडीत,ऋषी,ध्यानी हे सर्व हस्तामलला समजविण्यात वेदाच्या अनेक विध्यांचा उपयोग करुन खपून गेले,मरुन गेले परंतु हस्तामलने या सर्वाची गोष्ट मानली नाही. ।।२०।।

**हस्तामल मानी नही काई ।। बेद क्रम काळ मुख माई ।।**
**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। प्रेम नाव की भक्ति न्यारी ।।२१।।**

हस्तामलला काळाच्या मुखातून निघण्याची विधी हवी होती.त्याला वेदाच्या सर्व कर्माच्या विध्या काळाच्या सुखातच आहेत असे त्याला ज्ञानाने समजत होते,जेव्हा हस्तामलला दत्तात्रयाने निजनामाचा पराक्रम समजावला व त्याला निजनाम हे काळाच्या पलिकडे कसे आहे,याचा परचा आला तेंव्हा हस्तामल निजनामात रंगला.याप्रकारे प्रेमाने प्रगट होणारी निजनामाची भक्ती मनाच्या व तनाच्या हट्टाच्या भक्तींपेक्षा वेगळी आहे.असे ब्रम्हचारीला आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।२१।।

**हणुमान सीता रघुराई ।। निजनाव की वां गत पाई ।।**
**लिछमण कूं सीया समझायो ।। निजनाव प्रेम तब पायो ।।२२।।**

हनुमान,सीता,रघुराजा निजनामाची गती मिळाली होती.सीतेने लक्ष्मणाला निजनामाची विधी सांगितली तेंव्हा लक्ष्मणाला निजनामाची प्रेम झाले.निजनामाचा परचा लक्ष्मणाला घटात मिळाला. ।।२२।।

**बालमिंक नांव बिध पाई ।। बेद करम कीया नही भाई ।।**
**बालमीक श्रगरो होई ।। ज्यां बेद क्रम कीयो नही कोई ।।२३।।**

रामचंद्राच्या १०,००० वर्ष जन्माच्या आधी त्रेतायुगात वाल्मीकने(जो आधी रत्नाकर डाकू होता)निजनामाची विधी प्राप्त केली.या वाल्मीकने वेदाचे कोणतेही कर्म केले नाही.या प्रकारे द्वापार युगात कृष्णाच्या वेळी वाल्मीक सर्गराने भक्ती प्राप्त केली.या वाल्मीक सर्गराने ही वेदाचे कोणते ही कर्म केले नव्हते. ।।२३।।

**निजनाव प्रेम लिव लाया ।। ज्यां पंचायन संख बजाया ।।**
**सब हेरान हुवा रिष जोगी ।। मधम जात सकळ रस भोगी ।।२४।।**

वाल्मिकची लीव व प्रेम निजनामात होती.ज्याच्या पराकमाने वाल्मिकने पांड्वांच्या राजसूय पंचायन शंख वाजविला.हा पंचायन शंख वाजविण्याकरीता वेदातील प्रविण मोठ मोठे ऋषी व योगी हैराण झाले,परंतु पंचायन शंख वाजवू शकले नाही.ज्याने कधी वेदांचे पठण केले नाही,जो मध्यम जातीचा होता व संसारातील सर्व रसांच्या भोगात रचमच होता. परंतु सोबत निजनामात रंगला होता. अश्या वाल्मिकने निजनामाच्या प्रतापाने पांड्वांचे राजसुय यज्ञात पंचायन शंख वाजविला.

साधु दर्शन जावता ।। जेता घरिये पाव ।। पेंड पेंड अश्वमेध जिग्य ।। फळे जो मनका भाव ।।

द्रोपदी म्हणाली,मी येथे येण्यात जितके पाऊल टाकले आहे,तितके अश्वमेध यज्ञ होऊन गेले.त्याच्यातील एक अश्वमेध यज्ञाचे फळ,आपल्याला देऊन दिले.बाकी माझ्याजवळ उरलेले राहीले.तेंव्हा तो वाल्मिक उठून यांच्या सोबत आला.नंतर तेथे स्वत: द्रोपदीने त्याच्या भोजनाकरीता सहा प्रकारच्या रसाचे(खारट,आंबट,तिखट, फिकट,गोड आणि अनुप)व्यंजन अनेक प्रकारचे बनविले,त्याच्या नंतर वाल्मिकला पाटावर बसवून सोन्याच्या ताटात जेवण वाढले तेंव्हा वाल्मिकने सर्व पदार्थ एका जागी मिश्रण करुन,त्याच्यातील पाच घास घेतले.(आंमत्रण देते वेळी पाच घास घ्या असे भीमाने सांगीतले होते.याकरीता त्याने सर्व मिश्रण करुन पाच घास घेतले.)तेंव्हा द्रोपदीला क्रोध आला की,मी इतके चांगले पदार्थ बनविले आणि त्यांच्या वेगवेगळा काही स्वाद न घेता याने मिश्रण(एकत्र करुन दिले.)करुन दिले.अर्थात जातीचा श्वपच आहे ना! येथे या प्रकारे रसात काय समजेल?हलकी(निच)जातीचाच ठरला ना! असा द्रोपदीने मनात भिन्न भाव मनात आणला.त्याचे(वाल्मिकचे)पाच घास घेतल्यावर पंचायन शंख वाजला तर ठिक,परंतु थांबत-थांबत(कण्हत-कण्हत)वाजला.तेंव्हा श्रीकृष्ण चक्र सुदर्शन घेऊन पंचायन शंखावर धावला व बोलला,तुझे तुकडे-तुकडे करुन टाकील.आता संतांनी भोजन केल्यावर जोरात का नाही वाजला?तेंव्हा शंख बोलला,की हे देव,मला दोष देवू नकोस,हा दोष द्रोपदीत आहे.हिने(द्रोपदीने)मनात उच्च आणि निचचा भिन्न भाव आणला.(वाल्मिकला द्रोपदीने निच समजले याकरीता मी कण्हत-कण्हत वाजलो.या वाल्मिक ने ही वेदाचे कोणते कर्म केले नव्हते.)।।२४।।

**ज्यां आयां संख बाज्यो सोई ।। रिष पच मुवा बज्यो नही कोई ।।**
**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। नाव जोग प्रीत हर प्यारी ।।२५।।**

असे वाल्मिकने पांड्वांच्या राजसुय यज्ञात आल्याकारणाने पंचायन शंख वाजला.अन्य ऋषी,मुनी,योगी पचून पचून खपून गेले,थकून गेले परंतु कोणाकडून ही शंख वाजला नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात की,ज्याला निजनावाच्या योगाशी प्रिती आहे,तोच हरीला प्रिय आहे.हे पांड्वांच्या राजसुख यज्ञाच्या परच्यावरुन समजा.।२५।

**राज जोग ओ कहिये भाई ।। नव जोगेश्वर रहया समाई ।।**
**सोम रिष ओ जोग कमायो ।। सो जन पछे नाम टे गायो ।।२६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात की, मी सांगत आहे तो योग सर्व योगाचा राजा आहे.याकरीता याला राजयोग म्हणतात.या राजयोगात नऊ जोगेश्वर मगन झाले होते.या राजयोगाला आधी सोमऋषीने प्राप्त केले होते तर आता आता

कलीयुगात नामदेवने प्रगट केले. ।।२६।।

**संत अनेक चडया गढ सोई ।। कहाँ लग गिण बताऊं तोई ।।**
**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। निजनांव बिध सब सूं न्यारी ।।२७।।**

याप्रकारे अनेक संत दहाव्याद्वाराच्या गडावर चढून गेले.यांना मोजून ही सांगू तर कोठपर्यंत सांगु.आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे की, याप्रकारे ज्या निजनामाच्या आधारे संत दहाव्याद्वाराच्या गडावर चढून गेले.ती विधी ऋषी व योगींच्या कर्मापेक्षा वेगळी आहे.ती विधी तुम्ही धारण करा. ।।२७।।

**नवध्या भक्त रीत सो होई ।। जोग क्रम न्यारा क्हुं तोई ।।**
**तीजी रिख रीत सुण भाई ।। चोथी बिध सन्यां स्यांपाई ।।२८।।**

जगात अनेक भक्त्या आहेत.जसे नवद्याभक्तीची एक रीत आहे.तर योगकर्मीची नवद्या भक्तीपेक्षा वेगळी रीत अशी दूसरी रीत आहे.या दोघांपेक्षा ऋषींची तिसरी वेगळी रीत आहे.तर संन्यासीची या रीतीपेक्षा वेगळी अशी चौथीच रीत आहे.याप्रकारे प्रेमयोगींची या चारींपेक्षा वेगळी रीत आहे. ।।२८।।

**प्रेम जोग ऊंच पद पावे ।। तो हट जोग सब ही छिटकावे ।।**
**हट जोग सो बेद बताया ।। नवध्या प्रेम भक्त लग भाया ।।२९।।**

असे प्रेमयोगी,प्रेमयोग साधुन या चारींपेक्षा वेगळे असे अगम देशाचे उंच पद प्राप्त करतात. असे प्रेमयोगी वेदात सांगीतलेले हठयोग,नवद्याभक्ती तसेच प्रेमभक्ती पर्यतची सर्व अन्य मायेच्या भक्त्या प्रेमभक्ती प्राप्त करण्यास सोडून देतात. ।।२९।।

**ग्यान बिग्यान कही सब आणी ।। परम हंस बदेह बखाणी ।।**
**कूंची क्रम जोग की सारी ।। मंत्र ध्यान नव भक्त बिचारी ।।३०।।**

वेदात परमहंस व विदेह ज्ञान विज्ञानाचे वर्णन(बखाण)केले आहे.याप्रकारे योगाभ्यासाची कूंची म्हणजे चाबी सर्व प्रकारचे योग,मंत्र,ध्यान नवद्याभक्ती या सर्वाचा विचार वेदाने गायला आहे. ।।३०।।

**अे तो सकळ बेद ले गाया ।। नाना बिधकर आण सुणाया ।।**
**पण छुछम बेद बेदां मे नाही ।। सो पावे सो सत्त क्हाही ।।३१।।**

याप्रकारच्या सर्व नाना विधीच्या भक्त्या वेदाने सांगितल्या आहेत.परंतु सुक्ष्मवेदाची भक्ती वेदाने सांगीतली नाही.ही सुक्ष्म वेदाची भक्ती जो प्राप्त करतो,तो काळाच्या मुखातून मुक्त होऊन सत्त पदाला जातो. ।।३१।।

**बेद भेद तीनुं जुग बांधा ।। छुछम बेद बेदा नही लाधा ।।**
**कण आयां कूं कसदे बावे ।। यूं छुछंम बेद ज्हां बेद न गावे ।।३२।।**

वेद,भेद,लबेद या तीन भक्तींमध्ये जग रंगून गेले आहे.सुक्ष्मवेदाची भक्ती वेदात नसल्याने

जगाने ती धारण केली नाही.ज्याला सुक्ष्मवदोची भक्ती मिळाली आहे तो वेद,भेद, लबेदची भक्ती करणे त्यागून देतो.जसे शेतकरी कुटारातून अन्न काढून घेतो आणि कुटार फेकून देतो.ठिक त्याचप्रकारे सुक्ष्म वेदाचा भेद,वेद,भेद,लबेदची कर्म क्रियांच्या भक्त्या त्यागून देतो. ।।३२।।

**बेद भेद केहेता हे कोई ।। से सुण जोग कूंची सब होई ।।**
**बेद भेद कर सोभा चावे ।। क्रम जोग इधका कर गावे ।।३३।।**

जे जे वेद भेदाचे ज्ञान सांगतात ते कर्मयोग साधने पर्यतची कुंची म्हणजे चाबी आहे. ज्ञानी कर्मयोगाला उच्च समजून कर्मयोगाची व वेद भेदाची शोभा करतात. ।।३३।।

**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। छुछम बेद बिध इन सूं न्यारी ।।**
**गोरख भर्तरी गोपीचंदा ।। जोगारंभ साज हुवा बंदा ।।३४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात की,सुक्ष्मवेद या वेद भेदाच्या कर्मयोगाहून वेगळा आहे.वेद,भेदाच्या कर्मयोगाची साधाना करुन गोरख,भर्तरी,गोपीचंद हे जगात वेद भेदाचे बंदे मानले गेले. ।।३४।।

**कूंची करम साज देहे झाडी ।। पवन दियो गिगन पर चाड़ी ।।**
**अे तो सिध हुवा जुग माही ।। देही रखी काळ बस नाही ।।३५।।**

गोरख,भर्तरी,गोपीचंदने कर्मयोगाची कुंची(किल्ली)साधून देहाची पाहणी केली आणि श्वासाला भृगुटीत चढवून दिले.हे असे मायेच्या कर्मयोगाच्या साधनेने जगात सिध्द होऊन गेले.सिध्दाईच्या बलाने यांनी देहाला काळाच्या वशपासून वाचवून घेतले व महाप्रलयापर्यंत देहाला अमर करुन घेतले. ।।३५।।

**चंद सुर धरण मिट जावे ।। तहाँ लग काळ निकट नही आवे ।।**
**पण ने छे सुण जंम बस होई ।। म्हा प्रळा मे बचे न कोई ।।३६।।**

या गोरखनाथ भर्तरी आणि गोपीचंद जवळ जोपर्यंत चंद्र सुर्य धरती प्रलयात जात नाही.तोपर्यंत काळ जवळ येत नाही.परंतु महाप्रलयात चंद्र,सुर्य,(पृथ्वी)धरती मिटते. त्या दिवशी हे योगी ही काळाच्या वश होऊन मिटून जातात. याच्यात काही फरक होत नाही. ।।३६।।

**युं छुछम बेद बीन झूटा भाई ।। प्रम मोख हंस कोऊं न जाई ।।**
**कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। बेद भेद ऊला बोहारी ।।३७।।**

याप्रकारे सुक्ष्मवेद सोडून वेद,भेद,लबेदने परममोक्षात कोणी ही जाऊ शकत नाही. याकरीता सुक्ष्मवेदा शिवाय परममोक्षात जाण्याकरीता वेद,भेद,लबेदचे आधार खोटे आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे.की वेद भेदाचे व्यवहार म्हणजे आधार परममोक्षाचे इकडे होणकाळा पर्यतचे पोहचलेच आहे. ।।३७।।

रिष ध्रम ओ कहिये भाई ।। इंद्रिया दवन तप जुग माई ।।
मंत्रादिक गायत्री साजे ।। देव लोक मे जाय बिराजे ।।३८।।

हा(वेद)ऋषी लोकांचा धर्म आहे,इंद्रियाचे दमन करणे,जगांत हेच दाखविले आहे, मंत्रादिक साधन करणे गायत्रीची साधना करणे.

ओम् भूर्भुवः संः तत्सं वि तुर्ववैण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयांत ।।

या मंत्राची साधना करतात,ते सर्व देवलोकांत जाऊन राहतात. ।।३८।।

ऋषी लोकांचा धर्म तनाचा तप करुन इंद्रियांचे दमन करणे व जगात राजा सारखे फळ प्राप्त करण्याचे आहे किंवा याच्या पुढे गायत्री सारखे मंत्रादिकाची साधना करुन देवतांच्या लोकात जाऊन विराजमान करणे येथपर्यतच्या पोहचचे आहे. ।।३८।।

अेसी पोंच रिषां की होई ।। बिस्न लोक लग पोंचे सोई ।।
तेज पुंज की काया पावे ।। मन चावे सोई कर्र बतावे ।।३९।।

तर काही ऋषी लोक(लोग)नवविद्याची भक्ती साधुन विष्णु लोकात पोहचतात.विष्णूचे देवता लोकात तेजपुंजची काया प्राप्त करतात आणि त्यांचे मन(मन)इच्छीत ते परचे चमत्कार करुन सांगतात ।।३९।।

अेसी पोंच रिषां की होई ।। सुख दुःख संग मिटयो नही कोई ।।
छुछम बेद रिष किणीहन पायो ।। प्रममोख को भेद न आयो ।।४०।।

तेजपुंजची काया प्राप्त करणे व मनाला आवडेल ते परचे चमत्कार करुन दाखविणे अशी पोहच ऋषी लोग प्राप्त करुन घेतात.तरीही या ऋषींना सुखा सोबत काळाचे दुःख भोगावे लागते.या ऋषींचे काळाचे दुःख मिटत नाही.या ऋषींना सुक्ष्मवेद न मिळाल्याने परममोक्षाचा भेद मिळाला नाही.यामुळे यांचे सुखा सोबत दुःख भोगणे मिटले नाही. ।।४०।।

अवागवण रेहेत नही हूवा ।। देव लोक मे सब रिष जूवा ।।
कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। यूं छुछम बेद बिना बिधान कारी ।।४१।।

हे सर्व ऋषी मृत्युलोक सोडून देवलोकात गेले परंतु आवागमन म्हणजे जन्मने-मरणे रहीत झाले नाही.याप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे की, सुक्ष्म वेद,बिन भेद,वेद,लबेदच्या सर्व विध्या आवागमनापासून मुक्त होण्याकरीता काही कामाच्या नाही. ।।४१।।

नवद्या अंग नव बिध लावे ।। तो चार मुक्त लग पदवी पावे ।।
आवागवण मिटे नही कोई ।। प्रममोख लग पोहच न होई ।।४२।।

काही लोक नवविद्या भक्तीचे नऊ प्रकारचे जे अंग आहेत ते नऊच्या नऊ प्रकारच्या भक्त्या साधुन वैकुंठची चार प्रकारच्या सालोक्य,सामीप्य,सायुज्य,सारुप पर्यतची विष्णूची

लोकाची पदवी प्राप्त करतात.परंतु या नवविद्या भक्तीच्या आधाराने आवागमन मिटत नाही. कारण या नवविद्या भक्तीच्या या चार मुक्तीच्या पलिकडील परममोक्षात पोहचण्याची पोहच नाही.।।४२।।

**क्हां लग बरण बताऊं भाई ।। अेक अरथ मे समजो आई ।।**
**बेद भेद हद बेहद तांई ।। छुछम भेद अगम कूं जाई ।।४३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे की,मी तुला अनेक दृष्टांत सांगीतले.आणखी ही अनेक दृष्टांत सांगु शकतो परंतु किती ही दृष्टांत सांगीतले तरी ही एकच समज मिळेल की वेद,भेद,लबेदच्या भक्तीची पोहच हद बेहद पर्यतच आहे. सुक्ष्म भेदाची पोहच हद बेहदच्या पलिकडे अगम पर्यतची आहे.याकरीता अगम देशात जायचे आहे.तर वेद,भेद,लबेदच्या पलिकडे सुक्ष्मवेदला धारण केले पाहिजे हे एका अर्थात समजून जायला हवे. ।।४३।।

**छुछम बेद सूं सब कुछ होई ।। मुख सूं बोल कहे जुग लोई ।।**
**मन पवना चेतन तत्त सारा ।। सुर्त निरत सबही बिस्तारा ।।४४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे की,सुक्ष्मवेदाच्या आधारानेच ३ लोक १४ भवन व ३ ब्रम्हचे १३ लोक बनले आहे.मनुष्याचा देह बनला आहे. मनुष्याचे बोलणारे मुख बनले आहे.मायेचा वेद,भेद,लबेद बनले आहे.मनाचा देह बनला आहे.देहात श्वास थांबला आहे.देहात जीव चेतन तत्त थांबले आहे.सुरत निरतचा विस्तार झाला आहे.याप्रकारे शब्द,स्पर्श,रुप,रस,गंधचा सर्व विस्तार सुक्ष्मवेदाच्या आधाराने बनला आहे. ।।४४।।

**बावन हरफ छुछम ने कीया ।। अनंता नांव बेदाँ ने दीया ।।**
**अनंत नांव बावन के माही ।। बावन हर्फ अेक मे जाही ।।४५।।**

५२ शब्द सुक्ष्म वेदाने केले आहे.या ५२ अक्षराच्या आधारानेच वेदाने अनंत नाव दिले आहे.हे अनंत नाव ५२ अक्षरांच्या आधाराने बनले आहे.हे ५२ अक्षर एक शब्द म्हणजे श्वासाच्या आधाराने आहे हे श्वास सुक्ष्म वेदाने केले आहे. याप्रकारे वेद,भेद,लबेद व श्वास सुक्ष्म वेदाच्या आधाराने बनले आहे. ।।४५।।

**अेक नांव सुंइ छुछम न्यारा ।। वो पावे सो सत्त बिचारा ।।**
**ओर सकळ साधु रिष जोगी ।। तीन लोक लग माया रस भोगी ।।४६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात की,सुक्ष्म वेद हे एक नाव म्हणजे श्वासापेक्षा वेगळे आहे.हा सुक्ष्म वेद जो प्राप्त करेल तोच सत्तचा आनंद घेणारा सतस्वरुपाचा निवासी बनेल.बाकी सर्व साधु, ऋषी,योगी,मायेचे रस भोगणारे ३ लोक १४ भवनाचे माया रस भोगी राहतील. ।।४६।।

छुछम बेद मूळ जिण पाया ।। बेद भेद डाळा छिटकाया ।।
कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। यूं छुछम बेद की हे बिध न्यारी ।।४७।।

सर्वाचे मुळ सुक्ष्मवेद ज्याने प्राप्त केला.त्याने वेद भेदाच्या फांद्या सोडल्या आहेत. आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात की,याप्रकारे सर्व वेद भेदाचे मूळ सुक्ष्म वेद आहे.त्याची विधी व पोहच सर्वात वेगळी आहे. ।।४७।।

बेद भेद तम कहो ब्रम्हचारी ।। कोण बेद लग पोंच तुमारी ।।
बेद लभेद भेद सो होई ।। छुछम बेद न्यारा कहुं तोई ।।४८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी ब्रम्हचारीला विचारले की तुम्ही वेद,भेद,नेहमी नेहमी सांगतो तर तुमची कोणत्या वेदापर्यंत पोहच आहे हे सांगा.तुम्ही जो वेद,भेद, लबेद सांगतात यांच्यापेक्षा मी जो सुक्ष्म वेद सांगत आहे तो वेगळा आहे हे समजा ।।४८।।

च्यार बेद पिंडत अे गावे ।। आतम ध्रम बाय सो क्रावे ।।
मंत्रादिक तामे ऋचा होई ।। करामात वां मे कहुँ तोई ।।४९।।

चार वेद पंडीत गातात.आत्म्याचा धर्म वायु म्हणजे श्वास आहे असे सांगतात आणि त्याची साधना करावयास लावतात व भृगुटीत श्वास चढवणिचे सांगतात किंवा काही पंडीत वेदातील मंत्रादिक व ऋचाची साधना करायला लावतात.या साधतांनी करामत जागृत करायला लावतात. ।।४९।।

अें दोवुं लभेद उड़ाया ।। करामात इधकी कांहा भाया ।।
अेक जन धरम सूं बाधो आवे ।। काचे कळ से बेद बोलावे ।।५०।।

वेद व भेद दोघांच्या करामतीचा पराक्रम लबेद ने उड्वून दिला तर वेदाची करामत अधिक प्रतापी कोठे राहीली त्याचा एक दृष्टांत आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी ब्रम्हचारीला दिला की,एक वेळा जैन धर्मवाल्याचा वैदिक पंडीत व भेदाचे योगीशी वाद विवाद झाला तेंव्हा जैन धर्मीने एक कच्चा कलश बनविला व त्या कलशापासून वेद उच्चारण करविले. ।।५०।।

ने:चे कळस कहे आबाणी ।। सिव ध्रम झूट जेन सत्त प्राणी ।।
ज्हाँ संक्राचार्ज व्हाँ चल आया ।। गधे पुंद मुख बेद बोलाया ।।५१।।

तो कलश जैन धर्म सत्य आहे आणि शिवधर्म खोटा आहे,असा म्हणू लागला.चालत चालत जैनसाधु वाद विवादासाठी शंकराचार्याजवळ चालत आला.शंकराचार्यांनी गाढवाच्या शेपटीने वेदाची करामत करुन त्या कलशाचा आवाज जैन धर्म सत्य आहे आणि शिव धर्म खोटा आहे हे बंद करण्याचा प्रयत्न केला, परंतु वेदाच्या करामतीचा जोर लागला नाही. ।।५१।।

तो भी कळस कहे आ बाणी ।। जेन ध्रम साचो सुण प्राणी ।।
तब संक्राचार्ज मंत्र संभाया ।। तो भी कळस हटे नही भाया ।।५२।।

गाढवाच्या शेपटीने उच्चारण केल्याने ही कलशाचे जैन धर्म सत्य आहे आणि शिवधर्म खोटा आहे.ही वाणी बोलणे बंद झाले नाही.शंकराचार्याने भारीहून भारी वेदांच्या मंत्राचे गाढवाच्या शेपटीने उच्चारण करविले तरी ही कलशापासून जैन धर्म सत्य आहे आणि शिव धर्म खोटा आहे ही वाणी बोलणे थांबले नाही. ।।५२।।

जब लबेद संमाळयो आणी ।। तब चुपकळस ना बोले बाणी ।।
कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। बेद लभेद की यूं बिध न्यारी ।।५३।।

नंतर शंकराचार्याने गाढवाच्या शेपटीने वेदाच्या मंत्राची करामात सोडून आपल्या तोंडाने लबेदचे उच्चारण केले तेंव्हा तो कलश चुपचाप राहीला व कलशने जैने धर्म सत्य आहे आणि शिवधर्म खोटा आहे,ही वाणी बोलणे बंद करुन दिले.याप्रकारे वेदाच्या करामतीने व भेदाच्या योगाने लबेदची करामात पराक्रमी आहे हे सिध्द झाले.ज्याप्रकारे वेद,भेद, लबेद यांचा पराक्रम वेग-वेगळा आहे.त्याप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे.की सुक्ष्म वेदाचा पराक्रम या सर्वापेक्षा वेगळा आहे. ।।५३।।

अब छुछम बेद भेद युं होई ।। श्रुतग्यान बिन लखे न कोई ।।
क्यां ग्रज सरे नही कोई ।। मतग्यान अंध सुण होई ।।५४।।

सुक्ष्म वेद याप्रकारे सर्वात प्रतापी आहे याच्या शिवाय आवागमनातून काढण्याची गरज पूर्ण होत नाही.या वेद,भेद,लबेद व सुक्ष्म वेदाच्या पराक्रमाचा श्रृतज्ञानी असेल म्हणजे ज्ञानाच्या न्यायाने समजणारा असेल तोच समजेल.दूसरा मतज्ञानी जो ज्ञानाच्या न्यायाने समजण्यात आंधळा राहतो(असतो)तो समजणार नाही. ।।५४।।

छुछम बेद बसेष्ट मुनि पायो ।। बिश्वामित्र भेव संभायो ।।
ईन के अड़ी पड़ी जब भाई ।। चूको न्याव सेस पे जाई ।।५५।।

हा सुक्ष्म वेद त्रेतायुगात वशिष्ठ मुनीने प्राप्त केला होता.त्या वशिष्ठापासून विश्वामित्राने सुक्ष्मवेदाचा भेद धारण केला.या वशिष्ठ व विश्वामित्राची जेंव्हा आढी पडली.तेंव्हा शेषाजवळ जाऊन विश्वामित्राने न्याय करविला. ।।५५।।

हाऱ्यो बेद जप तप सारो ।। जीत्यो छुछम नाव बिचारो ।।
ब्यास बेद क्रिया सब गाई ।। छुछम बेद नेःचे नही आई ।।५६।।

तेथे शेषाच्या न्यायगृहात विश्वामित्राजवळ ६०,००० वर्षाचे जप तप या सर्वाचा पराक्रम हारुन गेला आणि वशिष्ठ मुनीच्या एका पलाची सुक्ष्म नामाच्या संगतचा पराक्रम जिंकून गेला.दुसरा दाखला वेदव्यासाचा आहे.वेद व्यासाजवळही वेदाच्या क्रियांची करामात होती, परंतु सुक्ष्मवेदाचा पराक्रम नव्हता. ।।५६।।

आ पारख उण दिन सुण होई ।। ऊभा ब्यास वार क्हुं तोई ।।
पार गूजरी आवे जावे ।। छुछम बेद वां पारख आवे ।।५७।।

ही परीक्षा त्या दिवशी झाली ज्या दिवशी वेद व्यासाला गुजरी सोबत यमुना पार करायची होती.गुजरी सुक्ष्म वेदाच्या आधाराने विना नावेने यमुना नदीवर धरती सारखी येत जात होती.गुजरीने वेद व्यासाजवळ हीच कला आहे,हे समझून यमुनेला धरती सारखे पार करायला सांगीतले. वेदव्यासाने वेद,भेद,लबेदच्या करामतीने पार होणे इच्छीले,परंतु पार होऊ शकले नाही.जेंव्हा की गुजरी सहजमध्ये धरतीवर चालल्या सारखे यमुनेवर चालून पार होऊन गेली.तेंव्हा वेदव्यासाला आणि जगाच्या ज्ञानी, ध्यानी,ऋषी मुनी,योगींना सुक्ष्म वेदाची पारख झाली. ।।५७।।

कहे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। अब कोण बेद की मत्त तुमारी ।।
बार बार तम बेद बतावो ।। यां च्यारां मे मोख न पावों ।।५८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे की,अरे ब्रम्हचारी तुम्ही वेद सांगता तर तुमच्या कोणत्या वेदाची पोहच आहे.ब्रम्हाने बनविलेल्या चारी वेदांमध्ये परममोक्षाला जाण्याचा पराक्रम नाही.तरी चारी वेदांच्या पराक्रम ही तुम्ही प्राप्त केला. तरी ही तुम्ही मोक्ष प्राप्त करणार नाही. ।।५८।।

बेद गाय पूंता जन कोई ।। सो तम सोज बतावो मोई ।।
भेद साज जन मोख सिधाया ।। कोण कोण कहिये मुज भाया ।।५९।।

ब्रम्हचारी वेदाची साधना करुन कोणी साधु परममोक्षाला पोहचला आहे,हे मला शोधुन सांगा किंवा वेदाच्या पलिकडे भेद आहे.अश्या भेदाच्या साधना करुन परममोक्षाला गेले आहे.असे कोण कोण साधु आहे,हे शोधून मला सांगा ।।५९।।

फेर लभेद लाय घट माही ।। कोण कोण नर पूगा जाही ।।
ओ कोई आण भेद मुज देवे ।। छुछम बेद सोजी तब लेवें ।।६०।।

वेद व भेदाच्या पलिकडे लबेदला घटात प्रगट करुन कोण कोण साधु परममोक्षाला गेले आहे ते मला शोधून सांगा.जे साधक वेद,भेद,लबेद ने कोणी पोहचले नाही.ते न्यायाने शोधुन मला सांगेल तोच साधु वेद,भेद,लबेदच्या पलिकडच्या परममोक्षाचा सुक्ष्मवेदाचे शोध माझ्या आतून घेईल आणि तो धारण करेल. ।।६०।।

मोख मिल्यां की आ सेनाणी ।। तीन लोक मे रहे न प्राणी ।।
धर पाताळ सुर्ग लग बासा ।। तहाँ लग ग्रभ सकळ की आसा ।।६१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहे की,मोक्ष प्राप्त करण्याची ही निशाणी आहे की,तो मोक्षाला गेलेला हंस अमरलोकात राहती.स्वर्ग,मृत्यु,पाताळात राहत नाही व गर्भात येत नाही.जो पर्यत प्राणी मृत्युलोक,स्वर्गलोक,पाताळ लोक मध्ये

निवास करतो तो पर्यंत तो गर्भात येतो आणि काळाचे दु:ख भोगतो. हे समजा ।।६१।।

**जुग मे मिले किसी बिध आणी ।। अनंत कळा दिख लावे जाणी ।।**
**वे नर मोख न पूंता भाई ।। देवलोक मे बेठा जाई ।।६२।।**

ज्या वेद कर्मीना,योगींना मोक्षात गेले असे तुम्ही समजतात तर ते धामाला पोहचलेले योगी संसारात येऊन लोकांना येथे कसे भेटतात?तसेच जगात मायेचे अनंत पर्चे चमत्काराची कला संसारी लोकांना कसे दाखवितात.याचा अर्थ समजा की,ते परममोक्षास पोहचले नाहीत.ते देवतांच्या लोकातच बसले आहे,हे ज्ञानाने समजा ।।६२।।

**बळ ऋक्मांगद हरचंद राई ।। पांडव पांच सकळ जुग माई ।।**
**सुण अमरीष भक्त आ कीनी ।। च्यार मुक्त बैकुंटा लीनी ।।६३।।**

बळीराजा,रखमांगद,हरीश्चद्र,अमरीष राजा,पाच-पांड्व हे सर्व मायेच्या जगातच आहेत. बळीराजा पाताळात पोहचला तर रखमांगद,हरीश्चद्र तसेच पाच पांड्व स्वर्गादिक पोहचले.अमरीष राजाने नवविद्या भक्ती केली आणि वैकुंठाच्या चारी मुक्त्या सालोक्य, सायुज्य सामीप्य तसेच सारप प्राप्त केल्या. ।।६३।।

**यूं नवद्या भक्त करे जन होई ।। प्रममोख पहुंतो नही कोई ।।**
**रिष ध्रम साज कर भाई ।। देवलोक मे पहूंता जाई ।।६४।।**

याप्रकारे नवविद्या भक्ती करुन कोणी वैकुंठपर्यत पोहचले तर ऋषीधर्म साधुन कोणी देव लोकांत पोहचले.याप्रकारे सर्व मायेच्या जगातच राहीले.मायेच्या जगाच्या पलिकडे परममोक्षाच्या पदात कोणी पोहचले नाही. ।।६४।।

**तप ही मोख न पूंचे कोई ।। इधक जोर तो इंदर होई ।।**
**मेरा बचन न मानो भाई ।। तो भागवत मे सुणलो जाई ।।६५।।**

तपस्या करुन कोणी ही मोक्षाला पोहचत नाही.तपस्या करणारा कड्कहून कड्क तपस्या करेल तर जास्तीत जास्त इंद्र बनेल.तुम्हाला माझ्या सांगण्यावर विश्वास येत नसेल तर भागवतमध्ये जाऊन ऐका. ।।६५।।

**नास्केत य्हाँ आण बताया ।। सब रिख धर्म पुरी मे भाया ।।**
**जोगी सकळ जुग के मांही ।। देवलोक मे कबु न जाई ।।६६।।**

नासीकेतने सदेह जाऊन यमपुरी बघितली आणि येथे येउन पिता उद्दालकला सांगीतले की,सर्व ऋषी धर्मरायाच्या येथे धर्मपुरी मध्ये बसले आहे.ही नासीकेतची गोष्ट भागवत मध्ये आली आहे आणि काही योगी तर संसारातच राहतात.हे योगी देवलोकात कधी ही पोहचत नाही. ।।६६।।

**जिन को भेद कहुँ तुज लाई ।। दे धर मिले जक्त के माही ।।**
**अे प्रममोख किम मिलिया जाई ।। सो तुम भेद कहो मुज आई ।।६७।।**

हे योगी संसारातच राहतात याचा भेद मी तुम्हाला आणून दाखवितो.हे सर्व मच्छिंद्र, गोरखनाथ,गोपीचंद,भर्तृहरी इ.योगी देह धारण करुन आता ही संसाराच्या लोकांना जगात भेटतात.हे सर्व योगी मोक्षाला गेले असते.तर संसारात राहीले नसते व संसाराच्या लोकांना जगात भेटले नसते.जेंव्हा हे संसारातील लोकांना भेटतात.तर ते मोक्षाला गेले हे कसे मानतात.याचा मला भेद दाखवा ।।६७।।

के सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। मोख मिले वां भक्ति न्यारी ।।
मोख गयो नही आवे कोई ।। तीन लोक मे नकल न होई ।।६८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगतात की,ज्या भक्तीने मोक्ष मिळतो ती भक्ती वेगळी आहे.त्या भक्तीने हंस परममोक्षास जातो.तो मृत्यु,स्वर्ग,पाताळ या तीन लोकात नकलच्या रुपातही कधी राहत नाही.तर खऱ्या देहाने कसा राहील.।।६८।।

कोई पारब्रम्ह कूं देखे भाई ।। तो मोख मिल्यो आवे जुग माई ।।
मोख मिलण बोहो राहा हन होई ।। ब्होत कहे ज्हाँ गम ना कोई ।।६९।।

जसे आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी हे तत्व मायेच्या डोळ्यांनी बघतात असा सतस्वरुप पारब्रम्ह तत्तला कोणीही मायेच्या डोळ्यांनी बघितले आहे का?जर सतस्वरुप पारब्रम्हला मायेच्या डोळ्यांनी बघितले आहे तर समजावे की मोक्षाला म्हणजे सतस्वरुप पारब्रम्ह मध्ये पोहचलेले संत जगात परत येतात.मच्छिंद्र,गोरखनाथ,गोपीचंद,भर्तृहरी इ.योगी मायेच्या तीन लोकात दिसतात.याचा अर्थ हे योगी मोक्षाला गेले नाही.सतस्वरुप पारब्रम्हला आजपर्यंतही मायेच्या डोळ्यांनी कोणी ही बघितले नाही.याचा अर्थ सतस्वरुप पारब्रम्हमध्ये पोहचलेले संत तीन लोकात येत नाही. मोक्षाला जाण्याचे खुपसे रस्ते आहेत असे कोणी सांगत असेल तर समजा,असे खुपसे रस्ते दाखविणाऱ्याला मोक्षपद काय आहे याचे ज्ञानच समजले नाही.।।६९।।

गिगन चडण कूं पवन न्यारा ।। यूं मोख मिलण को अेक बिचारा ।।
चहुं दिस उड्याँ गेण नही जावे ।। यूं ब्होत पंथ मे मोख न पावे ।।७०।।

पक्षाला गगणात चढविण्याकरीता लागणारी पवन कला वेगळी असते.तो पक्षी गगणात फक्त त्या एका कलेने सरळ गगणात चढू शकतो.याप्रकारे मोक्ष मिळण्याची कला वेगळी असते.ती फक्त एक प्रकारचीच कला असते.अनेक प्रकारची कला नसते.चार दिशांमध्ये उडण्याची पध्दतीने पक्षी गगणात पोहचत नाही.याप्रकारे मायेच्या अनेक पंथाच्या आधाराने हंस मोक्ष प्राप्त करु शकत नाही. ।।७०।।

ब्होत पंथ अे अेकी होई ।। मोख पंथ यामे नही कोई ।।
ब्होत पंथ तज अेक संभावे ।। सोभी मोख कबू नही जावे ।।७१।।

मायेचे खुपसे पंथ आहेत ते सर्व पंथ एकच आहे. त्याच्याने हद बेहद पर्यंतच पोहचता

येते.अगम मध्ये पोहचणारा मोक्ष पंथ या मायेच्या खुप साऱ्या पंथामध्ये नाही.तो पंथ या सर्व मायेच्या पंथापेक्षा वेगळा आहे.कोणी साधु मायेचा एक मात्र पंथ धारण करतो आहे आणि बाकी सर्व मायेचे पंथ त्यागतो.तरी ही तो साधु मोक्षाला पोहचत नाही. ।।७१।।

**यां तो बोत माया सु स्याई ।। मोख पंथ न्यारो सुण भाई ।।**
**मोख पंथ थेटी सु न्यारो ।। ज्यूं पंछी की उड़न बिचारो ।।७२।।**

या दुसऱ्या सर्व पंथांनी पूर्ण मायेचाच आसरा घेतला आहे.मायेची पोहच हद बेहद पर्यंतचीच आहे.हद बेहदच्या पलिकडे अगमदेशाची नाही.मोक्ष पंथ अगमदेशात पोहचवतो. याप्रकारे मोक्षपंथ माया पंथापेक्षा वेगळा आहे.जसे अनड पक्षाची गगणात उड्डून चढण्याची कला(थेट)आधीपासूनच वेगळी आहे.त्याप्रकारे मोक्ष पंथात मोक्षाला पोहचविण्याची कला आधीपासूनच वेगळी आहे.।।७२।।

**तिरछी उडण सकळ अंवळाई ।। आडी उड़ण झूट सब भाई ।।**
**ब्होत पंथ पग का होई ।। जाँहा पपील बेद क्हे सोई ।।७३।।**

जसे पक्ष्याला गगणात चढायचे आहे.तो पक्षी तिरप्या उडण्याच्या कलेने गगणात पोहचु शकत नाही.तिरपी उडाण पक्ष्याला गगणात पोहचविण्या करीता फेरा आहे.म्हणजे बेकाम (कामाचे नाही)आहे.आड्वी उडाण ही गगणात पोहचविण्याकरीता खोटी पध्दत आहे. आड्व्या उडाणच्या आधारे पक्षी कधी ही गगणात पोहचू शकत नाही.मुंग्यासारखे जमिनीवर खुपसे पंथ उडण्याचे ही राहत नाही.फक्त पायांने चालून जमिनीवरच राहण्याचे राहतात.(असतात)म्हणजे मायेमध्येच राहण्याचे राहतात.गगणात पोहचण्याचे राहत नाही.म्हणजे मोक्षाला जाण्याचे राहत नाही.।७३।।

**ज्युं चींटी गेण कोण बिध जावे ।। मोख राहा बिन परां न पावे ।।**
**बेद भेद मे पाव उपाई ।। बेहद लग नीठ कर जाई ।।७४।।**

जसे मुंगी जमिनीवरच चालते, तिला पंख नसतात याकरीता ती गगणात पोहचु शकत नाही.त्याचप्रकारे वेदाच्या विध्या मायेतच पोहचण्याच्या राहतात.त्याच्यात मोक्ष जाण्याची विधी राहत नाही.वेद व भेदाचे सर्व उपाय मुंगीच्या पायासारखे जमिनीवर चालण्या सारखे आहे.पायाने चालणारे पायाच्या उपायाने साधु बेहद पर्यंत मुश्किलने पोहचतात. ते अगमदेशात कधी ही पोहचत नाही. ।।७४।।

**ज्युं चींटी ब्रछ नीट चड़ जावे ।। अगम गेण कूं क्हो किम पावे ।।**
**यूं ब्हो पंथ झूट है भाई ।। बिन पांखा कौ गेण न जाई ।।७५।।**

जसे मुंगी पायाच्या आधाराने जमिनीवर चालते जास्तीत जास्त झाडावर मुश्किलने चढून जाते.पंख नसल्याने झाड सोडून गगणात कधीही जात नाही.याप्रकारे मायेचे सर्व पंथ

म्हणजे ३ लोक १४ भवनपर्यंत पोहचतात.जास्तीत जास्त बेहद म्हणजे होणकाळा पर्यंत पोहचतात.होणकाळाच्या पलिकडे अगममध्ये पोहचत नाही.याप्रकारे वेद,भेदाचे खुपसे पंथ आहेत.परंतु ते सर्व पंथ अमरदेशात जाण्याकरीता खोटे आधार आहेत.जसे पंखाशिवाय मुंगी गगणात जात नाही.त्याप्रकारे हंस कुद्रत कलेशिवाय अगम देश जात नाही. ।।७५।।

**पांख उपाय काहुं नही पावे ।। बिना लबेद पांख नही आवे ।।**
**सो ज्या बेद भेद कूं पाया ।। भेद मांय सूं लबेद उपाया ।।७६।।**

काही मुंग्या जमिनीवर पायाने चालतात.तर काही मुंग्यांना पंख येतात आणि त्या थोड्या अंतरापर्यंत हवेत उडतात.त्याच्या पुढे नाही उडू शकत.याकारणाने त्या मुंग्या गगणात पोहचु शकत नाही.याप्रकारे वेदाच्या उपायांनी वेदाचा साधक मायेच्या परे अगम पोहचु शकत नाही.काही साधु वेदातून व भेदातून लबेद साधतात.त्यांची स्थिती जमीनीवर पायाने चालणाऱ्या मुंगीपेक्षा वेगळी होऊन पंखाने उडणाऱ्या मुंगीसारखी होते.जसे मुंगीला उडणाऱ्या पंखाची प्राप्ती झाली.तरी ही ती जमिनीपासून काही दूर वर(काही अंतरावर)उडू शकते.गगणात पोहचू शकत नाही.याप्रकारे लबेद प्राप्त केलेला संत ही अमरपदात पोहचु शकत नाही.मायेचे उंच पद प्राप्त करतो व मायेतच राहतो. ।।७६।।

**पण छुछम बेद यामे नही कोई ।। ना लबेद बेद पत होई ।।**
**क्हे सुखराम सुणो ब्रम्हचारी ।। कोण बेद लग मत्त तमारी ।।७७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी ब्रम्हचारीला विचारले की तुम्ही चार वेद,भेद तसेच लबेद याच्यातील कोणाचा पराक्रम प्राप्त केला हे सांगा.अगम देशात पोहचविणारी सुक्ष्म वेदाची कुद्रतकला वेद,भेद,लबेद मध्ये नाही यामुळे वेद,भेद,लबेद मध्ये सुक्ष्म वेदाचा अगमदेशात पोहचविण्याचा पराक्रम नाही. ।।७७।।

विठ्ठलराव वाक्य ।। चोपाई ।।

**विठ्ठलराव अब बुज्यो आई ।। कृपा कर दो भेद बताई ।।**
**अे च्यारूं किण कीण ने कीया ।। पेली मान भेद किण लीया ।।१।।**

परंतु मध्येच विठ्ठलराव आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलले की,आपण जो चार वेद,भेद,लबेद व सुक्ष्म वेद सांगतात.त्या चार वेद,भेद,लबेदला कोणी बनवले आणि सर्व प्रथम कोणी मानून भेद घेतला याचा कृपा करुन मला भेद सांगा ।।१।।

**सुखोवाच ।। च्यार बेद सुण ब्रम्हा कीया ।। नारद सिष श्रवणा लीया ।।**
**उण उपदेश ब्यास ने गाया ।। इस बिध बेद जग मे आया ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की,हे ऋगवेद,यजुर्वेद,

अथर्ववेद,सामवेद असे चार वेद ब्रम्हाने बनविले.सर्वप्रथम ब्रम्हापासून नारदाने ऐकले व शिकले.नारदाने वेदव्यासाला वेदाचा उपदेश दिला.वेदव्यासाने नारदापासून शिकून संसारात वेदाचा प्रसार केला. याप्रकारे वेद संसारात आले. ।।२।।

**भेद बेद ओ सुण ले भाई ।। गोरख नाथ ब्रणियो आई ।।**
**सिव सुं मंछ सुण प्रगट कीयो ।। सिव सूं भेद सकल ने लीयो ।।३।।**

याप्रकारे भेद शंकराने बनविले.सर्वप्रथम मच्छिंद्रनाथाने ऐकले व प्रगट केले.मच्छिंद्रनाथाने गोरखनाथाला उपदेश दिला.गोरखनाथाने पच्छिंद्रनाथाकडून प्रगट करुन संसारात भेदाचा प्रसार केला.याप्रकारे शिवापासून मच्छिंद्रनाथ, मच्छिंद्रनाथापासून गोरखनाथ, गोरखनाथापासून सर्व संसाराच्या लोकांना भेदाचा भेद मिळाला. ।।३।।

**म्हासेंस लबेद बणायो ।। आद सक्त सें वां बी पायो ।।**
**बिसकर्मा श्रीयादे भाई ।। प्रगट कियो आण जुग माई ।।४।।**

जसे वेद ब्रम्हाने बनविले.भेद शंकरापासून बनले.याप्रकारे लबेद आदि शक्ति पासून बनले.आदि शक्ति पासून महाशेषाने लबेद प्रगट केला.महाशेषापासून विश्वकर्मा तसेच श्रीयादे कुंभारीनने प्रगट केले.विश्वकर्मा व श्रीयादेने सर्व संसारात प्रगट केले.याप्रकारे आदि शक्तिपासून महाशेष,महाशेषापासून विश्वकर्मा व श्रीयादे,विश्वकर्मा व श्रीयादे पासून सर्व संसाराच्या लोकांना लबेदचा भेद प्रगट झाला.।।४।।

**अब छुछम बेद की उत्पत लाऊं ।। महा बिष्ण सूं तोय बताऊं ।।**
**लिछमी बिस्न ब्होत सुख पाया ।। सनकादिक सुण जग मे लाया ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ब्रम्हचारीला सांगत आहेत की,जशी वेदाची उत्पत्ती ब्रम्हापासून झाली,भेदाची उत्पत्ती शंकरापासून झाली,लबेदची उत्पत्ती आदिशक्ती–पासून झाली.याप्रकारे सुक्ष्म वेदाची उत्पत्ती महाविष्णू पासून झाली.महाविष्णू पासून लक्ष्मीला सुक्ष्म वेद मिळाला.या सुक्ष्मवेदाच्या योगाने लक्ष्मी आणि महाविष्णूला खुप सुख मिळाले.महाविष्णू लक्ष्मीपासून सनक,सनन्दन,सनातन आणि सनतकुमार या सनकादीकांनी धारण केला व जगात आणला. ।।५।।

**ऋषभ देव तामे तत्त छाण्यो ।। छुछम बेद मे तत्त पिछाण्यो ।।**
**वां प्रगट कीयो जग मे आणी ।। बिध चोबीस तिथंकरा जाणी ।।६।।**

जगात ऋषभदेवाने सुक्ष्मवेदाचा तत्त ओळखला व त्या तत्तला प्रगट केले.ऋषभदेवा–पासून २३ तिर्थंकरांनी तत्त धारण केले व प्रगट केले.याप्रकारे २४ तिर्थंकरांनी सुक्ष्म वेदाचा तत्त प्रगट केला व जगात प्रसार केला. ।।६।।

बालाजी पिडंत उवाच ।। तब बालाजी पिंडत बोल्या ।।
**तुम अे ग्यान सकळ गेहे तोल्या ।।**

सब का मोल तोल कहो न्यारा ।। तम बोलत हो कोण आधारा ।।७।।

तेंव्हा बालाजी पंडीत आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलले की आपण हे सर्व ज्ञान पकडून मोजून तोलून तोलून सांगतात आणि वेद,भेद,लबेद तसेच सुक्ष्मवेद या सर्वांचे मोल व तोल वेगवेगळे करुन सांगतात.तर तुम्ही कोणाच्या आधाराने बोलतात. ।।७।।

सुखो ऊवाच ।।

क्हे सुखराम भेद क्हुं लाई ।। बालाजी पिंडत सुण भाई ।।
में बोलुं हूं इण आधारा ।। वो छुछम बेद इण सब सूं न्यारा ।।८।।

तेंव्हा आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,अरे भाई बालाजी पंडीत,मी जे मोजून तोलमोलने बोलून राहीलो आहे.याचा भेद मी तुला सांगतो.तो तुम्हा ऐका,मी सुक्ष्मवेदाच्या आधाराने बोलत आहे.मी ज्या सुक्ष्म वेदाच्या आधाराने बोलत आहे.तो सुक्ष्मवेद ब्रम्हाचा वेद,शंकराचा भेद,आदि शक्तीचा लबेद,विष्णूचा सुक्ष्मवेद या सर्वांपेक्षा वेगळा आहे.हा सुक्ष्मवेद परात्परी परमात्मा देव अमरपुरुष अविनाशीपासून माझ्यात प्रगट झाला आहे.माझ्यात प्रगट झालेला सुक्ष्मवेद ब्रम्हा,शंकर,आदिशक्ती तसेच विष्णू या त्रिगुणी मायेपासून प्रगट झालेला नाही.तो मायेच्या पलिकडे जो सर्वांचा उत्पत्तीकर्ता परमात्मा आहे.अश्या सतस्वरुप परमात्म्यापासून प्रगट झाला आहे. ।।८।।

इण आधारा बेद सब कीया ।। ब्रम्हा भेव जक्त कूं दीया ।।
बोल्या संत छुछम आधारा ।। पिण काम काम मे फरक बिचारा ।।९।।

ज्या सुक्ष्मवेद म्हणजे परमात्म्याच्या आधाराने ब्रम्हाने चार वेद बनविले व वेदाच्याद्वारे मायेच्या क्रिया करणी तसेच योगाचा भेद जगातील लोकांना दिला.ब्रम्हाने ज्या सुक्ष्मवेद म्हणजे सिरजनहार परमात्म्याचा आधार घेतला असा सुक्ष्मवेद म्हणजे सिरजनहार परमात्म्याचा आधार संतांनी घेतला व जगात परममोक्षाचा भेद म्हणजे राजयोग प्रगट केला.याप्रकारे ब्रम्हा जे वेद बोलला ते वेदही सुक्ष्मवेदाच्या आधाराने बोलला आणि संत जे बोलले ते ही सुक्ष्म वेदाच्या आधारानेच बोलले,परंतु कामा कामात दोघांचा फरक आहे. ब्रम्हाचे काम मायेची सृष्टी बनऊन हंसाला मायेच्या सृष्टीत वसविण्याचे आहे.तर संताचे काम हंसाना मायेच्या सृष्टीतून काढण्याचे आहे.म्हणजे काळापालसून मुक्त करुन अमर सृष्टीमध्ये घेऊन जाण्याचे आहे. ।।९।।

अेक हाकम मुलक बसायो जाई ।। वांही अधार भूपको भाई ।।
अेक ब्याव कर राजा के लावे ।। वे ही अधार भूप को गावे ।।१०।।

जसे राजाने मुलुक राज्य वसविण्याकरीता हाकमला पाठविले. त्या हाकमने जाऊन मुलुकच्या लोकांची वस्ती वसविली.त्या हाकमला ही आधार राजाचाच आहे.त्याच प्रकारे

एक राजाची तलवार घेऊन जाऊन राजासाठी लग्न करुन राणी आणतो त्याला आधारही राजाचाच आहे.दोघांच्या कामा कामात फरक आहे.परंतु दोघांना राजाचाच आधार आहे. याप्रकारे ब्रम्हा व केवळी संताच्या कामा कामात फरक आहे.परंतु आधार सत परमात्म्याचाच आहे. ।।१०।।

**मे आयो इण कारज भाई ।। सो प्रगट सुणले जुग माही ।।**
**ने:अंछर खांड्रो सुण होई ।। वो नांव ब्रम्ह को कहे न कोई ।।११।।**

याप्रकारे मी कोणत्या कामाकरीता संसारात आलो आहे हे स्पष्ट ऐकून घ्या.जसे राजा कोणाला आपली तलवार देऊन होणाऱ्या राणीशी विवाह करण्याकरीता कोणाला तरी पाठवितो. ठिक त्याच प्रकारे सतगुरु परमात्म्याने ने:अक्षराचे नाव देऊन मला संसारात पाठविले आहे.हे ने:अक्षराचे नाव म्हणजे ब्रम्हाचे नाव,म्हणजे सतस्वरुप पारब्रम्हचे नाव, ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती यांनी कोणीही जगात प्रगट सांगीतले नाही. ।।११।।

**सो ने:अंछर दे मुज तांई ।। सतगुरु भेजो या जुग मांई ।।**
**आतम हंस जाय के लावो ।। पारब्रम्ह के लोक पठावो ।।१२।।**

जसे राजा तलवार देऊन कोणाला तरी राज घराण्यात राणी आणण्यास पाठवतो. त्याच प्रकारे सतगुरु परमात्म्याने मला ने:अक्षर देऊन आत्म हंसाला आपल्या पारब्रम्हच्या लोकात पाठविण्याकरीता पाठविले आहे. ।।१२।।

**अनंत क्रोड आगे जन आया ।। आतम हंस ब्यावणे भाया ।।**
**सोही रीत हमारी होई ।। ब्रम्हा रीत ओर क्हुं तोई ।।१३।।**

जसे राजा राण्यांना विवाह करुन आणण्याकरीता वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या पुरुषांना पाठवतो.त्या प्रकारे पारब्रम्ह परमात्म्याने हंसाना पारब्रम्हच्या लोकात पाठविण्याकरीता वेगवेगळे असे अनंत करोड संतांना आजपर्यंत पाठविले आहे.आधीही अनंत कोटी संत आत्म हंसात ने:अक्षर प्रगट करुन पारब्रम्हच्या लोकात पाठविण्याकरीता आलो आहे. माझी रीत आत्म हंसाला पारब्रम्हच्या अमरलोकात वसविण्याची आहे.तर ब्रम्हाची रित मायेच्या लोकात हंसाना वसविण्याची आहे.या मायेच्या लोकात जुलमी काळ आहे. याप्रकारे माझ्या रितमध्ये व ब्रम्हाच्या रितमध्ये फरक आहे. ।।१३।।

**अब सुण बालाजी पिंडत आणी ।। बेद भेद अब कहुँ बखाणी ।।**
**बात सकळ चेतन आधारा ।। पर काम काम पर बचन नियारा ।।१४।।**

आत बालाजी पंडीत तु ऐक.वेद,भेद,सुक्ष्म वेदाचे वर्णन करुन मी तुला सांगतो.हे सर्व गोष्टी करतात व त्या सर्व गोष्टी हंस चेतनच्या आधारानेच करतो.वेद,भेद, सुक्ष्मवेदाच्या गोष्टी करणारे सर्व हंस चेतन सारखे आहे.ब्रम्हाचा हंस चेतन व माझा हंस चेतन असा सारखा आहे.परंतु माझे व ब्रम्हाच्या कामा कामाचे ज्ञान वेग वेगळे आहे.।।१४।।

यूं ब्रम्हा बेद किया हद तांई ।। बेहद लग बात कही मांई ।।
इण कू हुकम यांहाँ लग हूवा ।। तीनु लोक बसावो जूवा ।।१५।।

ब्रम्हाचा चेतन व माझा चेतन एक सारखा आहे.तरी ही मी सुक्ष्म वेदाचे ज्ञान जे अगम देशात जाते ते देतो.तर ब्रम्हा वेदाचे ज्ञान जे हद बेहद पर्यंतच पोहचविते ते देतो. ब्रम्हाला तीन लोक वसवा येथपर्यंतचा हुकुम परात्परी परमात्म्यापासुन झाला आहे. ।।१५।।

तीन लोक मे आवे जावे ।। छोटी बड़ी पदवी सो पावे ।।
ज्हाँ लग ब्रम्हा ताण बताई ।। अगम बात सुगम कर गाई ।।१६।।

ब्रम्हाने बनविलेल्या वेदाच्या करण्यांपासून हंस मृत्युलोक,स्वर्गलोक,पाताळलोकमध्ये वसत असतात.छोटी मोठी मायेची पदवी प्राप्त करुन कधी स्वर्गात येत जात राहतात. ब्रम्हाने वेदात तीन लोकात पदवी प्राप्त करण्याची विधी ताणून ताणून खोलून खोलून सांगीतली आहे.सोबत अगमची गोष्ट सुगम आहे.म्हणजे उंच आहे.असे सांगीतले आहे. ।।१६।।

सोभा करी इसो पद होई ।। पद मिलणे की बिध कही न कोई ।।
तिणको अर्थ सुणियो भाई ।। वा बिध कहयां रद अे जाई ।।१७।।

अगमची गोष्ट सुगम आहे म्हणजे उंच पदाची आहे अशी शोभा ही केली आहे.परंतु अगम पदात मिळण्याची विधी कोठे ही सांगीतली नाही.याचे कारण हे आहे की,जर अगम पदात मिळण्याची विधी ब्रम्हाने सांगीतली असती तर ब्रम्हाचा मायेमध्ये तीन लोक वसविण्याचे काम रद्द होऊन गेले असते. सर्व जगाच्या लोकांनी अगमची गोष्ट धारण केली असती व मायेत काणी राहीले नसते. ।।१७।।

ब्रम्हा को कारज ओ होई ।। तीन लोक मर्जादा सोई ।।
तिण कारण अे ताण बताई ।। भिन भिन्न रीत सकळ जग माई ।।१८।।

परात्परी परमात्म्याने ब्रम्हाला तीन लोक स्वर्ग,मृत्यु,पाताळा पर्यंतचीच वसविण्याची मर्यादा दिली आहे.अगम देशात जीव वसविण्याचा ओहदा दिला नाही.याकारणाने ब्रम्हाने जीव तीन लोकातच राहतील अश्या गोष्टींना ताणून ताणून सांगीतले आहे.याकारणाने ब्रम्हाने तीन लोकात राहण्याचा वेगवेगळ्या प्रकारचा सर्व भेद संसारात सांगीतला आहे. ।।१८।।

ओर कछु तम भेद बतावो ।। तो सुण आ बुध हिर्दा मे लावो ।।
ओर बिध्ध सब भिन्न भिन भाकी ।। प्रममोख की छुछम दाखी ।।१९।।

मायेच्या तीन लोकात राहण्याचा भेद ताणून ताणून सांगण्या शिवाय अगम देशात जाण्याचा भेद ब्रम्हाने वेदात सांगीतला आहे का?ही बुध्दी तुम्ही हृदयात आणून विचार करा.

ब्रम्हाने दूसरी विधी भिन्न भिन्न(वेगवेगळी)करुन सांगीतली आणि परममोक्षाचे पद मोठे आहे हे गायले परंतु प्राप्त करण्याची विधी हंसांना समजणार नाही.अशी एकदम सुक्ष्म सांगीतली आहे. ।।१९।।

**ओ तम भेद हिर्दा मे आणो ।। छुछम बेद तम भेद पिछाणो ।।**
**सब सांबळ किवो सोभा गाई ।। जामण मरण दोय बिध भाई ।।२०।।**

ब्रम्हाने वेदात सुक्ष्म वेदाची विधी सुक्ष्म दिली आहे. ही गोष्ट जी तुम्हाला सांगत आहे.ही गोष्ट हृदयात आणा.तसेच ब्रम्हाने सांगीतल्यानुसार सुक्ष्मवेद,वेद,भेद,लबेद या सर्वांपेक्षा मोठा आहे हा भेद तुम्ही ओळखा.ब्रम्हाने वेदात सतस्वरुपाच्या ज्ञानाची मायेच्या करण्यांच्या मध्ये मिसळून शोभा केली आहे.जसे जगात जन्मणे व मरणे हया विध्या वेगवेगळ्या आहेत.तसेच मायेत बसणे(राहणे)व मायेपासून मुक्त होणे ह्या दोन विध्या वेगवेगळ्या आहेत. ।।२०।।

**जनमे ज्हां मरण बिध नांही ।। मोत ज्हां वो ग्यान न कांही ।।**
**यूं मोख मुक्त का पंथ न्यारा ।। ब्रम्हा संग कहे क्युं प्यारा ।।२१।।**

जेथे जन्म होतो तेथे मरणाची विधी करीत नाही.तसेच जेथे मरण होते तेथे जन्मण्याचे ज्ञान देत नाही.याप्रकारे मायेमध्ये जखडून ठेवणे व मायेत(मायेपासून)मोक्ष करुन मुक्त करणे हे दोन रस्ते वेगवेगळे आहे.ब्रम्हाला जगातील लोकांना तीन लोकात बांधून ठेवायचे आहे.तो मोक्षाला जाण्याचा जो प्रिय रस्ता आहे.तो तीन लोकात हंसांना ठेवण्याकरीता कसे सांगेल. ।।२१।।

**बेद नाव की सोभा गाई ।। प्रममोख की अेहे उपाई ।।**
**पिण भेद नाव को न्यारो होई ।। सो बेदां मे कहयो न कोई ।।२२।।**

ब्रम्हाने वेदात निजनामाची शोभा गायली व परममोक्ष जाण्याकरीता निजनाम म्हणजे सतशब्द म्हणजे ने:अक्षर हाच उपाय आहे असे ही सांगीतले.परंतु निजनावाचा भेद जो मायेच्या नावाच्या भेदापेक्षा वेगळा आहे.तो ब्रम्हाने वेदात कोठेही सांगीतला नाही. ।।२२।।

**सुण बालाजी पिंडत कहुं तोई ।। अजू हुं तम नही चीन्हो मोई ।।**
**सोभा बस्त भेद नही पायो ।। तब लग ग्यान हिर्दे नही आयो ।।२३।।**

बालाजी पंडीत मी तुला ब्रम्हाने वेदात वेगवेगळ्या मायेच्या करण्या ताणून ताणून सांगीतल्या व सुक्ष्म वेदाचा भेद कोठे ही वर्णन केला नाही.हे वेगवेगळ्या प्रकारे समजावले आहे.परंतु मी काय समजवत आहे.हे तु पकड्त नाही.वस्तुची शोभा केल्याने वस्तूला प्राप्त करण्यावा भेद येत नाही.याप्रकारे अगमच्या देशाची शोभा ऐकल्याने अगम देशात पोहचण्याची विधी हंसाच्या हृदयात प्रगट होत नाही. ।।२३।।

नाव भेद बेद मे नाही ।। ओर बिध सब साझन माही ।।
अेक कुद्रत कळा नाव की न्यारी ।। बेद कही तो कहो उचारी ।।२४।।

बालाजी पंडीत निजनामाचा भेद वेदात कोठेही सांगीतला नाही.परंतु मायेच्या सर्व धर्माची साधना वेदात ताणून ताणून सांगीतली आहे हे समज.या मायेच्या सर्व धर्मांच्या विधींनी कुद्रतकला प्रगट करणारे निजनामाची विधी वेगळी आहे.ही वेगळी विधी वेदाने कोठे उच्चारण केली असेल तर मला सांग ।।२४।।

पूरब ध्यान बेद मे गायो ।। ओंऊँ सोहं सब्द बतायो ।।
पवन संग गिगन मे जावे ।। नाव चड़े सो भेद न पावे ।।२५।।

वेदात पूर्वेचे ध्यान म्हणजे मुलद्वाराने भृगुटीत श्वास चढवण्याच्या ध्यानाचे वर्णन केले आहे.ओअम व सोहम शब्दाने बनलेल्या श्वासाच्या आधाराने गगणात चढण्याची विधी खोलून खोलून सांगीतली आहे.परंतु ज्या विधीने सतशब्द बंकनालच्या रस्त्याने(कसा) चढतो तो भेद प्रगट होत नाही. ।।२५।।

नाव चड़े पिछम दिस होई ।। आ कुद्रत कळा तके हे कोई ।।
सब ही साध ना जाणे भाई ।। नही नही दोस तुमारे माई ।।२६।।

सतनामाने पश्चिम दिशेने गगणात चढल्याने जी कला प्रगट होते.त्या प्रगट कलेला कुद्रतकला म्हणतात.ही कुद्रत कला सृष्टीतील सर्व साधू जाणत नाही.या कुद्रतकलेला बिरले(काहीच,मोजकेच)संत जाणतात.याकारणाने कुद्रतकलेला न जाणण्याचा दोष तुमच्यात नाही. ।।२६।।

विठलराव अब बोल्या आणी ।। यां बड़ा बड़ा पुरसां नही जाणी ।।
सो कारण किण कहिये मोही ।। आ कुदरत कळा क्हेत हे सोई ।।२७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विठ्ठलरावने विचारले की महाराज आपण जी कुद्रतकला सांगत आहे.ती कुद्रतकला मोठ मोठ्या पुरुषांनी जाणली नाही.याचे कारण काय आहे हे मला समजवा ।।२७।।

सुखो उवाच ।।

इण को अर्थ ये हे सुण भाई ।। राज बेद कीया जग माई ।।
जहां तहां यांरी बिध गावे ।। जीव सुणे सोई भेव संभावे ।।२८।।

यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावला सांगीतले की या मोठ मोठ्या पुरुषांनी कुद्रत कलेची विधी प्राप्त केली नाही.कारण जागो जागी कुद्रतकलेची विधी नव्हती.वेदाच्या विध्या जागो जागी घरोघरी,घटा घटात राज्य करीत होती.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहेत की,आधीपासून छोटयां पासून मोठे सर्व स्त्री–पुरुष होणकाळ पारब्रम्हमध्ये होते.तेथे त्यांना सुख नव्हते.त्यांना सुख हवे होते.

या सुखांकरीता होणकाल पारब्रम्ह सोडून हंस त्रिगुणी मायेत खाली आला.जीवाला त्रिगुणी मायेत जे जे सुख हवे होत ते सर्व सुख ब्रम्हाने वेगवेगळया प्रकारे गायले.त्या सुखांच्या विध्या जीवाने धारण करायला हव्यात.याकरीता ब्रम्हाने ८८,००० ऋषी सृष्टीत पाठविले.हे ऋषी मुनी जेथे तेथे त्रिगुणी मायेचे सुख प्राप्त करण्याच्या विध्या ताणून ताणून जीवाला ऐकवू लागले.जीव ह्या विध्या पुन्हा पुन्हा एकत राहीले.जीव ज्या विध्या ऐकत राहीले.त्याच विध्या धारण करीत राहीले.त्या विध्यांमध्ये रंगत राहीले.जीवांना कुद्रत कलेत रंगण्याला याप्रकारे जागो जागी विधी मिळाली नाही.यामुळे छोट्यां पासून मोठयापर्यंतच्या पुरुषांनी कुद्रत कलेची विधी जाणली नाही. ।।२८।।

**जगा जगा चर्चा आ होई ।। बेद रीत घर घर कहुं तोई ।।**
**लागे रंग संग सु भाई ।। यूं कुद्रत कळा की संगत नही कोई ।।२९।।**

जागो जागी या वेदाची चर्चा चालत असते.याकारणाने घराघरात वेदाची रित होत असते.जसा संग असेल तसा रंग चढतो.याप्रकारे जीवाला वेदाचा रंग लागून गेला आणि मी ज्या कुद्रतकलेची गोष्ट सांगत आहे.ती कुद्रतकलेची संगत घरोघरी जागो जागी होत नाही. काही विरळ्या जागीच होते.याकारणाने या कुद्रत कलेची समझ जगातील लोकांना झाली नाही.याकारणाने मोठ मोठ्या पुरुषांना ही कुद्रत कला मिळाली नाही.।।२९।।

**अे बड़ा पुरस पीछे सुण होई ।। पेली सकळ नार नर लोई ।।**
**युं बेदी सुणो बेद बिध साई ।। युं कुद्रत कळा संगत नही पाई ।।३०।।**

जगात मोठे स्त्री-पुरुष नंतर बनतात.आधी हे मोठे स्त्री-पुरुष साधारण मनुष्यांसारखे स्त्री-पुरुषच राहतात.हे साधारण स्त्री-पुरुष वेदांच्या विध्या ऐकून ऐकून व त्यात प्रविण होऊन वेदाचे जाणकार असे मोठे पुरुष पुढे बनतात.या साधारण मनुष्यांसारखे जे स्त्री-पुरुष यांना कुद्रतकलेची संगत जागो जागी घराघरात मिळाली नाही.या कारणाने या स्त्री-पुरुषांमध्ये कुद्रत कला जाणणारे जागो जागी मोठे पुरुष बनले नाही.काही विरळ्या जागी कुद्रत कलेचे मोठे पुरुष बनले आणि विरळ्या जागेपर्यंत सर्व साधारण स्त्री-पुरुष पोहचले नाही. ।।३०।।

**करणी कर कर बळवंत होई ।। जां कुद्रत कळा न जागे कोई ।।**
**इनको अर्थ ये हे सुण भाई ।। बिना प्रेम नही जागे काही ।।३१।।**

हे मोठे पुरुष वेदांच्या करण्या करुन बळवंत झाले. परंतु या मोठ्या पुरुषांमध्ये कुद्रतकला जागृत झाली नाही. याचे कारण हे आहे या मोठ्या पुरुषांनी मनाचा हट व तनाचा हट करुन वेदाची पर्चे चमत्काराची करामत प्रगट करुन घेतली. परंतु यांना सत परमात्म्याशी प्रेम झाले नाही.ज्यामुळे या मोठ्या पुरुषांमध्ये कुद्रतकला जागृत झाली

नाही.।।३१।।

**जाग्यां बिना रीत नही पावे ।। नाव नाव कर सोभा गावे ।।**
**युं अे मोख इसी मे जाणे ।। नाव कळा कूं नाय पिछाणे ।।३२।।**

या मोठ्या पुरुंषामध्ये कुद्रतकला जागृत झाली नाही.यामुळे कुद्रतकला काय वस्तु आहे हे अनुभवाने त्यांना वास्तवात मध्ये समजले नाही.याकरीता या मोठ्या पुरुषांना निजनाम व नामातील फरक समजला नाही.यामुळे जे ही नाम जपले ते निजनामच आहे. असे समजून या नामातच मोक्ष आहे असे मनानेच मानून बसून गेले.याकारणाने निजनामाने प्रगट होणारी कुद्रतकला गुण काय आहे हे या मोठ्या पुरुषांना अनुभवाने समजले नाही. ।।३२।।

**बड़ा पुरस दोय बिध होई ।। जांरो भेद कहुं मे तोई ।।**
**अेक ग्यान भेद समझ मे भारी ।। अेक काया अपर बळ इधकी धारी ।।३३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की, जगात मोठे पुरुष दोन प्रकारचे कसे असतात हे समजा.एक सर्व सामान्य लोकांपेक्षा कायेने अपर बलवान असतो.तर दूसरा संसाराच्या ज्ञानाच्या समजने बळवान असतो.असेच एक तीन लोकाच्या मायेच्या ज्ञानामध्ये बळवान असतो.तर दूसरा अगमच्या देशाच्या ज्ञानामध्ये अत्यधिक बलवान असतो. ।।३३।।

**ठोड़ ठोड़ संगत आ नांही ।। जां कुद्रत कळा उदे हुवे मांही ।।**
**इण कारण कोई भेद न पावे ।। सुणियां बिना कोण बिध आवे ।।३४।।**

जगात कुद्रतकला प्रगट केलेले अगम देशाचे बळवान असे मोठ मोठे संत असतात. परंतु ते फारच थोडे(बिरले)असतात.त्यांची संगत जागो जागी घराघरात होत नाही. त्यांची संगत विरळ्या जागीच होते.याकारणाने जगातील लोकांना कुद्रतकलेचा भेद ऐकायलाही मिळत नाही.जी वस्तु ऐकायला ही मिळत नाही.तर ती वस्तु लोकांमध्ये प्रगट कशी होईल? ।।३४।।

**बेद भेद जग मे ब्हो होई ।। इण कारण जाणे सब कोई ।।**
**आ कुद्रत कळा नाव की भाई ।। ठोड़ ठोड़ नही जग के माही ।।३५।।**

वेद आणि भेद जाणणारे जगात खुप आहेत.याकारणाने वेद भेदाला छोट्या पुरुषांपासून मोठ्या पुरुषांपर्यत सर्व कोणी जाणतात.परंतु ही निजनामाची कुद्रतकला जाणणारे जागी–जागी जगात राहत नाही.यामुळे असे जगातील छोट्या पुरुषांपासून मोठ्या पुरुषा पर्यंत कोणी जाणत नाही. ।।३५।।

विठ्ठलराव वाच ।।

**विठलराव अब कहे पुकारी ।। तुम तत्त ग्यान सब सूं कहो भारी ।।**

तो जग मांय क्यूं फेल्यो नाही ।। जो कुछ बड़ो प्राक्रम माही ।।३६।।

विठ्ठलराव आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलले की,आपण तत्त ज्ञान,वेद, भेद,लबेद यांना सर्वांपेक्षा भारी सांगतात.तर ते तत्त ज्ञान आपल्याच बळाने जगात फैलला(पसरले)का नाही.जर या तत्तज्ञानात वेद,भेद,लबेद सर्वांपेक्षा मोठा पराक्रम आहे.तर तो स्वत:च्या बळावर पसरायला हवा होता. ।।३६।।

बेद भेद तुम ऊला कीया ।। तो सबही जक्त धार किऊं लीया ।।
जाग जाग सब के मन भावे ।। खट द्रसण बेराग संबावे ।।३७।।

विठ्ठलरावाने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगीतले की,आपण तत्तज्ञानाचे वेद, भेद,खालचे आहेत.असे सांगत आहे तर वेद,भेद हे जगातील लोकांनी धारण का केले.जगातील लोकांनी वेद,भेद न धारण करता तत्तज्ञानच धारण करायला हवे होते, हे वेद भेदाचे ज्ञान जागो जागी सर्वांच्या मनाला का आवडते?या वेद भेदाच्या ज्ञानाला जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी,फकीर,ब्राम्हण हे सहा दर्शनी व बैरागी हे सर्व धारण का करतात?।।३७।।

सुखो उवाच ।।

क्हे सुखराम सुणो बिध आणी ।। बेद भेद फेल्या इम जाणी ।।
जिण कारण अे जगमे आया ।। से सब भोग बेद मे गाया ।।३८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की,वेद भेद जगात का पसरले त्याचे कारण ऐका. हा हंस शब्द, स्पर्श, रुप,रस,गंध या इंद्रियांच्या विषयांच्या सुखाकरीता पारब्रम्हातून मायेच्या जगात आला.वेद भेदाने हंस ज्या कारणाने पारब्रम्हातून मायेत आला ते सर्व भोग मिळण्याच्या विध्या वेगवेगळया प्रकारे गायल्या आहेत.।।३८।।

भोग मिले नाना बिध सारा ।। सो बेदाँ मे कहया बिचारा ।।
इण कारण धारे सब आई ।। मोख सुख नही सुझे भाई ।।३९।।

हंसाला वेगवेगळ्या प्रकारचे पाची इंद्रियांचे भोग मिळतील.अश्या नाना प्रकारच्या विध्या वेदात सांगीतल्या आहेत.याकारणाने जगातील सर्व लोक यांना धारण करतात.जगातील लोकांना मोक्षाचे सुख शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या सुखांपेक्षा वेगळे आहे.भारी आहे हे समजवणारा मिळत नाही.याकरीता मोक्षाचे सुख समज नाही.त्यामुळे कुद्रत कला धारण करीत नाही. ।।३९।।

बेद जक्त स्वारथ ले गाया ।। तीन लोक का सुख बताया ।।
जो आतम कूं भावे भाई ।। सो बेदां मे स्मझ बताई ।।४०।।

ब्रम्हाने जीव मोक्षाला जावा व जीवाचा काळ सुटावा या चाहनेने वेद गायले नाहीत. बनवलेली तीन लोकांची सृष्टी टिकायला हवी.या स्वार्थाने वेद गायले.जीव हा अमर

तत्त आहे व जीवाच्या सोबतचे मन व पाच आत्मा हे माया तत्व आहे.मन व पाच आत्मा अमरलोकात कधी ही जाऊ शकत नाही व ब्रम्हतत्व जीव अमरलोकात कधी ही जाऊ शकतो.हे ब्रम्हाला माहित आहे.हे मन व पाच आत्म्याला आवडतील.अश्या सुखाच्या विध्या बनविल्या तर मन आणि पाच आत्मा त्या विध्यांमध्ये गुंतून राहील. जीव मन व पाच आत्म्याच्या वश आहे.यामुळे जीव पण याच्या सोबत तीन लोकांच्या सुखांमध्ये बरोबर अटकलेला राहील.ज्या कारणाने सृष्टी उजाड होणार नाही.असा स्वार्थ ठेवून ब्रम्हाने वेदात समज सांगीतली आहे. ।।४०।।

**विठलराव तत्त ग्यान न फेल्यो ।। सो कारण इण जक्त न झेलयो ।।**
**ओ ओ आतम का सुख अेक न गावे ।। उलटा नाव मरण बिध लावे ।।४१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावास बोलले की,हे विठ्ठलराव हे तत्तज्ञान जगाने यामुळे झेलले नाही.म्हणून जगात पसरले नाही.हे तत्तज्ञान मन व पाच आत्मा यांचे एक ही सुख गात नाही.उलट पाच आत्मा व मनाला मारण्याची विधी बनवितात. ।।४१।।

**आत्म राज जक्त मे होई ।। प्रमात्म को राज न कोई ।।**
**यांरी संगत जीव बुध धारी ।। आनंद लोक कूं दियो बिसारी ।।४२।।**

जगात मन व पाच आत्म्यांचे राज्य आहे. येथे परमात्मा म्हणजे वैराग्य विज्ञानाचे राज्य नाही. यामुळे हंसाने वेदात दिलेल्या पाच विकारांच्या सुखांची जीवबुध्दी धारण करुन घेतली.ज्यामुळे आनंद लोकात पोहचविणारे हंस बुध्दी मध्ये भुल पडून गेली. ।।४२।।

**यारी संगत जीव होय बेठा ।। इण कारण तत्त गहे न सेंठा ।।**
**क्हे सुखराम राव सुण आई ।। यूं वो ग्यान न फेले भाई ।।४३।।**

वेदांच्या पाच विकारांच्या सुखाच्या संगतने हंस,हंसाचा जीव होऊन बसला.याच कारणाने हंसांनी तत्त श्रेष्ठ असूनही धारण केले नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला बोलले की,यामुळे कुद्रतकेलेचे ज्ञान जगात पसरले नाही. ।।४३।।

**सोभा देख सकळ जग गावे ।। कुद्रत कळा सकळ मन भावे ।।**
**इण की रीत कठण सो होई ।। तिण कारण धर सके न कोई ।।४४।।**

अगमच्या सुखाला जाण्याची कुद्रतकला ऐकून,कुद्रतकलाची सर्व लोक शोभा करतात व त्यांच्या मनाला कुद्रत कला खुप आवडते.परंतु कुद्रत कलेची रित खुप कठीण असल्याने कोणी धारण करु शकत नाही. ।।४४।।

**कठण चाल यांकी नही आवे ।। ब्रम्ह तेज सहयो नही जावे ।।**
**जाणे सही इधक आ होई ।। तो पण धार सके नही कोई ।।४५।।**

कुद्रत कलेची चाल खुप कठीण आहे. ती चाल हंसाकडून चालली जात नाही. या चाल

मध्ये हंसाला ब्रम्हतेच सहन करावे लागते.ज्या ब्रम्ह तेजाने हंसापासून मन व पाच आत्मा सुटतात.हंस कुद्रतकला वेदाच्या कलांपेक्षा भारी आहे.काळापासून मुक्त करणारी आहे.चांगली आहे,हे समजतो.तरीही हंस मन व ५ आत्म्यांच्या मोह मायेच्या वश मध्ये झाल्या कारणाने कुद्रत कला धारण करु शकत नाही. ।।४५।।

**विठ्ठलराव इण कारण सोई ।। तत ग्यान नही फेल्यो कोई ।।**
**तीन लोक का सुख उड़ावे ।। अणंद लोक तां को जस गावे ।।४६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगीतले की,या कारणांनी जगात तत्तज्ञान पसरले नाही.तत्तज्ञान तीन लोकातील पाच आत्म्यांचे सुख उडवितो(म्हणजे विकारांचे सुख उडवितो)व आनंद लोकाचे वैराग्य विज्ञानाच्या सुखांची महिमा करतात. ।।४६।।

**अे करण में वां कुछ नाही ।। किस बिध जीव मिलावे माही ।।**
**कूंची क्रम ध्रम नही सेवा ।। मंत्र इष्ट नही कोई देवा ।।४७।।**

वेदांच्या विध्या साधण्यात कुद्रत कला प्रगट होण्याची रीत नाही.तर आता कोणत्या विधीने हंसाला आनंदलोकात पोहचवता येईल हे सांगा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला विचारले आनंद लोकात पोहचविण्याकरीता योगाभ्यासाची कुंची म्हणजे चाबी वेदाचे कर्म, धर्म मायेच्या देवतांची सेवा, मंत्र, इष्ट तसेच देवतांची भक्ती यांचा कोणाचाही उपयोग घेता येत नाही. ।।४७।।

**आतम रीत सेजे यों होई ।। बो बिद बिना थंबे नही कोई ।।**
**तत्त ग्यान मे कछु न मावे ।। इण कारण जग नांय संभावे ।।४८।।**

वेदाच्या आत्मा व मनाने होणाऱ्या विध्या जीवाने सहजमध्ये होऊन जातात.परंतु मोक्षाला पोहचविणारी कुद्रतकला,वैराग्य विज्ञानाच्या शिवाय घटात प्रगट होत नाही.या कारणाने तत्तज्ञानात वेदाची पाच आत्म्यांची व मनाची एक ही विधी उपयोगात येत नाही व तत्तज्ञानात मन व पाच आत्मा हंसापासून वेगळया होऊन जातात. याकरीता मन व पाच आत्मा हंसाला तत्त विज्ञान धारण करुही देत नाही. ।।४८।।

**तत्त के मांय कछु नही मावे ।। तो किण रीत कर हंसा पावे ।।**

तत्तचे पद कुंची,कर्म,धर्म,सेवा,मंत्र,इष्ट देतांची भक्ती याच्यातील एकाही विधीचा उपयोग करुन तत्त प्राप्त करु शकत नाही.तर हंस हे तत्त कोणत्या रीतीने प्राप्त करु शकेल.

विठ्ठलराव वाच ।।

**विठलराव अब बोल्या छाणी ।। काय रखे कोण बिध प्राणी ।।४९।।**

विठ्ठलरावाने विचार करुन आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विचारले की,प्रत्येक

प्राणी तत्तमध्ये मिळू चाहतो.मिळण्याकरीता कुंची,कर्म,धर्म,सेवा,मंत्र इत्यादी एक ही उपाय कामी येत नाही.तर प्राणी तत्तमध्ये मिळण्याकरीता कोणत्या उपायांना देहाशी लावून ठेवेल. ।।४९।।

सुखो वाच ।।

क्हे सुखराम देहे के तांई ।। करो सकळ बिध कारण नाही ।।
मोख काज बिध अेक न चहिये ।। सत्तगुरू सर्णे प्रीत कर रहिये ।।५०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की,ह्या सर्व विध्या देहाच्या सुखाकरीता म्हणजे आत्म्याच्या सुखाकरीता आहेत.ह्या विध केल्याने हंसाला मोक्ष मिळत नाही.हंस काळापासून सुटत नाही.हंसाला मोक्षाला जाण्याकरीता वेदातील मायेची एक ही विधी करावी लागत नाही.हंसाला ज्या सतगुरुच्या देहात कुद्रतकला प्रगट झाली आहे.अश्या सतगुरुच्या शरणात जावे लागते व त्या सतगुरुशी प्रित करावी लागते.म्हणजे जे मायेच्या देवतांच्या देहाच्या शरणात जावे लागते व प्रिती करावी लागते. अश्या सतगुरुच्या देहाच्या शरणात जावे लागत नाही व सतगुरुच्या देहाशी प्रित करावी लागत नाही.सतगुरुच्या देहात प्रगट झालेल्या कुद्रत कलेच्या शरणात जावे लागते व या कुद्रत कलेशी प्रेम करावे लागते. ।।५०।।

प्रेम उपावे तत के तांई ।। कुद्रत कळा प्रगटे माई ।।
सतगुरू दया राम रटे कोई ।। ने: अंछर प्रगट तब होई ।।५१।।

सतगुरुमध्ये जे तत्त आहे.त्याच्याशी प्रेम उत्पन्न केल्याने हंसाच्या घटात कुद्रतकला प्रगट होऊन जाते.अशी कुद्रत कलारुपी सतगुरुची दया प्राप्त करुन म्हणजे मेहेर प्राप्त करुन रामचे म्हणजे परात्परी परमात्म्याचे रटण करेल.म्हणजे स्मरण करेल तर हंसाच्या घटात ने: अक्षर म्हणजे तत्त म्हणजे कुद्रतकला प्रगट होईल. ।।५१।।

प्रेम प्रीत सूं जागे भाई ।। प्रेम प्रेम सुंइ उलटे माई ।।
प्रेम प्रेम सूं पिछम आवे ।। प्रेम प्रेम सब किल्ला ढावे ।।५२।।

ही कुद्रतकला हंसाच्या घटात सतगुरुच्या देहात जे तत्त आहे.त्याच्याशी प्रेमप्रित केल्यावर जागृत होते व कुद्रतकलेशी प्रेम प्रित केल्याने ती कुद्रतकला हंसाच्या घटात पश्चिमच्या रस्त्याने उलटते आणि त्या कुद्रतकलेशी प्रेम प्रित केल्यानेच रस्त्यात येणारे सर्व छोटे मोठे किल्ले म्हणजेच अड्थळे कुद्रतकला नष्ट करते व हंसाला गगणात चढवून देते.।।५२।।

नाव प्रेम के सुण बस भाई ।। प्रेम बिना नही और उपाई ।।
प्रेम माय बिध ओर बिचारे ।। तो ज्यूं निमक दूध मे डारे ।।५३।।

हे तत्त म्हणजे कुद्रतकला म्हणजे ने:अक्षर म्हणजे निजनाम हे हंसाच्या प्रेम प्रितच्या

बसमध्ये आहे.प्रेम–प्रितशिवाय हंसाला घटात निजनाम प्रगट करण्याचा कोणता दूसरा उपाय नाही.हंसाला तत्तच्या सोबत प्रेम–प्रितच्या उपायाशिवाय वेदाचे,मन आणि तनाचे हठचे उपाय हे तत्त प्राप्त करण्याकरीता कोणत्याही कामाचे नाही.जसे दुधात मिठ टाकले तर दुधाचा नाश होतो.तसेच तत्त प्राप्त करण्यात वेदाचे दूसरे उपाय केले तरी हंसाच्या घटात तत्त प्राप्त होत नाही. ।।५३।।

**नाव उलट गिगन चड जावे ।। फाड़ पीठ सिखर मे आवे ।।**
**मिणिया सकळ फोड़ के भाई ।। मेर डंड कुं बींदे जाई ।।५४।।**

हे निजनाव हंसाच्या प्रेमानेच घटात प्रगट होते.हंसाच्या प्रेमानेच घटात उलटते. हंसाच्या प्रेमाने गगणात चढून जाते.हंसाच्या प्रेमानेच पाठीचे सर्व २१ मणींना फाडून मेरदंडला छेदून शिखरावर चढून जातो.।।५४।।

**सिर उपर होय त्रुकुटी आया ।। लागो ध्यान नेण पलटाया ।।**
**अबे चडया नाव अगम दिस भाई ।। बिना प्रेम नही ओर उपाई ।।५५।।**

हंसाच्या प्रेमाने हे निजनाम शिराच्यावर त्रिगुटीत येते.तेव्हा त्रिगुटीमध्ये हंसाला तत्तचे ध्यान लागते व हंसाचे नेण पलटते.त्रिगुटीला पार करुन निजनाम अगम दिशेत चढतो अश्या अगम देशात जाण्याकरीता हंसाला तत्तशी प्रेम प्रगट करण्याच्या उपाया शिवाय दूसरा कोणताही उपाय नाही.।।५५।।

विठलराव वाच ।।

**विठलराव अब बूज्यो आणी ।। किण सूं प्रेम करे ओ प्राणी ।।**
**तुम देवळ देव बिध नही राखी ।। निराधार प्रेम बिध भाखी ।।५६।।**

विठ्ठलरावने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगीतले हा प्राणी प्रेम तरी कोणाशी करेल?आपण देवल आणि देव तसेच वेदाची,कुंची.मुद्रा इ.कोणतीही विधी नाही ठेवली.निराधार म्हणजे जगाच्या प्राणीला समजेल असे देव,देवल वेदातील कुंची मुद्रा यांच्या आधारा शिवाय प्रेम करण्याची विधी सांगीतली. ।।५६।।

**क्हो जी प्रेम कोण सुं लागे ।। बिना सुध केसे कोई भागे ।।**
**करणी ग्यान ध्यान नही राख्यो ।। निराधार प्रेम तुम भाख्यो ।।५७।।**

आता आपण सांगा हंसाच्या समोर देव,देवल,करणी,ज्ञान,ध्यान,कुंची,मुद्रा हे काहीच नाही आहे.तर त्याला प्रेम कोणाशी लागेल.त्याला कोणशी प्रेम करायचे आहे ही समजच नाही आहे तर प्रेम करण्यात धाव कशी लावतील.आपण प्रेम करण्याकरीता करणी, ज्ञान,ध्यान या कोणाचा काही ही आधार राहत नाही.तर प्राणी जी आपण निराधार प्रेम करण्याची रीत सांगीतली ती कसे धारण करेल.।।५७।।

सुखो उवाच ।।

क्हे सुखराम प्रेम आधारा ।। सतगुरू सरण एक बिचारा ।।
और सरणो कोई नही चहिये ।। आपी उलट आप मे रहिये ।।५८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की, मी जे प्रेम सांगत आहे ते निराधार नाही.पूर्ण आधाराने आहे.सतगुरुच्या तनात सर्व सृष्टीचा मालक प्रगट झाला आहे.त्याचा आधार आहे.अश्या सतगुरुच्या घटात प्रगट झालेले सर्व सृष्टीच्या मालकाच्या शरणात राहण्याचा एकच विचार ठेवायला हवा व दुसऱ्याच्या शरणात जाण्याचा म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेव,आदि शक्ति,वेद,भेदाच्या शरणात जाण्याचा कोणाताही विचार ठेवायला नको.त्याच्याने सतगुरुच्या घटात जो तत्त प्रगट झाला आहे.त्याच्याने हंसाला आपोआपच प्रेम येते व प्रेम येताच कुद्रतकला घटात प्रगट होते व हंस स्वतःच्या घटात उलटून घटात प्रगट झालेले व तत्तमध्ये आपोआपच मिळून जातो. ।।५८।।

जो चावे सो सत्तगुरू होई ।। आनंद ब्रम्ह राम क्हुं तोई ।।
और न दूजी आसा कांही ।। प्रेम लगे गुरचरणा जांही ।।५९।।

मोक्षात जाण्याकरीता म्हणजे आनंदब्रम्हमध्ये किंवा रामजीच्या पदामध्ये जाण्याकरीता आनंदब्रम्ह म्हणजे रामजीचा शरणा हवा.आनंदब्रम्ह म्हणजे रामजीशी प्रेम व्हायला पाहिजे. आनंदब्रम्ह म्हणजेच रामजी तर सर्व व्यापी आहे.तर असे आनंदब्रम्ह किंवा रामजीचा त्याला प्राप्त करण्याकरीता आधार कसा घेणार.यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला बोलले की,आनंदब्रम्ह म्हणजे रामजी सर्व व्यापी आहे.परंतु हंसाला समजेल असे प्रगट रुपात नाही आहे.म्हणून अश्या रामजीशी प्रेम करता येत नाही व शरणात जाता येत नाही.तोच रामजी सतगुरुच्या घटात प्रगट झालेला असतो. याप्रकारे सर्व व्यापी परंतु न समजणारे रामजी व सतगुरुच्या घटात प्रगट झालेल्या सतज्ञानाने समजणारे रामजी एकच आहे.अशी समज आली पाहिजे. अशी समज आल्याने हंसाला जी महासुखाच्या मोक्ष पदाची चाहणा आहे ते पद देणारे हे तत्तधारी सतगुरुच आहे. असे समजायला लागते. तर असे आनंदब्रम्ही सतगुरु मिळाल्यावर मायेच्या कोणत्या देवता वा विधीची आशा राहत नाही.असे हंसाच्या निजमनाला कुद्रतकला रुपी गुरुच्या चरणात प्रेम लागून जाते.अश्या शिष्याचे गुरुच्या देहाच्या चरणाशी नाही.गुरुमध्ये प्रगट झालेल्या तत्तच्या चरणात प्रेम लागते. ।।५९।।

असो हेत गुरां सूं लागे ।। तन मन गयां भरम नही जागे ।।
तब वो प्रेम उमंग घट आवे ।। नेः अंछर तन माय जगावे ।।६०।।

सतगुरुच मोक्षाला घेऊन जाणारे सत परमात्मा आहे असे हंसाला समजते तेंव्हा सतगुरुशी प्रेम होते.अश्या प्रेमात शरीराला कितीही कष्ट पडोत शरीर भंगही होण्याच्या स्थितीत

येऊन गेला,मनाला कितीही कष्ट पडेत तरी ही त्या हंसाला सतगुरुच्या प्रति प्रगट झालेले ते प्रेमात जरासेही भ्रम किंवा फरक येत नाही.अशी स्थिती हंसाची बनते तेंव्हा हंसाला त्याच्या घटात सतगुरुशी प्रेम उमंग येतो.असे प्रेम उमंग येताच घटात ने:अक्षर जागृत होते. ।।६०।।

**प्रममोख का सत्तगुरू दाता ।। सब कर्णी का गुरू ही बिधाता ।।**
**पारब्रम्ह सत्तगुरू ही भ्यासे ।। तब उरका कंवळ वो प्रेम प्रकासे ।।६१।।**

पारब्रम्ह परममोक्षाचे सुखाचे दाता आहेत.तसेच पारब्रम्हच तीन लोकाच्या सर्व करण्यांचे सुखाचे विधाता आहे.असे जेंव्हा भासते तेंव्हाच हंसाला सतगुरुच परममोक्षाचा दाता आहे व सतगुरुच सर्व करण्याचे विधात आहे असे दिसते असे दिसताताच हंसाच्या उरात सतगुरुशी म्हणजे कुद्रतकलेशी म्हणजे पारब्रम्हची प्रेम येते. ।।६१।।

**प्रेम जग्यो हर नाव प्रकासे ।। एक दिवस भर ढील न पासे ।।**
**दुलभ प्रेंम वो आवे नाही ।। तब लग नाव न जागे माही ।।६२।।**

असे प्रेम जागृत झाल्याने हंसाच्या घटात म्हणजे निजनाम प्रकाशित होऊन जाते.असे प्रेम आल्यावर हे नाव प्रकाशित होण्याला एका दिवसाचाही वेळ लागत नाही.परंतु असे प्रेम येणे दुर्लभ आहे.कठिण आहे.जोपर्यत असे प्रेम येत नाही.तोपर्यत निजनाम हंसाच्या घटात प्रगट होत नाही. ।।६२।।

**और उपाव प्रेम के नांही ।। सतगुरू दया प्रकासे मांही ।।**
**मुख केणे को काम न कोई ।। कुद्रत कळा दया वां होई ।।६३।।**

सतगुरुची मेहेर होऊन आनंदपद घटात प्रकाशित करण्याकरीता सतगुरुशी प्रेम करण्या सिवाय आणखी कोणता उपाय नाही.सतगुरुने जगाच्या मायावी साधु सिध्दीं सारखे तोंडाने कुद्रतकलेची दया होऊन गेली असे सांगीतले तरी ही कुद्रतकलेची प्रकाशित होण्याची दया होत नाही.याकरीता हंसाच्या घटात कुद्रतकलेला प्रकाशित करण्यात सतगुरुच्या मुखाने सांगण्याचे काही काम नाही. ।।६३।।

**ओर ग्यान के अनंत उपाई ।। तत ग्यान के एक ही भाई ।।**
**सत्तगुरू टाळ प्रेम ही आवे ।। तोई ने: अंछर वो नाव न पावे ।।६४।।**

दुसऱ्या सर्व ज्ञानांना प्रगट करण्याकरीता अनंत उपाय आहे. परंतु या तत्त ज्ञानाला प्रगट करण्याकरीता एकच उपाय आहे.तो उपाय म्हणजे सतगुरुला कुद्रतकला समजून त्या कुद्रतकलेशी प्रेम करणे.सतगुरु टाळून अन्य कोणत्या मायेच्या उपायाने प्रेम ही येवून गेले तरी ही ने:अक्षर नाम घटात प्रगट होत नाही व सतगुरुशी प्रेम ही नाही तसेच ब्रम्ह मायेशी ही प्रेम नाही तरी ही नाव घटात प्रगट होत नाही. ।।६४।।

**केतो ब्होत स्मज युं लाई ।। केतो एक बचन मे भाई ।।**

सत्तगुरू सूं दुबद्या कछु नाही ।। ऐसो मिले नीर पय माही ।।६५।।

याकरीता ने:अक्षरला घटात प्रगट करण्याकरीता एक तर खुप समज आणून सतगुरुतील ने:अक्षराशी प्रेम लावा किंवा एका वचनानेच सतगुरुतील ने:अक्षराशी प्रेम लावा व सतगुरुतील ने:अक्षराशी कोणती दुविधा म्हणजे अंतर ठेवू नका.जसे दुधात पाणी मिळून जाते.तसे सतगुरुत प्रगट झालेले त्या ने:अक्षरात म्हणजे ब्रम्हतत्वात मिळून जा.।।६५।।

विठ्ठलराव ऊवाच ।।

सत्तगुरू म्हेर सुणी हम आगे ।। आप कहो सो अरथ न लागे ।।
वां तो कहयो दया कर देवे ।। तम कहो कुद्रत कळा कर लेवे ।।६६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांशी विठ्ठलराव बोलले की,सतगुरुची मेहेर तर आम्ही आधी ही ऐकली आहे.परंतु आपण जे सांगत आहात त्याचा अर्थ समजण्यात येत नाही.आधी जे संत मला मिळाले.त्यांनी सांगीतले की सतगुरु दया करतात.तेंव्हा मोक्षाचे काम होऊन जाते आणि आपण सांगतात की,सतगुरुची मेहेर करुन घ्यावी लागते.।।६६।।

आगे दया म्हेर जन गाई ।। गुरू प्रताप सत संग माई ।।
आप कहो सो रीत न्यारी ।। आ गम नही कम को भारी ।।६७।।

आधी जे संत होउन गेले त्यांनी ही गुरुची मेहेर आणि गुरुच्या दयेचे वर्णन केले आहे. तसेच त्यांनी सांगीतले की,गुरुमध्ये जगातील लोकांना संसारातून मोक्षात पाठविण्याचे सत्त म्हणजे प्रताप राहतो.परंतु आपण सांगतात ती रीत या विधी पेक्षा वेगही आहे. याच्यात मला काही समजमध्ये यंत नाही.यांच्यात कमी कोणते आहे आणि जास्त कोणते आहे.आपण जे सांगत आहात ते जास्त आहे किंवा आधीच्या संतांनी जे सांगीतले ते अधिक आहे हे माझ्या समज मध्ये येत नाही. ।।६७।।

वां तो कही संत कोई आवे ।। म्हेर करे तो भेद बतावे ।।
आप क्हो क्हेणो कुछ नाही ।। जागे नाव प्रेम सुं माही ।।६८।।

आधी भेटलेल्या संतांनी सांगीतले की कोणी संत येतील ते सतगुरु मेहेर करतील तर भेद सांगून देतील आणि आपण सांगतात की,गुरुच्या सांगण्याचे काही काम नाही. गुरुच्या तोंडाने सांगीतल्या शिवायच मेहेर होऊन जाते.ती मेहेर केवळ गुरुंवर प्रेम झाल्यावर होऊन जाते आणि शिष्यात नाम जागृत होउन जाते. ।।६८।।

वां तो कहयो नाँव सुं लागो ।। बेद क्रम कर निस दिन जागो ।।
साझन अेक संबावो आई ।। प्रीत करो साहेब सुं भाई ।।६९।।

आधी भेटलेल्या संतांनी सांगीतले की वेदात सांगीतलेल्या नामाशी लागा व वेदाचे कर्म करुन त्या किया कर्मात जागृत रहा.गाफील राहू नका आणि केवळ वेदाच्या कर्माची

एकमात्र साधना करा व साहेबाशी प्रित करा. ।।६९।।

**आप कहो गुरूई हरी होई ।। सत्तगुरू बिना और नही कोई ।।**
**गुरू ही नाँव नेम पत सारा ।। गुरू ही सिंवरण ध्यान बिचारा ।।७०।।**

आणि आपण सांगतात वेद भेदात साहेब नाही. साहेब सतगुरुत आहे. आपण सांगतात की सतगुरुच साहेब आहे.सतगुरु शिवाय साहेब वा हरी आणखी कोणी नाही.सतगुरुच प्रगट निजनामाच्या रुपात आहे.त्यांचाच नियम ठेवा.त्यांचाच विश्वास ठेवा.असे सतगुरुत प्रगट झालेल्या त्या निजनामाच्या ज्ञानाचाच विचार करा.त्या निजनामाचे स्मरण करा, त्या निजनामाचेच ध्यान करा. ।।७०।।

**विठलराव यूं बोल्यां आई ।। आप न्यावकर दो समझाई ।।**
**वां तो कहयो तन मन माया ।। हर लेखे कर दो सब भाया ।।७१।।**

विठ्ठलराव आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलले की,आपण मला न्याय करुन समजवा आधी भेटलेल्या संतांनी असे सांगीतले की हे तन,मन व माया हरी लेखे करुन द्या.म्हणजे हरीला अर्पण करा आणि आपण सांगतात तन,मन हरीला अर्पण केल्याने साहेब मिळत नाही.हरी तर फक्त सतगुरुच्या घटात प्रगट झालेल्या त्या साहेबाशी प्रित केल्यानेच मिळतो. ।।७१।।

सुखो वाच ।।

**विठलराव सुण बचन हमारा ।। न्याव करूं भांजूँ भ्रम थारा ।।**
**इण को अर्थ ये सुण भाई ।। वां हद बेहद की दोड़ बताई ।।७२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की,माझे वचन ऐक मी तुमचे सर्व भ्रम ज्ञानाच्या न्यायाने मिटवून देतो.याचा अर्थ हा की ते आधी भेटलेल्या संतांची पहुँच हद-बेहद पर्यतचीच होती.यामुळे त्यांनी हद-बेहद पर्यत पोहचविण्याची धाव तुम्हाला सांगीतली ।।७२।।

**बेहद तो साझन सुंई जावे ।। वां साहयो सोई आण बतावे ।।**
**इण मे झूट कछु नही भाई ।। प्रेम जोग बिध वां नही पाई ।।७३।।**

बेहदमध्ये तर वेदाची साधना करुन जाता येते.त्यांनी जी साधना केली ती साधना दुसऱ्यांना सांगीतली.त्यांचे सांगणे काही खोटे नाही.तुम्हाला आधी मिळालेल्या संतां जवळ मी जो प्रेमयोग सांगत आहे ती विधी नव्हती.त्यांना ही प्रेम योगाची विधीच मिळाली नाही. याकरीता जगाला त्यांनी प्रेम योगाची विधी सांगीतली नाही. त्यांच्या जवळ बेहदपर्यत पोहचविण्याची साधना होती तीच दाखविली. ।।७३।।

**जे जे रिषी जोगेश्वर हूवा ।। ग्यान ध्यान वाँरा सब जूवा ।।**
**पिंडत बेद ब्यास गत न्यारी ।। जन औतार अेक बिध धारी ।।७४।।**

आणि आधीचे जे जे ऋषी आणि योगेश्वर झाले त्यांचे सर्वांचे ज्ञान वेगळे आणि ध्यान ही वेगळे होते.ऋषी(जैमिनी,कणाद,गौतम,पातंजली,कपील,वेदव्यास इ.)

जैमीनी ऋषी–कर्माला ठरवतो.

गौतम ऋषी–ईश्वर परमात्म्याला सत्य ठरवितो.

पातंजली–योग सांगतात.

कपील–आत्म्याला माणण्यास सांगतो.

वेदव्यास–अद्वैत मानून सर्व ब्रम्हच आहे.

याप्रकारे हे ऋषी,आपले–आपले ज्ञान,वेगळे वेगळे सांगतात.याप्रकारे योगेश्वर(कवी, हरी, अंत्रिक्ष,प्रबुध्द,पिप्लायन,अविहौत्र,दुमिळ,चमस,करभाजन इ.)

कवी–हे भक्ति करण्यास सांगतात.

हरी–आत्म स्वरुपाला बघण्यास सांगतात.

अंत्रिक्ष–रचना,स्थिती,लय हे सांगतात.

प्रबुध्द–मिश्रीत भक्ती करणे सांगतात.

अविहौत्र–मूर्तिपूजा करण्यास सांगतात.

दुमिळ–अवतारांना मानण्यास सांगतात.

करभाजन–हरी किर्तन आणि विविध प्रकारांनी पूजा करण्यास सांगतात.

याप्रकारे ऋषी आणि योगेश्वरांचे ज्ञान वेग–वेगळे आहे.याप्रकारे पंडीत आणि वेदव्यास यांची गती वेगळी–वेगळी आहे.जन(संत)आणि अवतार यांनी एक विधी धारण केली. ।।७४।।

**सिध की म्हेर बचन सुं होई ।। बिना बचन दिल फळे न कोई ।।**
**इनकी म्हेर फळां की भाई ।। मोख ब्रम्ह नही बचना माई ।।७५।।**

जसे सिध्दाची मेहेर तोंडाने वचन बोलण्यानेच होते ते सिध्द तोंडोन वचन बोलणार नाही तर सिध्दाईचे फळ लागत नाही.त्यांची मेहेर मायेच्या फळाचीच आहे.त्याच्या मेहेरने मोक्षाचे फळ कधीच लागत नाही.मोक्षाचे फळ आनंदब्रम्हच्या मेहेरने लागते मायेने लागत नाही.मुखही माया आहे.आनंदब्रम्ह नाही.याकरीता मोक्षाचे फळ सिध्दांच्या मुखाच्या वचनाने लागत नाही. ।।७५।।

**आई अवतार रीत सुण होई ।। पिंडत ब्यास रिष की क्हुँ तोई ।।**
**अे बचना सूं मारे तारे ।। हद बेहद का कारज सारे ।।७६।।**

ही रीत अवतार,पंडीत,व्यास,ऋषी या सर्वांची आहे.ते वचनानेच तारतात.त्यांच्या वचनाने हद–बेहदपर्यत तीरणे होते.परंतु हद–बेहदच्या पलिकडे अगम देशाला पोहचणे होत नाही. ।।७६।।

पण अगम देस बचना मे नाही ।। बिन कुद्रत कळा न पहुँचे क्हाँ ही ।।
यूं जन की म्हेर दिल्ल की भाई ।। पवन बिना गिगन जाँ जाई ।।७७।।

अगमदेश हा मुखाच्या वचनाच्या मेहेरमध्ये होत नाही.अगम देशाला पोहचायचे आहे तर कुद्रतकलेची मेहेर हवी.याप्रकारे संतांची मेहेर संतांचे दिल(हृदय)निजमन प्रसन्न झाल्यावरच होते.त्या संतांचे निजमन प्रसन्न झाल्याशिवाय श्वासाच्या साधनेने हंस गगणात म्हणजे दहाव्याद्वारात पोहचून जातो. ।।७७।।

यांरी म्हेर सकळ हद माँही ।। घणा घणी तो बेहद जाँही ।।
आ दिलकी मेहर अगम घर जावे ।। हद बेहद कोई थाह न पावे ।।७८।।

सिध्द,अवतार,पंडीत,व्यास,ऋषी या सर्वांची मेहेर हद म्हणजे तीन लोकांपर्यतच आहे. त्यांच्या मेहेरचा अधिकाहून अधिक जोर लागला तर हंस बेहद म्हणजे तीन लोकांच्या पलिकडे पारब्रम्ह होनकाळ पर्यत पोहचतो.अगम घरी पोहचत नाही.परंतु सतगुरुच्या निजमनाची मेहेर हद–बेहदच्या पलिकडे अगम घरी पोहचते.हद तसेच बेहद मध्ये पोहचणारे संतांना अगम घरी पोहचविण्याची मेहेरची जराही कला अवगत राहत नाही. ।।७८।।

तन की म्हेर जीव की होई ।। जड़ माया कर बक्से कोई ।।
बचन म्हेर चेतन की जाणो ।। सोहं लग की मेहेर पिछाणो ।।७९।।

अशी मेहेर वेग–वेगळ्या प्रकारची असते.मनुष्य देहाची मेहेर देहाने होते.त्या मेहेरने जड मायेचे काम होते.मनुष्याच्या चेतन हंसाची मेहेर वचनाने होते.ती पारब्रम्ह सोहम पर्यत पोहचविण्याचे काम करते.या मेहेरने अगम देश पोहचविण्याचे कारज होत नाही. ।।७९।।

ने:अंछर बचना मे नाई ।। ना कागद पर मंडयो न जाई ।।
कोण बिध कहो बक्से आणी ।। विठलराव स्मझो तत्त छाणी ।।८०।।

ने: अक्षर हे माया नाही.तसेच चेतन ही नाही.हे ने:अक्षर कागदावर न लिहीता येणारे तसेच वचनाने न बोलता येणारे अखंडीत ध्वनी आहे.अश्या निजनाम ध्वनीची मेहेर देह मायेने किंवा चेतन जीवब्रम्हचा आधार कसा होईल.याचा निर्णय सतस्वरुप तत्त ज्ञानाने समजून करा. ।।८०।।

आ तो मेहेर आद सें होई ।। सतगुरू बिना न माने कोई ।।
गुरू सब ध्यान बिध्याँ मत सारा ।। सब करणी गुरू मूळ बिचारा ।।८१।।

ही मेहेर तर आदि अनादी पासून होत आली आहे.ही मेहेर त्यांच्यावर झाली आहे.ज्यांनी सतगुरुच्या निजनावाच्या शिवाय कोणालाही मानले नाही.ज्यांनी ज्यांनी तत्तगुरुचेच ध्यान केले आहे.त्यांचे मत तसेच त्यांनी सांगीतलेली विधी केली आहे. ज्यांनी ज्यांनी

हे जाणले की,तत्तरुपी गुरुंनीच वेग-वेगळ्या करण्यां प्रमाणे सुख प्राप्त होण्याचे फळ ठरविले आहे. याप्रकारे वेद,भेद,लबेद या सर्व करण्यांचा मुळ दाता हा तत्तरुपी गुरुच आहे.अशी ज्यांची समज बनली आहे.त्याच्यावर तत्तरुपी संतगुरुची मेहेर झाली आहे. ।।८१।।

ने:अंछर सत्तगुरू मे होई ।। पारब्रम्ह प्रगट क्हुं तोई ।।
इण कारण सत्तगुरू कुंई माने ।। न्यारो कर ब्रम्ह केम पिछाणे ।।८२।।

सतगुरुतच ने:अक्षर आहे.सतगुरुतच पारब्रम्ह प्रगट आहे.याकारणाने सतगुरुला ने:अक्षर वा पारब्रम्ह मानून सतगुरुशी प्रित करतो.सतगुरुशी पारब्रम्ह किंवा ने:अक्षर वेगळे करुन कसे ओळखाल व त्या ने:अक्षराशी कशी प्रिती कराल? ।।८२।।

कुदरत कळा नाव की जागे ।। अेसी मेहेर भ्रम सब भागे ।।
बिन करणी दे गिगन चडाई ।। सो गुरू बिना जपे क्या भाई ।।८३।।

सतगुरुच्या मेहेरनेच हंसाच्या घटात कुद्रत कला जागृत होते.तसेच हंसाचे सर्व भ्रम पळून जातात.तसेच ते सतगुरु देहाची किंवा मनाची,वेदातील,श्वासाची कोणती ही क्रिया न करता गगणात म्हणजे दहाव्याद्वारात चढवून देतात. तर सतगुरुच्या शिवाय कोणाचा जप कराल ज्याच्याने करणी शिवाय हंस गगणात चढून जातो. ।।८३।।

अनहद घुरे नाद सिर बाजे ।। अनहद मे जन जाय ब्राजे ।।
अनंदलोक मे पहुँचे जाई ।। ओ गुण सब सत्तगुरू ही माई ।।८४।।

अश्या सतगुरुच्या मेहेरने आनंदचा नाद शिरामध्ये वाजतो. तसेच त्या अनहद ध्वनीत हंस जाऊन विराजमान होतो.अश्या सतगुंरुच्या मेहेरने हंस आनंदलोकात पोहचतो.हा आनंदलोकात पोहचण्याचा गुण सतगुरुच्या मेहेरमध्ये आहे.अशी आनंदलोकात पोहचविण्याची सत्ता सतगुरुंच्या शिवाय आणखी कोणामध्येही नाही.तर सतगुरुं शिवाय आणखी कोणाला कसे मानावे? ।।८४।।

ओर मेहेर कर मंत्र देवे ।। साझन ध्यान सबे सिष सेवे ।।
राज जोग मे बिध न काई ।। गुरू सुं हेत सोई जप भाई ।।८५।।

आणि सर्व सिध्द,ऋषी,जोगी,पंडित,अवतार मुखाच्या वचनाने मंत्र देऊन शिष्याला ज्ञान ध्यानाची साधना करायला सांगतात.तसे ते शिष्य देहाने किंवा मनाने हद-बेहदचे ज्ञान-ध्यानाची सेवा तसेच साधना करतात व मायेच्या पदाची प्राप्ती करतात.परंतु राजयोगात मुखाच्या वचनाने मंत्र देऊन ज्ञान ध्यान शिकविण्याची साधना नाही.हद-बेहदच्या पलिकडील आनंदपदाची प्राप्ती करायची आहे.तर गुरुशी प्रित करणे हीच विधी असते. याच्या शिवाय दुसरी कोणती जपाची विधी राहत नाही. हंसाच्या प्रिती करण्यातच ने:अक्षराचा जप येऊन जातो. ।।८५ ।।

**बेद भेद मे ज्यूं बिध होई ।। राजजोग मे गुरू क्हुँ तोई ।।**
**सत्तगुरू मॉय सबे बिध भाई ।। न्यारो हेत करे क्हाँ जाई ।।८६।।**

जसे वेद भेदात करण्या साधण्याची विधी असते.तशीच राजयोगात गुरुमध्ये प्रगट झालेल्या तत्तशी प्रेम करण्याची विधी असते.हद–बेहदच्या पलिकडे आनंदपद,आनंद ब्रम्हने मिळतो.हा आनंदब्रम्ह सतगुरुत ओतप्रोत असतो.आता सतगुरु सोडून आनंद ब्रम्हाशी प्रेम कोठे जाउन करणार ? ।।८६।।

**आ सुण मेहेर इसी बिध न्यारी ।। ओर म्हेर मे सब बिध सारी ।।**
**ओ तो अेक प्रेम सुं जागे ।। दूजो प्रेम अर्थ नही लागे ।।८७।।**

याप्रकारे सतगुरुशी मेहेर सतगुरुच्या तत्तशी प्रित होत नाही.याकारणाने सतगुरुची मेहेर सिध्द,ऋषी,पंडीत यांच्या मेहेर पेक्षा वेगळी आहे.सतगुरुची मेहेर फक्त एका प्रेमाने जागृत होते.सतगुरुची मेहेर सतगुरुंशी प्रेम सोडून दुसऱ्या उपायांनी हातात येत नाही.मग दुसऱ्या विधीने किती ही प्रेम आणा. ।।८७।।

**इम्रत जहर दोय हे भाई ।। यूँ अेसे मेहेर जक्त के मांई ।।**
**इम्रत तो कुद्रत सुंई होई ।। जेहेर ब्होत बिध करले सोई ।।८८।।**

जगात अमृत आणि विष दोन आहेत.याप्रकारे जालीम काळापासून काढण्याचा तसेच जालीम काळाच्या मुखात पडून राहण्याच्या दोन विध्या आधीपासून सृष्टीत आहेत. जसे अमृत कुद्रतपासून होते.ते बनवले जात नाही.परंतु विष खुपश्या विधीनी करता येते.अश्या जालीम काळापासून मुक्त होण्याचा सतस्वरुप मार्ग हा कुद्रतपासून आधीच बनलेला आहे.म्हणजे सतस्वरुप सतगुरुची मेहेर कुद्रतपासूनच होण्याची रित आहे.परंतु काळाच्या मुखात पडण्याचा मार्ग हा मायेच्या अनेक विध्यांनी धारण केल्याने बनत असतो.असेच अनेक विध्यांनी काळाच्या मुखात राहता येते.या सर्व विध्यांनी पोहच कोठपर्यंत आहे तर काळापर्यंत आहे.काळापासून काढणाऱ्या सतस्वरुप पर्यंत नाही. ।।८८।।

**के सुखराम अर्थ ओ होई ।। विठलराव भिन्न भिन कहयो तोई ।।**
**जो निजमन मान्यो भाई ।। तो कसर कोर राखो मत काई ।।८९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की,मी वेद काय आहे, भेद काय आहे,लबेद काय आहे?त्यांची पोहच कोठपर्यंत आहे.सतगुरु काय आहे? सतगुरुची मेहेर कशी होते?आनंदब्रम्ह हा सतगुरुच कसा आहे?इ.वेगवेगळ्या प्रकाराने सांगीतले.हे सर्व ऐकून तुमचे निजमन मी सांगीतलेल्या ज्ञानाला मानत असेल तर जी आनंदपदाची विधी सांगत आहे. तिला धारण करण्यात कोणतीही कसर ठेवू नकोस. ।।८९।।

जो निजमन माने सत्त भाई ।। तो कसर कोर राखो मत राई ।।
तन मन धन अर्पन सब कीजे ।। निराधार गुरू सर्णो लीजे ।।९०।।

जर तुझे निजमन त्या सतला मानत असेल तर हे राजा राजयोगाची विधी धारण करण्यात जराही(राई)इतकी ही कसर ठेवू नको व तन,मन तसेच धनातुनही मोह काढून तुझ्या निजमनाला सतगुरुला अर्पण कर व निराधार म्हणजे मायेच्या तन,मन,धनाचा तसेच वेदाच्या कर्माचा कोणता आधार न घेता गुरुच्या तत्तचा शरणा घे.।।९०।।

मोसर चूक न जाणो भाई ।। जे तत्त समझ धसी उर माही ।।
ज्यूं संता आगे बिध कीवी ।। सोई तम करो मोख वां लीवीं ।।९१।।

आज तत्त प्राप्त करण्याची संधी(वेळ)आली आहे.(अशी भारी वेळ)चुकवू नको.जर तुझ्या हंसाच्या उरा उरात तत्तची समझ धसली आहे तर हा तत्त धारण करण्याची वेळ हातातून जाऊ देऊ नकोस.आधीच्या संतांनी मोक्ष प्राप्त करण्याकरीता जी विधी धारण केली होती.ती विधी तु आज धारण कर. ।।९१।।

राजजोग की अे हे उपाई ।। तन मन धन गुर च्रणा माई ।।
मेल्यो जका तत्त कूं जाण्यो ।। सब बेराग त्याग मन ठाण्यो ।।९२।।

राजयोग प्रगट करण्याकरीता तन,मन,धना पासून मोह काढायला हवा.म्हणजे निजमन काढायला हवे. व हंसाचे निजमन सतगुरुंच्या तत्तच्या शरणात लावायला हवे.असा हा एकच उपाय आहे.असे तन,मन,धनापासून निजमन काढून सतगुरुच्या तत्तमध्ये ज्यांनी ज्यांनी निजमन लावले आहे.त्यांनीच तत्त जाणले आहे. याप्रकारे तन,मन,धन इत्यादीशी वैराग्य त्यागुन देणे हे हंसाच्या निजमनातुन व्हायला हवे. ।।९२।।

और त्याग बैराग न होई ।। मन माने ज्हाँ रहो जन कोई ।।
अेक बिध कर्डी आ भाई ।। तन मन धन अर्प्यो नही जाई ।।९३।।

तन,मन,धन त्यागुन दिले.परंतु तन,मन,धनातुन मोह काढला नाही.म्हणजे हंसाच्या निजमनाला या वस्तुंपासून वैराग्य आले नाही.असा त्याग निजमनापासून वैराग्य त्याग होत नाही.निजमनाने तन,मन,धनापासून वैराग्य म्हणजे तो हंस त्याचे मन मानेल तेथे राहील.त्याच्याने काही फरक पड्त नाही.म्हणजे निजमनाने तन,मन,धनसे वैराग्य आल्यावर तो राजा सारखा गृहस्थी बनुन राहो वा साधु सारखा वैरागी बनुन राहो. त्याच्याने त्याच्या आनंदपदात जाण्यास कोणती कसर राहत नाही.परंतु तन,मन,धन गुरुच्या चरणात अर्पण करणे म्हणजे तन,मन,धनातुन निजमन काढणे व निजमन गुरुच्या निजमनात अर्पण करणे ही विधी खुप कठीण आहे. ।।९३।।

घर कुळ त्याग करे नर कोई ।। ले मुख जाय बन मे सोई ।।
ओ बी त्याग स्हेल रे भाई ।। पण तन मन धन अरप्यो नही जाई ।।९४।।

घर,कुळाचा त्याग करुन वनात सदा करीता जाणे ही विधी पण सहज आहे.परंतु मन, तन,धनातुन मोह काढून निजमन गुरुला सोपणे हे फार कठीण काम आहे. ।।९४।।

**डाकर पड़े धेहे मे नर कोई ।। यूं बेराग त्याग सुण होई ।।**
**सती अगन तन काट जळावे ।। तन मन यूं बेराग कहावे ।।९५।।**

जसे कोणी मनुष्य पाण्याच्या डोहात ज्यातुन निघणे कठीण होते,त्याचे मरण निश्चित असते.अश्या डोहात एकदम छ्लांग(उडी मारुन)लावून कुदतो.त्यावेळी त्याचा मोह तन व मनातून निघालेला असतो.दुसरे उदा.सती स्त्री जळत्या अग्नीच्या लाकडांमध्ये आपले तन जाळून टाकते.तेंव्हा तिचा मोह तन व मनातून निघालेला असतो.असे वैराग्य त्यागाला तन–मनाने मोह निघालेला वैराग्य त्याग म्हणतो. ।।९५।।

**तन मन धन अरपण कर भाई ।। निर्भे होय रहिये जग माई ।।**
**हुवे आण आप सूं आणी ।। सो पासे लॉखा रहो प्राणी ।।९६।।**

जसे मनुष्य डोहात छ्लांग लावतो,उडी मारतो(कुदतो)मरुन जातो किंवा जसे सती स्त्री पतीच्या प्रेमामध्ये लाकडात जळून जाते व मरुन जाते.त्याप्रमाणे हंसाने तन,मन,धना–साठी मोह ममतेपासून मरायला हवे व सतगुरुच्या तत्तशी प्रित करायला हवी.असे करणे म्हणजे गुरुला तन,मन,धन अर्पण करणे आहे.तन,मन,धनातुन काढून सतगुरुच्या तत्तच्या भरवश्यावर निर्भर होऊन राहायला हवे.मग कोणतीही गोष्ट आपणहून होऊन तर तिला आड्वे यायला नको.मग लाखो मनुष्य प्राणी जवळ राहीले तरी ही खुश राहायला हवे किंवा सर्व गेले तरी ही दुःख व्हायला नको. ।।९६।।

**जो जावे सो जाणे दीजे ।। सेज रहे सो सरणे लीजे ।।**
**डरपो मती लाज कुळ जाणी ।। बिड़द इधक बधसी जुग आर्णी ।।९७।।**

जे मनुष्य प्राणी सोडून जात आहे त्यांना जाऊ द्या व सहजमध्ये जे सोबत राहतात त्यांना सोबत ठेवा.प्राणी सोडून जातात याकारणाने किंवा आणखी काही कारणाने कुळाची लाज जाते तर घाबरु नका.या निर्भयतेने तुमचे जगात बिड्द म्हणजे पराकम खुप वाढेल.।।९७।।

**जो जो हंस तमारा होई ।। सो सो कदेन बिछड़े कोई ।।**
**चिंता मती करो तम काई ।। निर्भे तत्त गहो जग माई ।।९८।।**

जे जे हंस तुमचे राहतील ते ते हंस कधी ही तुमच्या पासुन दूर जाणार नाही.तुमच्या पासुन हंस दुर जाण्याची चिंता करु नका.जो पर्यत संसारात आहे.(तो पर्यत)हे निर्भय तत्त पकडून ठेवा. ।।९८।।

**कुळ पदवी छुछम आ भाई ।। सो पण भरी बिकारां माई ।।**
**जन पदवी तिहुं लोक सरावे ।। हंसा उलट अगम घर जावे ।।९९।।**

कुळाची राजाची पदवी ही संताच्या दिव्य पदवीच्या समोर अति सुक्ष्म आहे.सुक्ष्म पदवी असूनही काळाच्या दुःखाच्या विकाराने भरलेली आहे.या राजा पदाला फक्त राजाचेच थोडे लोक जाणता जेव्हा की संतपदाला तीन लोक मृत्युलोक,पाताळलोक,स्वर्गलोक सर्व जाणतात व सर्व शोभा(प्रशंसा)करतात.या शिवाय हंस काळाचा लोक सोडून महासुखाच्या अगम घरी म्हणजे ज्याला ब्रम्हा,विष्णू,महादेव जाणत नाही.अश्या अगम घरी जातो.।।९९।।

**ग्यान खोज हिरदे कर लीजे ।। निरस बात सोही नही कीजे ।।**
**से सूरा साहेब मन भावे ।। तीन लोक तां को जस गावे ।।१००।।**

ज्या ज्ञानाची शोध करुन हृदयात त्या तत्तला धारण करुन घ्या व काळाच्या मुखात दुःख भोगविणाऱ्या ज्या ज्या निरस म्हणजे हलक्या गोष्टी आहे.त्यांना सोडून द्या.असा जो शुरविर असेल तो संत साहेबाच्या मनास खुप आवडतो.अश्या शुरविर संताची तीन लोक १४ भवन तसेच ब्रम्हाचा सतलोक,महादेवाचा कैलास,विष्णूचा वैकुंठ व शक्तिचा शक्ति लोक या सर्व लोकांमध्ये सर्व लोक खुप महिमा करतात. ।।१००।।

**तन मन सूं तज रिजक उपाई ।। तत्त ध्यान धरीये घट माई ।।**
**रख बिश्वास पूरसी आणी ।। निरपख होय गहो तत्त छाणी ।।१०१।।**

तन, मनाला वेदाचे कर्म करुन धन कमविण्याचे उपाय सोडून दे.तत्तचे ध्यान घटात धारण कर.त्या रामजीचा विश्वास ठेव.तो रामजी तुला जे हवे ते विना कसरने नेहमी सर्व पुरवेल.जगात मायेचे अनेक पक्ष आहे.अश्या पक्ष्यांच्या पलिकडे जाऊन या पक्षांपासून निरपक्ष होऊन जा व निरपक्ष होऊन तत्तला जाणून धारण कर. ।।१०१।।

**मन सुं अेक ध्यान सो कीजे ।। ओर बोझ सिर कछुन लीजे ।।**
**सेज बिरत मे जो कछु होई ।। ताँ कूं आड न दीनी कोई ।।१०२।।**

तु निजमनाने सतस्वरुप परमात्म्याचे एकच ध्यान कर आणि राजाचा तसेच कुटुंबाचा कोणता बोझा डोक्यावर घेऊ नकोस.सहज वृत्तीत आपले आप काही ही हो त्याला आड म्हणजे थांबवू नको.जे होईल ते होऊ दे. ।।१०२।।

कुंडल्या ।।

अणभे हेला देत हूं ।। सुण लीजो निजदास ।।
ब्रम्हलोक की चाय व्हे ।। से आज्यो मम पास ।।
से आज्यो मम पास ।। ब्रम्ह के माँय मिलाऊँ ।।
जतन करूं ब्हो भांत ।। संग कर ले म्हे जाऊँ ।।
सुखराम हंसाँ के कारणे ।। देहे धारी जग बास ।।
अणभे हेला देत हूं ।। सुण लीज्यो निजदास ।।१।।

हा मी अणभे देशाचा अनुभव घेऊन सर्वांना हाक लावत आहे.जे निजदास असतील ते सर्व ऐका.ज्याला कोणाला ही सतस्वरुप ब्रम्हलोकाची चाहणा होईल.ते सर्व माझ्या जवळ या.माझ्या जवळ जो येईल त्याला मी सतस्वरुप ब्रम्हमध्ये मिळवून देईल आणि काळापासून खुप तऱ्हेने जतन करुन मी आपल्या सोबत त्याला घेऊन जाईल. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, मी हंसा करीता या जगात देह धारण करुन आलो आहे. ।।१।।

सब्द हमारा सांभळयाँ ।। अणंद हुवे घट माय ।।
से सब हंस सरूप हे ।। मिलसी हम सूं आय ।।
मिलसी हमसूं आय ।। नाँव मेलूं घट माही ।।
पिछम देस होय हंस ।। उड़ आकासा जाही ।।
सुखराम जीव सुळझाय के ।। जम सूं लेऊं छुड़ाय ।।
सब्द हमारा साँबळयाँ ।। आनंद हुवे घट माय ।।२।।

माझे शब्द हे सतस्वरुप साहेबाचे शब्द आहे.असे माझे शब्द म्हणजे ज्ञान ऐकून ज्याच्या घटात आनंद होईल ते सर्व जीव सतस्वरुपात जाणारे हंस स्वरुप आहे.ते हंस स्वरुपी जीव माझ्यात येवून मिळतील.तर त्यांच्या घटात मी हे निजमन प्रगट करुन देईल.ते हंस पश्चिम दिशेने म्हणजे बंकनालच्या रस्त्याने होऊन उलटून आकाशात ब्रम्हांडात जातील.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मायेत अडकलेल्या त्या हंसाना यमापासून सोडवून देईल.माझे सतस्वरुप शब्द म्हणजे ज्ञान ऐकून ज्याच्या घटात आनंद होईल तेच माझ्याशी येऊन मिळतील. ।।२।।

सबद हमारा पेकं हे ।। भेज दिया जग माय ।।
भ्रम क्रम कूं भांग के ।। हंस ले आवे जाय ।।
हंस ले आवे जाय ।। ब्रम्ह के लोक पठाऊँ ।।
सवा लाख को हुकम ।। हंस संग लेकर जाऊँ ।।
सुखरामदास फटकार क्हे ।। तिण मे कसर न काय ।।
सब्द हमारा पेक हे ।। भेज दिया जुग माय ।।३।।

हे माझे सतस्वरुपाचे शब्द खुप पक्के आहे.हे शब्द म्हणजे ज्ञानाला मी मायेच्या जगात पाठविले आहे.हे माझे सतस्वरुप साहेबाचे शब्द म्हणजे ज्ञान संसारात हंसाचे भ्रम तोडून माया सोडवून हंसाला सतस्वरुप ब्रम्हात पाठवत आहे.सतस्वरुप ब्रम्हातून सव्वा लाख हंसांना मी मोक्षाला जाते वेळी सोबत घेऊन जाण्याचा मला हुकुम आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की ही गोष्ट मी फटकून सांगत आहे.म्हणजे चौडे वाजवून वाजवून सांगत आहे.त्यात कोणती कसर नाही.असे माझ्या सतशब्दाच्या

ज्ञानाला मी जगात पाठविले आहे.जे सतशब्दाचे ज्ञान हंसाला मायेच्या अड्चणीतून काढून सतस्वरुप ब्रम्ह मध्ये पाठविण्यास खुप पक्का आहे. ।।३।।

ओऊँ अजपो संग करे ।। सोहं सासा जाण ।।
ररो ममो रट जीभ सूं ।। धरे बिच मे आण ।।
धरे बीच मे आण ।। तबे ने:अंछर पाया ।।
इण छक्के बिन मेल ।। पीठ राहा कदे न आया ।।
सुखराम दास अे अेकठा ।। मथे नाभ मे आण ।।
ओऊँ अजपो संग करे ।। सोहँ स्वासा जाण ।।४।।

ओअम अजप्पा सोबत सोहमचा संग केला तर श्वास बनतो.अश्या श्वासात ररो व ममो म्हणजे रामनाम याचे जीभेने रटण केल्याने म्हणजे ओअम,अजप्पा,सोहमच्या मध्ये ररो व ममोचे रटण केल्याने सहाव्वा शब्द ने:अक्षर प्रगट होते.असे ओअम,अजप्पा, सोहम,ररो, ममो व प्रगट झालेले ने:अक्षर असे सहा शब्दांच्या मेळ शिवाय पाठीच्या रस्त्याने हंसाला कधीही दहाव्याद्वारात ब्रम्हांडत जाता येत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की याप्रकारे हे ओअम,अजप्पा,सोहम,ररो,ममो तसेच ने:अक्षर या सहांना एकत्र करुन यांना नाभीमध्ये मंथन करा.ज्यांचे पाठीचे २१ ब्रम्हंड्वे छेद्न होईल व हंस पश्चिमेकडून दहाव्याद्वारात ब्रम्हांडात पोहचेल. ।।४।।

ओऊँ सोहं लिंग हे ।। स्वासा पुरष सरीर ।।
रंरकार सो बीज हे ।। मंमकार बिंद बीर ।।
मंमकार बिंद बीर ।। भग अंछया सो होई ।।
सुरत कँवळ ताँ माय ।। प्रीत नारी क्हुं तोई ।।
सुखराम भोग जो अे करें ।। जीभ सेझ पर आय ।।
तो जिव उलटर आद घर ।। मिले ब्रम्ह मे जाय ।।५।।

ओअम म्हणजे बाहेरचा श्वास सोहम म्हणजे आतील श्वास हा पुरुषाचे लींग आहे व श्वास हा पुरुषाचे शरीर आहे व रंरकार हे स्त्रीचे बिंद आहे व इच्छा ही स्त्रीचे भग आहे.सुरत ही गर्भ थांबण्याचे कमळ आहे.व प्रीत ही नारी आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे सर्व जीभेच्या सेजवर येऊन भोग करतील तर हा जीव उलटून आदि घरी म्हणजे सतस्वरुप ब्रम्हमध्ये पोहचेल. ।।५।।

सिष बचन ।।

सिष बुझे गुरूदेव कूं ।। मो कूं कहो समझाय ।।
जीव ब्रम्ह सुं बीछड्यो ।। किस कारण जन राय ।।
किस कारण जन राय ।। काँय आयो जग माँही ।।

भोळप कन रीसाय ।। कन माया रस ताँई ।।
अब तलफे ब्रम्ह लोक कूं ।। क्हो किस कारण आय ।।
सिष कहे गुरूदेव कूं ।। मो कूं कहो समजाय ।।६।।

शिष्य विठ्ठलराव राजा आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विचारतो की हे गुरुदेवजी मला हे समजवून सांगा की,हा जीव होणकाळ ब्रम्हपासून वेगळा होऊन जगात कोणत्या कारणाने आला.हा जीव होणकाल ब्रम्हला सोडून भोळेपणाने आला आहे.म्हणजे अज्ञानात आला आहे का तेथून कोणाशी रुसून आला आहे का मायेचा रस घेण्याकरीता येथे आला आहे हे समजावून सांगा.आता हा जीव होणकाळ ब्रम्हमध्ये मिळण्याकरीता तडफड करीत आहे.याकरीता ज्याचे येण्याचे काय कारण आहे हे मला समजावून सांगा.।।६।।

क्या दु:ख ब्रम्ह लोक मे ।। क्या सुख थो नाँय ।।
क्यूं आयो तज धाम वो ।। क्युं पडियो फंद माँय ।।
क्यूं पडियो फंद माँय ।। दया कर रीत बतावो ।।
ब्रम्ह जीव हुवो काँय ।। अरथ सो सोझर लावो ।।
अब ब्रम्ह होणो आद रे ।। पेली आयो काँय ।।
क्हा दु:ख ब्रम्ह लोक मे ।। क्या सुख थो नाँय ।।७।।

त्या ब्रम्ह लोकात या जीवाला काय दु:ख होते तसेच तेथे या जीवाला काय सुख नव्हते.ज्यामुळे या जीवाने ब्रम्हपद सोडले व मायेच्या फंदात येऊन पडला.याची येथे येण्याची रीत बनली याचे कारण आपण दया करुन मला सांगा.ब्रम्हमध्ये हा जीव ब्रम्हचा स्वरुपाचा होता तो ब्रम्ह मायेमध्ये येऊन जीव का झाला याचा सर्व अर्थ शोधुन मला सांगा.जा जीव आता ब्रम्ह होण्यास व्याकुळ आहे.तर आदिच ब्रम्हपदापासून मायेत का आला हे मला समजवा.तेथे ब्रम्हमध्ये जीवाला काय दु:ख होते.तसेच तेथे (कोणते)काय सुख नव्हते याचा खुलासा करुन मला सांगा. ।।७।।

जीव ब्रम्ह ते बीछड़यो ।। युं कहे सब ही ग्यान ।।
वाँ हाँ कुछ न्यारो जीव थो ।। कन ब्रम्ह एकी ध्यान ।।
कन ब्रम्ह एकी ध्यान ।। ब्रम्ह सुं बिछड़यो काँई ।।
वांहाँ कांहाँ रहयो निधान ।। काँय आयो जग माँई ।।
ओ आंटो मुज खोल के ।। कहिये हे ज्यूं आन ।।
जीव ब्रम्ह ते बीछड़यो ।। युं कहे सब ही ग्यान ।।८।।

सर्व ज्ञानी वेद,शास्त्र,पुराण साधु संतांची वाणी हे सांगते की हा जीव ब्रम्हातुन वेगळा होऊन येथे मायेमध्ये आला आहे.तेथे ब्रम्हपदात हे जीव ब्रम्ह स्वरुपाहुन वेगळा होता.

किंवा ब्रम्हच्या स्वरुपाचा होता.तो ब्रम्ह स्वरुपाचा होता तर ब्रम्हपासून वेगळा का झाला?तेथून ब्रम्हरुपी जीव आल्या नंतर ब्रम्हचे काय राहीले?व ब्रम्हपासून वेगळा होऊन जगात का आला?ही आढी सोडून मला जसे झाले आहे तसेच्या तसे सांगा. ।।८।।

वोईज ब्रम्ह ओ जीव हे ।। कन वो न्यारो होय ।।
के आयो यां हाँ फूट कर ।। सो कहिये गुरू मोय ।।
सो कहिये गुरू मोय ।। अेसें कहे सब कोई ।।
सब कोई सतस्वरूप ।। कन पुत्र जिम होई ।।
वांहाँ यहाँ को क्या फेर हे ।। सो बिध कहिये मोय ।।
वो ईज ब्रम्ह ओ जीव हे ।। कन वो न्यारो होय ।।९।।

सर्व वेद,शास्त्र,पुराण साधु संतांच्या ज्ञानात हे सांगतात की जीव ब्रम्हपासून वेगळा झाला आहे.तर हा जीव त्याच ब्रम्ह स्वरुपाचा आहे वा ब्रम्हपासून वेगळा आहे किंवा हा जीव त्या ब्रम्हचा अंश फुटून जीव बनुन आला आहे.गुरुजी हे सर्व मला सांगा.सर्वच असे सांगतात की,हे सर्व जीव त्या सतस्वरुपा सारखेच आहे किंवा त्या सतस्वरुपाच्या पुत्रासारखे आहे.तेथील ब्रम्हपणात तसेच येथील जीवपणात काय फर्क आहे?हा सर्व भेद मला सांगा.हा जीव तो ब्रम्ह आहे वा हा जीवब्रम्ह पेक्षा वेगळा आहे हे सांगा. ।।९।।

सुखो वाच ।।

जन सुखदेव अब बोलिया ।। सिष सुण दे कान ।।
पारब्रम्ह इण जीव को ।। निर्णो कहुँ सब आण ।।
निरणो कहुँ सब आण ।। भरम राखुं नही कोई ।।
जीव ब्रम्ह हे दोय ।। ऑस अेसी बिध होई ।।
पूत पिता सूं बीछड़े ।। यां हां गत सो वांहाँ जाण ।।
जन सुखदेव अब बोलीया ।। हे सिष सुण दे कान ।।१०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्य विठ्ठलरावाला सांगीतले की,हे शिष्य लक्ष देऊन ऐक.मी तुला पारब्रम्ह व जीवाचा निर्णय वेगवेगळ्या प्रकारे समजावून सांगत आहे.हे ज्ञान ऐकल्यावर तुझ्यात पारब्रम्ह काय आहे हे समजण्यात कोणता भ्रम राहणार नाही.जीव व पारब्रम्ह हे दोन वेगवेगळे आहे.यांची ही अशी विधी आहे ती ऐक.जसे जगात पित्यामध्ये पुत्राची निघण्याची गती आहे.तशीच गती होणकाळ पदात होणकाळ पित्यापासून जीव पुत्राची निघण्याची गती आहे. ।।१०।।

पूत पिता के माँय हे ।। युं ब्रम्ह मे जीव होय ।।

याँ हाँ जिव न्यारो ऊपजे ।। वाँ हा बी आगत जोय ।।
वां हाँ बी आगत जोय ।। नार नर वां हाँ बी होई ।।
सुणो ब्रम्ह बुहार ।। भोग सारा कहुँ तोई ।।
सुखराम क्हे सिष सांभळो ।। वां हॉ भ्रम दु:ख नही कोय ।।
पूत पिताके माँय हे ।। यूँ ब्रम्ह मे जिव होय ।।११।।

जसे पुत्र पित्यामध्ये राहतो.तसेच हा जीव पुत्र पारब्रम्ह पित्यात राहतो.जसे येथे पित्यामधुन पुत्र वेगळा होऊन उपजतो.अशीच दोघांची समान गती होते.आणि स्त्री पुरुष जसे येथे आहे.तसेच स्त्री–पुरुष तेथे होणकाळ पदात आहे.तेथील पारब्रम्हचे सर्व भोग व्यवहार मी तुला सांगतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलराव शिष्याला बोलले की,तेथे दु:ख तसेच भ्रम काहीच नाही.जसे पुत्र पित्यामध्ये असतो तसेच जीव ब्रम्हमध्ये होता हे समझ.।।११।।

याँ हाँ जीव पेड़यां ऊतरे ।। पड़े दु:ख मे जाय ।।
चोथी पीड़ी रंक होय ।। अे मुख बिष ले खाय ।।
अे मुख बिष ले खाय ।। जीव युं आण कहायो ।।
जात पाँत कुळ छाड ।। संग बेस्या सुं लायो ।।
सुखराम कहे यूं ब्रम्ह सूं ।। बिछड़ जीव हुयो आय ।।
ईयां जीव पेडयाँ ऊतरे ।। पड़े दु:ख मे जाय ।।१२।।

जसे येथे राजा होता.त्याची चौथी पिढी रंक बनते. हे कसे होते ते समजा.राजा आहे. त्याला पाच मुल आहेत.त्याच्या मोठ्या मुलाला राज्य मिळते व इतर चार मुलांना काही गाव मिळतात.या चार मुलांचा स्वभाव राजा सारखा खर्चिक राजेशाहीचा असतो. इतकी कमाई राजा पित्यापासुन मिळालेल्या गावापासून मिळत नाही.तर हे मुल राजेशाही टिकविण्याकरीता गावचे गाव विकतात व राजेशाही कशीही टिकवतात.ही राजाची दुसरी पिढी आहे.असे राजाच्या मुलाला चार,पाच मुल होतात हे राजाचे नातु आहे.म्हणजे तिसरी पिढी आहे.त्या चारी पाची मध्ये वाटणी होते.तर प्रत्येकाच्या वाट्यावर त्यांची वडिलांना जसे गाव मिळाले होते.तसे वाटणीत गाव येत नाही.कारण राजेशाही खर्चात वडिलांनी गावचे गाव विकुन टाकलेले असतात.याकारणाने नातवांना हिश्यात गावाचे काही शेत येते.यांचाही खर्च करण्याचा तसेच शौक करण्याचा स्वभाव राजा सारखाच असतो.या शौकात पैसा पुरत नाही.तर नातु शेतीवाडी विकुन देतात व कसे तरी आपले शौक पुरे करतात.असे राजाच्या नातुंना ४–५ मुल होतात.हे राजाचे पणतु आहे.ही राजाच्या पिढीनुसार चौथी पिढी आहे.आता राजाच्या नातुंजवळ राजाच्या पणंतुना देण्याकरीता काही धन शिल्लक राहत नाही.उलट राजेशाही शोक मध्ये कर्ज

झालेले असते.याप्रकारे राजाची चौथी पिढी राजा पासून रंक बनून जाते.राजाच्या सर्व राण्या जाती पातीच्या कुळाच्या असतात. तर राजाचे पणतु धनहिन असल्याने त्यांना कोणी जाती पातीच्या कुळाच्या स्त्रीयाँ मिळत नाही.स्वभाव तर राजा सारखा अनेक राण्यांसोबत संसार करण्याचा बनुन जातो.जेंव्हा यांचे असे शोक पूर्ण होत नाही तर राजाची चौथी पिढी आपली जात पात व कुळ सोडून वेश्यांचा संग करुन बिघडून जातात.याप्रकारे जेंव्हा जीव ब्रम्ह होता तेंव्हा जीवाचा पारब्रम्हचा स्वभाव होता.परंतु या जीवाचा पारब्रम्ह पासुन वेगळा होवून मायेत आल्याने मायेचे पाच विषय वासनेच्या प्रकृतीचा स्वभाव बनुन गेला.असा स्वभाव बनल्याने जीवाची ब्रम्ह जात ब्रम्ह पात तसेच ब्रम्ह कुळ हे जीव विसरुन जातो व मायेच्या विषयात लागुन मायावी बनुन जातो व काळाचे दु:ख भोगतो.याप्रकारे पारब्रम्ह पिढीतुन उतरुन माया पिढीत येतो व मनाचे, तनाचे दु:ख भोगतो. ।।१२।।

ब्रम्ह सुन्न प्रब्रम्ह के ।। संगम बण्यो तिण बार ।।
सिव पुत्र सो ऊपजे ।। म्हासुन्न धिवलार ।।
महासून्न धी लार ।। अबे संजम यांहाँ होई ।।
चेतन सक्त बिचार ।। पूत पुत्री अे दोई ।।
सुखराम क्हे अब सक्त के ।। चेतन लागो लार ।।
ब्रम्ह सुन्न पर ब्रम्ह के ।। संगम बण्यो तिण बार ।।१३।।

होणकाळ पारब्रम्ह पदात पारब्रम्ह तसेच ब्रम्हशुन्यने संसार केला.तेंव्हा त्यांना शिवब्रम्ह पुत्र झाला व महाशुन्य पुत्री झाले.पुढे शिवब्रम्ह व महाशुन्य ने संसार केला.तेंव्हा चिदानंद व शक्ति जन्मले.।।१३।।

चिदानंद अर सक्त के ।। बण्यो भोग ब्योहार ।।
महतत्त अंछया दोय अे ।। बाळक उपज्या लार ।।
बाळक उपज्या लार ।। अबे याँरे संग होई ।।
मंछया पुत्री बीर ।। अहुँ बेटो कहुँ तोई ।।
सुखराम क्हे अंकार के ।। मँछया सूं हुवो प्यार ।।
चिदानंद अर सक्त के ।। बण्यो भोग ब्योहार ।।१४।।

या चिदानंद व शक्ति ने भोग व्यवहार केला.त्यांच्या पासुन महतत्व हे पुत्र व इच्छा ही पुत्री असे दोन बालक जन्मले.आता महतत्व व इच्छाचा संग झाला.त्यांच्यापासुन मंछा ही पुत्री व अहंकार हा पुत्र उत्पन्न झाला.।।१४।।

कवत ।।

अहंकार संग होय ।। नार मंछया क्हुं तोई ।।

तासूं उत्पत जीव ।। तत ब्रम्हंड पण होई ।।
इनकी सो ओलाद ।। दोय मारग होय चाली ।।
तब चिदानंद सुण सक्त ।। आण रीतां सब पाली ।।
दोनू चालो अेक्कठा ।। न्यारी दिसा मत ताण ।।
दोनू फूटाँ कुछ नही ।। कही चिदानंद आण ।।१५।।

पुढे अहंकार पुरुषा सोबत मंछ्या नारीचा भोग व्यवहार झाला.या भोग व्यवहाराने जीव व आकाश,वायु,अग्नी,जल व पृथ्वी हे पाच तत्व उत्पन्न झाले.या चिदानंद व शक्ती–पासुन जन्मलेल्या अहंकार व मंछा हे दोन वंशज पुढे दोन मार्गाने चालु लागले. तेंव्हा चिदानंद आणि शक्तिने मंछ्या आणि अहंकाराला वेगवेगळ्या मार्गाने चालण्याच्या रीतीला मना केले व दोघांना एकत्र चालण्यास सांगीतले वेगवेगळे चालु नका. वेगळ्या (दिशांमध्ये)ताणू नका.तुम्ही दोघे वेगळे झाल्याने काही होणार नाही.तुम्ही दोघांच्या फुटुन जाण्याने काही होणार नाही.असे चिदानंदने अहंकाराला व मंछाला जोर देऊन सांगीतले. ।।१५।।

कुंडल्यो ।।

अहंकार सूं ऊपना ।। पांच तत्त प्रवाण ।।
ब्रहमंड पवन तेज जळ ।। पुत्री मही बखाण ।।
पुत्री मही बखाण ।। भोग याँरा अब होई ।।
चोरासी लख पूत ।। जीव जाया कहुँ तोई ।।
सुखराम कहे इस जीव की ।। यूं आ उत्पत जाण ।।
अहंकार सूं ऊपना ।। पांच तत्त प्रवाण ।।१६।।

या अहंकार व मंछ्याच्या भोगने पाच तत्व असे पाच बालक झाले या पाच बालकांमध्ये आकाश,वायु,अग्नी,जल हे चार पुत्र व पृथ्वी ही एक पुत्री झाली.आता यांचा भोग होऊ लागला.यांच्या संसारापासून ८४ लाख जातीचे जीव जन्मले.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्य विठ्ठलरावाला सांगीतले की,जीवाची याप्रकारे होणकाळ पारब्रम्ह–पासुन उत्पत्ती झाली.हे समजा. ।।१६।।

कवत ।।

जीव पुर्ष के संग ।। नार ममता केहुँ कोई ।।
याँ जायो मन पूत ।। सूर्त कन्या पण होई ।।
यां रे बण्यो संजोग ।। भोग करणे कुं लागा ।।
चोसट जाया पूत ।। घड़ी म्हुरत बंध बागा ।।
सुखराम क्हे यूं ब्रम्ह सूं ।। बण्यो जीव सिव आय ।।

चोरांसी के बीच मे || फिर फिर गोता खाय ||१७||

या जीव पुरुषासोबत ममता ही पत्नी झाली.यांचे मन पुत्र व सुरत कन्या उत्पन्न झाली.आता सुरत व मन पुढे भोग करु लागले.या सुरत व मनाच्या भोगाने घटका, मुहूर्त जन्मले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज शिष्य विठ्ठलरावाला सांगीतले की, जसे राजापासून रंक बनून दु:ख भोगत आहे तसेच ब्रम्हपासून जीव बनुन ८४ लक्ष्य योनीचे परत परत गोते खाऊन राहीला. ||१७||

कुंडल्या ||

हे सिष अब तोकुं कहूं || तो मे तेरो ग्यान ||
खंड सोई ब्रहमंड में || सोई पिंड मे जाण ||
सोई पिंड मे जाण || तिरथ अपने घट कीजे ||
खंड़ पिंड़ ब्रहमंड || सोझ तीनूं याँ हां लीजे ||
बिंद ज्हाँ सुँ ऊतरे || ताँ ही ब्रम्ह को ध्यान ||
हे सिष अब तो कुं कहूँ || तो मे तेरो ग्यान ||१८||

जे जे खंडात आहे.तसेच ब्रम्हांडात आहे ते सर्व प्रत्येकाच्या पिंडात आहे.यामुळे तुझ्या ही पिंडात जसा खंड ब्रम्हंड आहे.तसेच ब्रम्हांड व खंड मध्ये पारब्रम्ह जीवापासून मायावी जीव कसा बनला हे तु तुझ्या घटात बघुन घे खंड ब्रम्हंड व तुझा पिंड हे तिन्ही तुझ्या पिंडातच शोधुन घे.अशा प्रकारे हे सर्व ज्ञान ज्याची समझ तुला हवी ती तुमच्या पिंडातच आहे.हे मी तुला सांगतो. ||१८||

दसवे द्वार प्रब्रम्ह हे || मेहेल त्रगुटी सीव ||
त्रगुटी तज पिंड आवियो || तबे कहायो जीव ||
तबे कवायो जीव || स्थूळ काया इण धारी ||
सुख दु:ख देही लार || अनंत बिप्वा सब लारी ||
सुखराम क्हे सिष सांभळो || यूं नित पेदा जीव ||
दसवें द्वार प्रब्रम्ह हे || मेहेल त्रुगुटी सीव ||१९||

पिंड्च्या दसवेद्वारात हे पारब्रम्ह स्वभावाचे जीवाचे आदि राहण्याचे स्थान आहे.जीव दहावेद्वार सोड्न त्रिगुटी महलमध्ये येतो.तेव्हा जीवाचा पारब्रम्ह स्वभाव बदलुन जीवब्रम्ह स्वभाव असा स्वभाव बनतो.अश्या स्वभावाला आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी या साखीमध्ये शिव स्वभावाचा जीव बनतो असे सांगीतले आहे.त्रिगुटी म्हणजे भृगुटी सोड्न आईच्या गर्भात येऊन स्थुल देह धारण करतो व त्याचा स्थुल देह पाची आत्म्यांचे विकारी सुख घेण्याकरीता जवान होतो तेंव्हा त्या जीवाला जीव स्वभाव आला असे समजा.आईच्या गर्भात येतो बालक बनतो व जवान बनतो.तेंव्हा जीव

बनतो.याप्रकारे जीवाने पारब्रम्हच्या सुक्ष्म कायेने स्थुल मायावी काया धारण केली. अशी स्थुल काया धारण केल्याने जीवाच्या मागे सुख,दु:ख तसेच अनेक विपत्त्या लागुन गेल्या.आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगतात की,हे शिष्य ऐक याप्रकारे पारब्रम्ह जीव स्वभाव पासुन निघून मायावी जीव स्वभावमध्ये जीव नेहमी उत्पन्न होऊ लागले व अनेक दु:ख व विपत्तीमध्ये पडू लागले. ।।१९।।

दसवे द्वार ब्रहमंड हे ।। सुणो त्रुगुटी खंड ।।
ज्हाँ लग पवन बेहेत हे ।। ता हाँ लग कहिये पिंड ।।
तहाँ लग कहिये पिंड ।। भेद सारो तुज माही ।।
बिन सतगुरू संसार ।। जीव गत जाणे नाही ।।
सुखराम क्हे सिष सांभळो ।। यूं बन रहयो मंड ।।
ब्रहमंड दसवो द्वार हे ।। त्रगुटी कहिये खंड ।।२०।।

जे ब्रम्हंड तीन ब्रम्हचे १३ लोकांना होणकाळ सृष्टीत बनला आहे. तोच ब्रम्हंड पिंडमध्ये त्रिगुटी पासुन दसवेद्वारा पर्यत बनलेला आहे.जो खंड तीन लोक १४ भवन तसेच ४ पुरींचा होणकाळ सृष्टीत बनला आहे.तोच खंड पिंडमध्ये त्रिकुटी पर्यत बनला आहे. अश्या खंड–ब्रम्हंडची रचना श्वास चालणाऱ्या स्थुल शरीरात बनविली आहे.अश्या स्थुल शरीराला पिंड म्हणतात आणि श्वासाच्या चालण्याने चालणारा पिंड हा तुमचा ही आहे.याप्रकारे तुमच्या पिंडात खंड तसेच ब्रम्हंड आहे.याप्रकारे पारब्रम्ह जीव पारब्रम्ह पद ब्रम्हांडातुन निघून मायेच्या खंड पदात येऊन मायावी जीव स्वभाव कसा धारण करतो व अनेक दु:ख तसेच विपदेत कसा पडतो हा ज्ञानाचा सारा भेद तुझ्या जवळच आहे.परंतु ज्याप्रकारे संसारातील लोक ज्ञानी,ध्यानी,सतगुरु शिवाय ही गती जाणत नाही.त्याप्रकारे तु हा भेद जाणत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज शिष्य विठ्ठलरावाला समजावत आहे की,ब्रम्हंड व खंडाची होणकाळात सृष्टी बनली व जीव अनेक दु:ख व विपत्तीत पडला हे समज.।।२०।।

अब च्यार खान मे ऊपजे ।। जीव ज्हाँ तहाँ जाय ।।
सुख दु:ख ज्हाँ ताहाँ अेक ही ।। कम नही जाफा माय ।।
कम नही जाफा माय ।। नरक सरगाँ लग जावे ।।
धरी देहे का दंड ।। बिसन आगे लग पावे ।।
तीन लोक सुखराम के ।। यूं जग बणियो आय ।।
अब च्यार खाण मे ऊपजे ।। जीवं जहाँ तहाँ जाय ।।२१।।

याप्रकारे पारब्रम्ह जीवाचा मायावी जीव बनला व कर्माच्या अनुसार जीव अंडज, जरायुज, उद्बिज, अंकुर अश्या चार खाणींमध्ये जेथे तेथे कर्म भोगण्याकरीता जन्मु लागला. या

चार खाणींमध्ये जीवाच्या मागे सुख दु:ख तसेच अनेक विपत्त्या कमी जास्त प्रमाणात लागुन गेली.कधी दु:ख व विपत्त्या कमी पडल्या तर जीव स्वर्गात गेला.तर कधी दु:ख व विपत्त्या जास्त पडल्या तर जीव नरकात गेला.याप्रकारे जीव मिळालेल्या देहाचा दंड विष्णूचे पद प्राप्त करुन विष्णू बनला.तरी ही सुटत नाही असा हा देहाचा दंड जो आहे तो दंड देहाच्या मागेच असतो. याप्रकारे मायेचे मृत्यु,स्वर्ग तसेच पाताळ असे तीन लोक जीवाच्या सुखा शिवाय अनेक दु:खाचे कष्ट पडेल असे बनले आहे. ।।२१।।

सिष बूजे गुरूदेव कूं ।। अगत मुक्त गत मोख ।।
इन को भेद बिचार सो ।। क्हो सुख दु:ख दोख ।।
क्हो सुख दु:ख दोख ।। जीव कूं क्हाँ सुख होई ।।
सो बिध कहिये आण ।। भेद दीजे सब मोई ।।
जीव पणो कंहाँ जायगो ।। कब टळे सब दोख ।।
सिष बूझे गुरूदेव कूं ।। अगत मुगत गत मोख ।।२२।।

शिष्य विठ्ठलराव आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विचारले की अगती काय आहे?गती काय आहे?तेथे प्रत्येक जागी सुख दु:ख मोक्ष काय आहे?याचा ज्ञानाने भेद सांगा.तसेच जीवाला कोठे पोहचल्यावर मागीतल्यावरही दु:ख मिळणार नाही व न मागता ही अनंत सुख येऊन येऊन पडतील तो देश सांगा या जीवाचा दु:खात पडण्याचा जीवपणा कोठे पोहचल्यावर सुटेल.तसेच या जीवाचे सर्व दोष काय केल्याने टळतील.ह्या सर्व विध्यांचा भेद मला सांगा. ।।२२।।

हे सिष अगत मुक्त अर गत्त लग ।। सुख दु:ख तीनु जाग ।।
उलट मोख लग पूंचसी ।। जब जासी दु:ख त्याग ।।
जब जासी दु:ख त्याग ।। फेर पाछो नही आवे ।।
पारब्रम्ह के माँय ।। जीव वो जाय समावे ।।
वाँ सुण सुख की जाग हे ।। ज्हाँ नही जम को लाग ।।
अगत गत्त अर मुक्त लग ।। सुख दु:ख तीनु जाग ।।२३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्य विठ्ठलरावाला सांगीतले की अगती म्हणजे मलमुत्रचा मनुष्य देह सोडून बाकी सर्व ८४लक्ष योनी,भूत प्रेताचे देह,नरकाचे देह, यमदूतांचे पिंड,राक्षसांच्या योन्या आहेत.गती म्हणजे देवतांच्या देहाची प्राप्ती आहे व मुक्ती म्हणजे विष्णूच्या लोकात जाऊन महाप्रलयापर्यत चार मुक्त्या प्राप्त करणे हे आहे.असे अगती,गती व मुक्तीच्या तिन्ही पदामध्ये सुख दु:ख मागेच लागलेले असतात. जसे जीव पारब्रम्हातून मायेत आला.तसाच जीव मायेपासून उलटून पारब्रम्हाच्या पलिकडील सतस्वरुपात पोहचेल.तेंव्हा जीवाचा मोक्ष होईल व जीवाच्या मागील सर्व

दु:ख व विपत्त्या सुटून जाईल.याप्रकारे जीव सतस्वरुप पारब्रम्हात पोहचल्यावर मायेच्या तीन लोकात परत कधी ही येत नाही. याकारणाने जीवाच्या मागे लागलेले सर्व दु:ख व विपत्ती सुटून जाते. असा मायेपासून उलटून पारब्रम्हच्या परे पलिकडील सतस्वरुपात पोहचलेला जीव सदाकरीता सतस्वरुपातच राहतो.असे सतस्वरुप पारब्रम्हात अनंत सुखांची जागा आहे व तेथे हा जीव महासुख भोगतो.त्या सतस्वरुप पारब्रम्हच्या सुखाच्या पदात तीन लोकांच्या पदाच्या सुखात जसा जालीम काळ आहे. तो काळ तेथे नाही.त्या सुखाच्या पदात काळ पोहचुही शकत नाही.असे निर्दोष सुखाचे पद आहे.बाकी सर्व अगती,गती व मुक्ती पर्यतच्या पदात माया व काळाचे सुख दु:ख आहे. ।।२३।।

पारब्रम्ह मे हंस मिले ।। जे जल्मे नही कोय ।।
यूं सब क्हे गुरूदेवजी ।। मेरे सांसो होय ।।
मेरे सँसो होय ।। आद ओ क्हाँ सुं आयो ।।
वोइज ब्रम्ह कन ओर ।। ग्यान मे ज्हाँ तहाँ गायो ।।
पेली कहो किम आवियो ।। सो बिध कहिये मोय ।।
पारब्रम्ह में हंस मिले ।। जे जन्मे नही कोय ।।२४।।

शिष्य विठ्ठलरावाने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विचारले की,पारब्रम्ह सतस्वरुपात हंस मिळतात.ते परत मायेच्या ३ लोकात जन्मत नाही.असे सर्व साधु संत सांगतात,परंतु गुरुदेवजी मला एक शंका येत आहे,शंका ही आहे की,पारब्रम्ह सतस्वरुपात मिळाल्यानंतर हा हंस मायेच्या तीन लोकात जन्मत नाही.तर आधी मायेच्या तीन लोकात तो कोठून आला.ज्ञानात जेथे तेथे गायले हाच पारब्रम्ह आहे.की तुम्ही म्हणतात तो दुसरा पारब्रम्ह आहे.तुम्ही म्हणतात की तो पारब्रम्ह ज्ञानात जेथे तेथे गाईला आहे.तोच पारब्रम्ह आहे.तर आधी त्या पारब्रम्हातुन जीव मायेत कसा आला.ही सर्व विधी मला सांगा.आपण सांगता की पारब्रम्हात हंस मिळाल्यावर पुन: मायेत जन्म घेत नाही.तर हा जीव तेथून सर्व प्रथम कसा आला. ।।२४।।

हे सिष पारब्रम्ह लग जीव की ।। आदू उत्पत होय ।।
पारब्रम्ह ज्यां आनंद हे ।। उपजे खपे नही कोय ।।
उपज खपे नही कोय ।। सदा थिर रहे अे दोई ।।
पार ब्रम्ह अर आनंद को ।। भेद यांरो कहुँ तोई ।।
आनंद मिल्यो नही बावडे ।। हे सिष क्हुँ म्हे तोय ।।
पारब्रम्ह लग जीव की ।। आदू उतपत होय ।।२५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्य विठ्ठलरावाला सांगीतले की हे शिष्य

पारब्रम्ह जीव व पारब्रम्ह आनंद असे दोन पद आहेत.पारब्रम्ह जीवापासून जीवाची आधीपासून उत्पत्ती आहे व आज की उत्पत्ती आहे.पारब्रम्ह आनंदमध्ये जीवाची आधी पासुनच उत्पत्ती नव्हती व आज ही उत्पत्ती खपत नाही.हे दोन्ही पद आधी पासून आहे.तसेच स्थिर आहे अमर आहे.पारब्रम्ह जीव व पारब्रम्ह आनंदपदाच्या सुखाचा भेद वेगवेगळा आहे.पारब्रम्ह जीवात सुखानंतर दु:ख आहे व अनेक विपत्ती आहे.तसेच पारब्रम्ह आनंद पदात सुखानंतर सुख आहे व दु:ख तसेच विपत्त्या थोडी ही नाही.याकारणाने पारब्रम्ह आनंदपदात पोहचलेला जीव पारब्रम्ह जीवा सारखा मायेत खाली कधी येत नाही. ।।२५।।

पारब्रम्ह कोई लोक हे ।। ईसो सीव को होय ।।
चिदानंद कोई लोक हे ।। जिसो ई जीव को जोय ।।
जिसो जीव को जोय ।। च्यार अे लोक कहावे ।।
तां आगे आनंद ।। वार कोई पार नही पावे ।।
सुखराम क्हे सिष सांभळो ।। आ गत ज्यूं वा जोय ।।
पारब्रम्ह को लोक हे ।। इसोई सीव को होय ।।२६।।

जसे पारब्रम्हात उत्पत्ती आहे.तसेच शिवब्रम्ह,चिदानंदब्रम्ह तसेच जीवब्रम्हात उत्पत्ती आहे.याप्रकारे पारब्रम्ह,शिवब्रम्ह,चिदानंद ब्रम्ह तसेच जीवब्रम्ह हे चार जीवांची उत्पत्ती व खपतवाले लोक आहे.जीवब्रम्ह,चिदानंद ब्रम्ह,शिवब्रम्ह तसेच पारब्रम्हच्या या चार लोकांच्या पुढे आनंदचा लोक आहे.त्या आनदंपदामध्ये उत्पत्ती व खपत नाही आहे. तसेच तेथील आनंदाचा वार पार कोणाला येत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज शिष्य विठ्ठलरावाला सांगत आहे की,याप्रकारे जीवब्रम्ह,चिदानंदब्रम्ह,शिवब्रम्ह तसेच पारब्रम्ह मध्ये उत्पत्ती व खपत आहे व आनंद ब्रम्हात उत्पत्ती खपत नाही.याप्रकारे हे जीवब्रम्ह,चिदानंदब्रम्ह,शिवब्रम्ह तसेच पारब्रम्हपेक्षा आनंद ब्रम्हची गती वेगळी आहे. ।।२६।।

जीव ब्रम्ह को लोक हे ।। ज्हाँ लग सुख दु:ख लार ।।
चिदानंद के लोक मे ।। हे दु:ख अेक अपार ।।
हे दु:ख अेक अपार ।। सीव कोई ने:चळ नाही ।।
पारब्रम्ह को लोक ।। तहाँ लग ओ दु:ख माही ।।
परा आनंद मे मिल गया ।। जे नही जनमण हार ।।
जीव ब्रम्ह को लोक हे । ज्हाँ लग सुख दु:ख लार ।।२७।।

जीवब्रम्हच्या लोकात जीवाच्या मागे मायेचे सुख व काळाचे दु:ख तसेच विपत्ती मागे लागलेली राहते. जिवब्रम्ह हा अनेक दु:खाचा लोक आहे.चिदानंदचा लोक,शिवब्रम्हचा

लोक तसेच पारब्रम्हचा लोक असे हे तिन्ही लोक जीवाकरीता निश्चल राहण्याचे नाही. या तिन्ही लोकात एक पार येत नाही.असा जीवब्रम्हात जन्मणे मरण्याचे भारी दु:ख आहे.हे भारी दु:ख आनंद लोकात मिळाल्यानंतर राहत नाही.आनंदलोकात गेल्यानंतर जीवब्रम्ह मध्ये येऊन जन्मण्याची रीत राहत नाही.याप्रकारे आनंद लोक सोडून जीवब्रम्ह,चिदानंद ब्रम्ह, शिवब्रम्ह तसेच पारब्रम्ह मध्ये उत्पत्ती व खपत दु:ख आहे व जीवब्रम्ह मध्ये उत्पत्ती खपतच्या दु:खाशिवाय उच निच कर्म भोगण्याचे अपार दु:ख आहे.हे कोणतेही दु:ख आनंद लोकात नाही.उलट अपार महासुखाच्या मागे महासुख भोगण्याचा हा लोक आहे. ।।२७।।

च्यार लोक तो थिर सदा ।। अेक लोक मिट जाय ।।
इण अेकेका तीन अे ।। चवदे भवन कवाय ।।
चवदे भवन कुवाय ।। जीव का अे सब होई ।।
वां तीनाँ के माय ।। लोक तेरे क्हुं तोई ।।
आनंद लोक सुखराम के ।। ज्हाँ लोक नही माय ।
च्यार लोक तो थिर सदा ।। अेक लोक मिट जाय ।।२८।।

जीवब्रम्ह,चिदानंदब्रम्ह,शिवब्रम्ह,पारब्रम्ह तसेच आनंदब्रम्ह या पाच लोकांमधुन चिदानंद ब्रम्ह,शिवब्रम्ह,पारब्रम्ह तसेच आनंदब्रम्ह हे चार लोक स्थिर आहेत.निश्चल आहे.हे चार लोक जसे स्थिर आहेत तसे जीवब्रम्हचा लोक स्थिर नाही.हा जीव ब्रम्हचा लोक सदा मिटत असतो.हे जीव ब्रम्हाचे ३ लोक मृत्युलोक,पाताळलोक,स्वर्गलोक तसेच भुर, भुवर, स्वर, महर, जन, तप,सत,तळ,अतळ,वितळ,सुतळ,सतातळ,रसातळ,महातळ असे १४ भवन आहे.याप्रकारे चिदानंदब्रम्ह,शिवब्रम्ह,पारब्रम्ह या तिन्ही ब्रम्हामध्ये १३ लोक आहेत. महामाया,प्रकृती,ज्योती,अजर,आनंद,वजर,इखर,अनहद,निरंजन,निराकार,शिवब्रम्ह, महाशुन्य,पारब्रम्ह आहे.परंतु आनंदलोकात जीवब्रम्हचे ३ लोक १४ भवन व चिदानंद ब्रम्ह, शिवब्रम्ह,पारब्रम्हचे १३ लोकांसारखे वेगवेगळे लोक नाहीत. ।।२८।।

तीन ब्रम्ह के लोक सूं ।। अनंद लोक नही जाय ।।
जीब ब्रम्ह के लोक सूं ।। उलट मिले तां माय ।।
उलट मिले तां मांय ।। ब्होर जन्मे अे नाही ।।
तीन ब्रम्ह का लोक ।। तहाँ लग आवे जाही ।।
इण कारण सुखराम के ।। हंस आवे जग माय ।।
तीन ब्रम्ह के लोक सूं ।। अनंद लोक नही जाय ।।२९।।

पारब्रम्ह,शिवब्रम्ह तसेच चिदानंदब्रम्ह या तीन ब्रम्हाच्या लोकातून आनंदलोकात जाता येत नाही.आनंदलोकात जीवब्रम्हच्या लोकातूनच जाता येते.जीवब्रम्हच्याही स्वर्ग, पाताळ

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

तसेच १४ भवन व चार पुऱ्यांमधुन आनंदलोकात कधी ही जाता येत नाही.जीवब्रम्हचे फक्त मृत्युलोकातूनच आनंदलोकात जाता येते.जीवब्रम्हच्या मृत्युलोकातील सर्व ८४ लक्ष प्रकारच्या योनीने ही आनंद लोकात जाता येत नाही.या ८४ लक्ष प्रकारच्या योनीतून फक्त मनुष्य देहातूनच जाता येते.असे जीवब्रम्हच्या मृत्युलोकातून हंस घटातच उलटून बंकनाळच्या रस्त्याने त्रिगुटीत होऊन चिदानंद ब्रम्ह जातो,चिदानंदच्या नंतर शिवब्रम्हमध्ये जातो.शिवब्रम्हनंतर पारब्रम्हमध्ये जातो व पारब्रम्हच्या नंतर आनंदब्रम्ह मध्ये जाऊन मिळून जातो.असा आनंदब्रम्ह मध्ये मिळालेला हंस परत जीवब्रम्हच्या मायेच्या लोकात कधी ही येत नाही.परंतु पारब्रम्ह,शिवब्रम्ह तसेच चिदानंद ब्रम्हमधून जीव,जीवब्रम्ह मध्ये येतो व परत पारब्रम्ह,शिवब्रम्ह,चिदानंदब्रम्ह मध्ये जातो.परत जीवब्रम्ह मध्ये येतो असा पारब्रम्ह, शिवब्रम्ह, चिदानंदब्रम्हचे तीन लोकातून जीवब्रम्ह मध्ये जन्मून सुखा सोबत दुःख व अनेक विपत्या भोगण्या करीता जात येत असतो.तो पर्यंत जीव आनंदलोक जात नाही.तोपर्यंत जीवब्रम्हच्या लोकात येऊन दुःख भोगण्याची विधी आनंदलोक सोडून कोणताही लोक प्राप्त केला तरी मिटत नाही व या आनंदलोकात पारब्रम्ह,शिवब्रम्ह तसेच चिदानंदच्या लोकाने जाता येत नाही.फक्त जीवब्रम्हच्या लोकानेच जाता येते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज शिष्य विठ्ठलरावाला सांगत आहे. ।।२९।।

विठ्ठलराव अब आ कहे ।। उलट मिले किम जाय ।।
हंस आवण की रीत तो ।। सब ही कही बजाय ।।
सब ही कही बजाय ।। दया कर अब आ कहिये ।।
अमर लोक किम जाय ।। सब्द सुख केसे लहिये ।।
सो बिध भिन्न भिन्न तार कर ।। भेद गुंझ कहो आय ।।
विठ्ठलराव अब आ कही ।। उलट मिले किम जाय ।।३०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विठ्ठलराव बोलला की,जीव उलटून आनंद लोकात कसा जाईल हे मला सांगा.आपण पारब्रम्हातून मायेत हंसाची येण्याची रीत तर वेगवेगळ्या प्रकारे बजाऊन बजाऊन सर्वही समजावून सांगीतली.जसे आपण पारब्रम्हतुन मायेत हंसाची येण्याची रीत वेगवेगळ्या प्रकाराने बजाऊन बजाऊन समजाऊन सांगीतली तसेच अमरलोकात जाण्याची रीत बजाऊन बजाऊन समजून सांगण्याची दया माझ्यावर करा.असे अमर देशाचे सतशब्दाचे सुख घेण्यासाठी कसे पोहचायचे त्या सर्व विधी वेग वेगळ्या प्रकाराने तार तार करुन मला सांगा.जीवब्रम्हतून अमरलोक जाण्याचा गुह्य(मुख्य)भेद सांगा असे विठ्ठलराव आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगतो. ।।३०।।

सुखराम दास जन बोलीया ।। सुण ज्यो बचन हमार ।।
भ्रुगुटी सें बिंद ऊतऱ्यो ।। पड़यो ग्रभ तिण बार ।।
पड़यो गरभ तिण बार ।। प्रेम वो उलटो चहिये ।।
संख नाळ कूं त्याग ।। बंक पिछम दिस गहिये ।।
साझन कूंची बाहेरो ।। चडे सब्द संग तार ।।
सुखराम दास जन बोलीया ।। सुणियो बचन हमार ।।३१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावांना सांगीतले की माझ्या ज्ञानाचे वचन ऐक.मनुष्याचा बिंद भृगुटीतून संखनालेने उतरुन गर्भात पड्तो तेंव्हा हंसाला जे प्रेम येते तसेच प्रेम उलटून पश्चिम दिशेने बंकनाळच्या रस्त्याने त्रिगुटीमध्ये चढण्याकरीता लावतो.तेंव्हाच हंस मायेच्या लोकातून उलटून अमरलोकात जातो.या प्रेमाने वेदाच्या कोणत्याही साधणेशिवाय तसेच जोगारंभा(योगाभ्यासा शिवाय)सतशब्दाची तार लावून हंस गडावर दहाव्याद्वारी पोहचून जातो. ।।३१।।

कवत ।।

पडे. ग्रभ मे आय ।। प्रेम संग जो वो आवे ।।
फिर दूणो बरंसे हेत ।। तब उलटो होय जावे ।।
जिसी भोग की चाय ।। इसी साहेब दिस जागे ।।
जिसो नार सूं नेह ।। इसो साहेब दिस लागे ।।
सुखराम क्हे भग पेम हुवे ।। अंध कुंध तज लाज ।।
ईसो पेम सो चाहिये ।। राम मिलण के काज ।।३२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज शिष्य विठ्ठलरावाला सांगत आहे की,ज्या वेळी हंस गर्भात पडला.त्यावेळी जितक्या प्रेमाने हंस भृगुटीतुन येथे गर्भात आला होता. त्यापेक्षा दुप्पट प्रेम येईल.तेंव्हा उलटून जाणे होते.जसे वासनेच्या भोगाची चाहणा झाल्यावर पुरुषाला नारीच्या भगशी प्रेम येते.तेंव्हा त्यावेळी जाल शरम सोडून पुरुष अंधा धुंद आंधळा होऊन जातो.तसेच प्रेम शिष्याला वैराग्याच्या इच्छेने साहेब म्हणजे सतगुरुच्या सतशब्दाशी प्रेम येते व असे प्रेम आल्याने शिष्य जागाची लाज शरम सोडून अंधा धुंद आंधळा होऊन जातो.तेंव्हा शिष्याचा हंस पश्चिमच्या मार्गाने उलटून गडावर चढून रामजीशी भेटू शकतो.(रामजीला)।।३२।।

कुंडल्या ।।

पेम पेम मे फेर हे ।। सुणो पेम को न्याव ।।
च्यार पेम सो पेम व्हे ।। जब लग झूटो चाव ।।
जब लग झूटो चाव ।। पांचवो पेम कहावे ।।
वा गत तब घट होय ।। उलट हंसो तब जावे ।।

आया सोही बिध चाहिये ।। दूजी झूट उपाय ।।
पेम पेम मे फेर हे ।। सुणो पेम को न्याव ।।३३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगत आहेत की,प्रेम प्रेमात खुप फरक आहे.मी वेगवेगळे प्रेम सांगतो.कोणत्या प्रेमाची चाहणा खोटी आहे.तसेच कोणत्या प्रेमाची चाहणा खरी आहे.याचा मी तुला न्याय करुन सांगतो.नारीच्या भगाबद्दल ऐकणे, भगाचा वास घेणे,भगाला डोळ्यांनी बघणे,भगाला जीभेणे चाखणे हे चारी प्रेम खोटे आहे.पाचवे प्रेम ज्याच्यात भग रसाची रित बनते ते खरे प्रेम आहे.या भग रसाच्या रितीनेच हंस भृगुटीत उतरुन गर्भात पड्तो.याप्रकारे सतगुरुच्या सतशब्दाचे ज्ञान ऐकण्याचे प्रेम सतगुरुच्या सतशब्दाला हंसाच्या डोळ्याने पाहण्याचे प्रेम सतशब्दांच्या जगात सुवास पसरला आहे.अश्या सुवासाशी प्रेम जीभेने चाखणे हे सर्व प्रेम खोटे आहे. या प्रेमाने गडावर बंकनाळच्या रस्त्याने उलट चढण्याची गती बनत नाही. त्याकरीता पाचवे प्रेम हवे.भग रसाच्या रितीत येते वेळी जे प्रेम आले होते.तसेच शुध्द प्रेमाची गती हंसाच्या निजमनात सतशब्दाशी येते.तेंव्हाच हंस उलटून बंकनाळच्या रस्त्याने दहाव्याद्वारी पोहचतो.अन्य चारी प्रेमाचे उपाय हंसाला उलटवून गडावर चढून जाण्या करीता बेकाम आहे. खोटे आहे. ।।३३।।

चीज देख कर रीजियो ।। दिन मे सो सो बार ।।
तो पण राम न ऊतऱ्यो ।। सो तम करो बिचार ।।
सो तुम करो बिचार ।। जीभ चाख्यां नही आयो ।।
सुण सुण फूल्यो ब्होत ।। काम को मरम न पाये ।।
बासा सुं नही ऊतऱ्यो ।। नही ग्रभ के प्यार ।।
चीज देख कर फुलियो ।। दिन मे सो सो बार ।।३४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज शिष्य विठ्ठलरावला सांगत आहे की,दिवसभरात शंभर वेळा बघुन रिजून गेला तरीही बिंदु गर्भात उतरत नाही.याचा विठ्ठलराव तु विचार कर,याप्रकारे भगला जीभेने चाखल्याने भग संयोगच्या संबंधित गोष्टी ऐकल्याने तसेच भगची वास घेतल्याने कोणा कडूनही बिंदु भृगुटीतुन उतरुन कामाचे मर्म समजत नाही. यामुळे जीवाला गर्भात येण्याचे प्रेम येत नाही.याकारणाने जीव भृगुटीतुन उतरुन गर्भात येत नाही. याप्रकारे सतशब्दाचे ज्ञान दिवसभरात शंभर शंभर वेळा ऐकले. सतशब्दाला जीवाच्या ज्ञान डोळ्याने शंभर शंभर वेळा बघितले.सतशब्दाचे सुख सुवास जगात पसरला.तो दिवसातुन शंभर वेळा घेतला तरी ही रामाचे मर्म समज नाही. याकरीता हंसाला राम वरती गडावर चढणारे प्रेम येत नाही.याकारणाने घटात राम घटात होत नाही.।।३४।।

अेक भग रस रीत की ।। सुणियाँ ई जागे काम ।।
मेहेरी बदन बिचार घटा ।। चंचल व्हे सब धाम ।।
चंचल व्हे सब धाम ।। मथन से भ्रृगुटी छाड़े ।।
ओ सुण ज्यो सुध पेम ।। सिष सत्तगुरू मे गाडे ।।
विठलराव सुखराम क्हे ।। उलट चडे यूं राम ।।
अेक भग रस रीत की ।। सुणियांई जागे काम ।।३५।।

भग रसाची रीती ऐकल्याने मेहरीचे शरीर तसेच भग बघण्याने मनात भग रसाचा विचार केल्याने जीवाचे शरीर नखापासुन डोक्यांच्या शेंडी पर्यत काम कलेकरीता जागृत होते व इंद्रिय चैतन्य होतात.इंद्रिय चैतन्य झाल्याने भगरसाची मैथुनची रित केली तरच बिंदु भृगुटीला सोड्तो.जेंव्हा बिंदु भृगुटीला सोड्तो,तेंव्हा जे प्रेम येते ते खरे शुध्द प्रेम आहे. याप्रकारे सतशब्दाची सुखाची रिती ऐकल्याने निजमनात सतशब्दाच्या सुखाचा विचार केल्याने तसेच सतगुरुत सतशब्दाचे प्राप्त केलेल्या सुखामुळे सतगुरुचे फुललेले शरीराला बघुन हंसाच्या मनात सतशब्दाचे सुख प्राप्त करण्याची चाहना होते. अश्या संतांचा हंस संताचे निजमन तसेच संताचा घट नखापासून डोक्यांच्या शेंडी पर्यत सतशब्द प्राप्त करण्याकरीता जागृत होतो.चैतन्य होऊन जातो.अश्या शिष्याचा हंस चेतन झाल्यावर सतगुरुनी सांगीतलेल्या येत्या जात्या श्वासामध्ये रामस्मरण करण्याची रीत केली तर सतशब्द हंसाच्या घटात प्रगट होतो व हंस कंठकमल सोडून उलटून पश्चिमच्या दिशेने दहाव्याद्वारात रामजीच्या अखंडीत ध्वनी मध्ये चढून जातो. जसे कामाच्या रितीमध्ये जीव भृगुटी सोडून उतरन स्त्रीच्या गर्भात येतो.तसाच रामच्या रितीने हंस कंठकमल सोडून बंकनालने चढून रामजीच्या अखंडीत ध्वनीत चढून जातो. भृगुटी सोड्तांना जीवाला प्रेम कसे येते हे कसे समजावे?जीव पित्याच्या भृगुटीत राहतो. त्याला बिंदु देह असतो.त्या जीवाला खाली उतरण्याचे प्रेम होते.तेंव्हा जीव त्या पुरुषाच्या घटात असतो.त्याची भृगुटी चेतन होऊन चंचल होते.तो चेतन होऊन चंचल झालेल्या पुरुषाची भृगुटी पुर्ण पुरुषाच्या देहाला कामाकरीता जागृत करते व जेथे जिवाला उतरुन जायचे आहे.अश्या स्त्रीच्या गर्भाकरीता पुरुषाची काम वासना चेतन होते काम वासनेने भगरसाची स्त्री-पुरुषाची रित बनते व जीव भृगुटीतुन उतरुन गर्भात येतो.ही भगरसाची रित केल्यावर स्त्रीच्या उदरात बिंदु उतरतो.त्यावेळी जीवाला जे प्रेम येते ते ब्रम्हमधुन मायेत उतरण्याचे शुध्द प्रेम आहे. हे प्रेम कोणते आहे हे जीव पुरुषपासुन बिंदु उतरतो.त्या सर्वांना समजते.हेच प्रेम त्या पुरुषाना जवान होण्याच्या आधी कधी येत नाही.।।३५।।

विठलराव अब केत हे ।। ओ प्रसंग सत्त होय ।।

यं हाँ मेहेरी भग मथन हे ।। सो जाणे हे सब कोय ।।
सो जाणे सब कोय ।। भेद ऊलटण को दिजे ।।
कोण रीत लिंग भग ।। मथन केसी बिध कीजे ।।
तार तार बिध छाण के ।। कहो तीन बिध मोय ।।
विठलराव अब क्हेत हे ।। ओ प्रसंग सत्त होय ।।३६।।

विठ्ठलराव म्हणाला,हा तुम्ही दृष्टांत सांगितला तो खरा आहे,येथे स्त्रीचे भगासी मैथून आहे,हे सर्वही जाणतात,परंतु हा शब्द उलटण्याचा भेद मला द्या,या उलटण्यात लिंग कोणता व भग कोणता व मैथुन कोणत्या रीतीने करावा,याची सर्व विधी तार तार सर्व छाणून,ह्या तिन्ही विधी मला सांगा.।।३६।।

बंक नाळ सो नार हे ।। रस्ना सो भग होय ।।
मंमकार सो पेम हे ।। रंरकार लिंग जोय ।।
रंरकार लिंग जोय ।। रस ओ तां माही ।।
सोहं कहिये बिंद ।। धसे अजपे संग जाही ।।
सुखराम क्हे धस पेट मे ।। ग्रभ बंधे कहुं तोय ।।
बंक नाळ सो नार हे ।। रसना सो भग होय ।।३७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्य विठ्ठलरावाला सांगीतले की जसे विकार वासने करीता येथे स्थुल देहाची स्त्री आहे.तर वैराग्य विज्ञानाकरीता बंकनाल ही स्त्री आहे.या स्त्रीला जसे भग आहे तसे बंकनाल स्त्रीला रसना हे भग आहे.येथे पुरुषाला लिंग आहे.तर वैराग्य विज्ञानाकरीता रंरकार हे लिंग आहे.येथे जीवाला गर्भात उतरतांना पुरुषाला स्त्रीशी प्रेम असते.तर जीवाला चढतांना ममकारशी असते.जसे येथे बिंदु व बिंदुचा रस राहतो.तसे वैराग्य विज्ञानात सोहम हा बिंदु राहतो व ओअम हा रस राहतो. येथे स्त्रीच्या पोटात गर्भ कमळात बिंदु,बिंदु रसासोबत विशेष रसाद्वारे जातो.याप्रकारे वैराग्य विज्ञानात सोहम हा बिंदु ओंअम बिंदु रसा सोबत अजप्पाच्या विशेष रसा सोबत बंकनाळेत धसतो.जसे बिंदुचे स्त्रीच्या पोटात गेल्यानंतर स्त्रीच्या रजासोबत गर्भ बनतो. (घड्तो)त्याप्रकारे हंसाचे सतशब्दा सोबत दसवेद्वारात सतस्वरुपी देह बनतो. ।।३७।।

अेक पोर मे जाग कर ।। चेतन व्हे तन माय ।।
जे मथन ओ कीजिये ।। पेम धसे उर आय ।।
पेम धसे उर आय ।। उलटता बार न लागे ।।
नख चख नाड़ी रोम ।। नांव धुन सब में जागे ।।
सुखराम क्हे गुरू मेहर रे ।। ज्यूं रूतवंती भाय ।।
अेक पोर मे जाग कर ।। चेतन व्हे तन माय ।।३८।।

जसे पुरुषाला स्त्रीशी प्रेम होते.तो पुरुष रात्री एक प्रहर जागुन आपल्या शरीरात काम चेतन करतो व स्त्रीसोबत मैथुन करुन गर्भ बांधतो.त्याचप्रकारे शुध्द प्रेम हंसाच्या उरात आले तर हंसाला बंकनाळच्या रस्त्याने उलटायला वेळ लागत नाही.असे हंस बंकनाळच्या रस्त्याने उलटून दहावेद्वारात पोहचतो.तेंव्हा हंसाच्या घटात रोमा रोमात नाडी नाडीत नखापासुन डोक्याच्या शेंडी पर्यंत निजमनाची अखंडित म्हणजे बंद न होणारी ध्वनी जागृत होते.जसे ऋतुवंत स्त्रीला गर्भ राहण्याची इच्छा होते.तेंव्हा ऋतुवंत स्त्री पुरुषाची चाहणा करते व पुरुषाशी संयोग करुन गर्भ ठेवून घेते.त्याप्रकारे शिष्याला उलटून दहावेद्वारात जाण्याची प्रिती होते.तेंव्हा शिष्य सतगुरुंशी प्रिती करतो.अशी प्रिती आल्याने सतगुरु शिष्याच्या हंसाच्या घटात मेहेर करतात.अशी मेहेर झाल्यावर शिष्याचा हंस दहाव्याद्वारात गगणात अखंडित ध्वनीमध्ये सतस्वरुपात ३ पोहचतो.।।३८।।

कागल्यो लिंग असल हे ।। रसणा सो भग होय ।।
ओंऊँ सोहँ पेम रस ।। चेतन नर क्हुँ तोय ।।
चेतन नर कऊँ तोय ।। ररो जिम जीव क्हावे ।।
सोहँ कहिये बिंद ममो ।। अंछर अंस लावे ।।
सुखराम अजपे संग धसे ।। धम पेट कहुं तोय ।।
कागल्यो लिंग असल हे ।। रसना सो भग होय ।।३९।।

कागल्या म्हणजे पडजीभ ही असली लींग आहे.आणि रसना हे भग आहे.ओअम व सोहम हे प्रेम रस आहे.चेतन पुरुष आहे.आणि ररो हा जीव आहे.सोहम हे बिंदु आहे. ममो अक्षर हे अंश आणतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगतात की,हे सोहम अजप्पाच्या सोबत पोटात धसतो व नामरुपी गर्भ कंठकमलात राहतो. ।।३९।।

इण मंथन सें ऊतरे ।। पारब्रम्ह को नांव ।।
ने:अंछर आकार बिन ।। सो आवे घट गाँव ।।
सो आवे घट गाँव ।। जीव का सबफंद काटे ।।
पिछम गेल होय पीठ ।। चले अगम की बाटे ।।
जब पहूँचे सुखराम के ।। पारब्रम्ह के धाम ।।
इण मथन सुं ऊतरे ।। प्राब्रम्ह को नाम ।।४०।।

याप्रकारे मैथुन केल्याने सतस्वरुप पारब्रम्हचे ने:अक्षर नाम हंसाच्या घटात सतस्वरुप पारब्रम्हपासून उतरते.हे ने:अक्षर नाम निराकारी आहे.हे नाम ५२ अक्षरांनी लिहीले जाणारे मायावी आकारी नामापेक्षा वेगळे आहे.याला मायेच्या शब्दाच्या रुपात आकार दिला जात नाही.जसे अ,ब ह्या अक्षरांनी कागदावर आकार देता येतो.तसे ने:

अक्षरच्या ध्वनीला अ, उ ५२ अक्षरांच्या आकार सारखे कागदावर देता येत नाही.असे निजनाम हंसाच्या घटात प्रगट होते. तेंव्हा हंसाचे सर्व फंद म्हणजे आजपर्यंत झालेले सर्व कर्म व पुढे होणारे सर्व कर्म कर्म करणारे मुळ ५ आत्मा कर्म करण्यात आत्म्याला लागणारे मन हे सर्व फंद कापतो व पश्चिमच्या पाठीच्या बंकनाळच्या रस्त्याने हंसाला घेऊन चालतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगत आहे की,जेंव्हा ने: अक्षर पश्चिमच्या पाठीच्या बंकनाळच्या रस्त्याने होऊन अगमच्या रस्त्याला घेऊन जातो.तेंव्हा हंस सतस्वरुप पारब्रम्हच्या धामाला पोहचतो. ।।४०।।

**इण लिंग भग के मथन सूं ।। जीव आयो जग माय ।।**
**बिंद नाद ले ऊतऱ्यो ।। संख नाळ होय धाय ।।**
**संख नाळ होय धाय ।। अबे मथन मुख कीया ।।**
**ने:अंछर सो नाद ।। बिंद चेतन संग लीया ।।**
**बंक नाळ मही उलट के ।। अनंद लोक कूं जाय ।**
**इण लिंग भग के मथन सूं ।। जीव आयो जग माय ।।४१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी शिष्य विठ्ठलरावाला सांगीतले की जसे विकार या लिंग व भगच्या मैथुनने जीव जगात आला.तो बिंदु चेतन नादला जीवब्रम्हला घेऊन संखनाळच्या रस्त्याने गर्भात येतो.असेच हंस रामनाम शब्दाचे मंथन येत्या जात्या श्वासात मुखाने करतो.तेंव्हा मुखाने मंथन केल्याने ने:अक्षर हा नाद सतस्वरुप पारब्रम्हातुन प्रगट होतो व हंस चेतन रुपी बिंदुला सोबत घेऊन बंकनाळेने उलटतो व हंसाला आनंदलोकात घेऊन जातो. ।।४१।।

**रटणा की बिध टाळ के ।। साझन करे अनेक ।।**
**से सब हद का ख्याल हे ।। नाना बिधका देख ।।**
**नाना बिध का देख ।। प्रमपद कदे न पावे ।।**
**ने:अंछर बंक नाळ ।। पिछम को भेद न आवे ।।**
**हद बेहद मे सब थके ।। बेद भेद कल देख ।।**
**रटना की बिध टाळके ।। साजन करे अनेक ।।४२।।**

विधीने मुखाने येत्या जात्या श्वासात रामनामाचे रटन करीत नाही व वेद,भेद,लबेदची अनेक साधना करतो व परमपद पोहचणे चाहतो असे संत परमपद कधीही पोहचत नाही.रामनाम रटन केल्या शिवाय मायेचे नाना विध्यांचे अनेक साधन आहे.हे सर्व साधन हद तसेच जास्तीत जास्त बेहद पर्यंत पोहचणारे आहे.हे साधन ने:अक्षर प्रगट करत नाही. याकारणाने हंस बंकनाळच्या पश्चिमच्या रस्त्याने अगम देशात पोहचत नाही.हे वेद,भेदाच्या सर्व कला हद म्हणजे ३ लोक १४ भवन तसेच बेहद म्हणजे होनकाळ

पारब्रम्हपर्यंत पोहचतात व तेथे ह्या सर्व कला थकुन जातात.पुढे अगम पोहचत नाही. ।।४२।।

बाहिर क्रिया जाप सो ।। याँरी हद लग दोड़ ।।
बेहद पहूँचे ध्यान ओ ।। पूरब सोहँ मोड ।।
पुर्ब सोहँ मोड़ ।। पवन पीवे नर सोई ।।
वे पहुँचे बेहद ।। भंवर ज्याँ गुफाहोई ।।
सुखराम दास बेहद परे ।। अे नही पावे ठोड़ ।।
बाहेर क्रिया जाप सो ।। यांरी हद लग दोड़ ।।४३।।

हंस मनाने,देहाने,घटाच्या बाहेरची त्रिगुणी मायेची किया तसेच जप करेल तर हंस हद पर्यंत पोहचेल.हदच्या पलिकडे पोहचणार नाही.कारण त्रिगुणी मायेची दौड(धाव)हद पर्यंतच आहे.हंस घटात पुर्वेकडून सोहम म्हणजे श्वासाची साधना करेल तर हंस बेहद मध्ये जेथे भवर गुफा आहे.तेथपर्यंत पोहचेल.ही साधना श्वास पिल्यावर म्हणजे श्वासाचा आधार घेतल्याने होते.याप्रकारे घटाच्या आतील होणकाळ पारब्रम्हची सोहम जापची साधना बेहद पर्यतच पोहचते.ह्या दोन्ही साधना बेहदच्या पलिकडील अगम देशात पोहचत नाही.।।४३।।

साझन सब ही प्रहरे ।। पूरब राहा न जाय ।।
प्रेम प्रीत सूं उलट के ।। चडे पिछम दिस माय ।।
चडे. पिछम दिस माय ।। तके हद बेहद त्यागे ।।
ओ राहां न्यारो होय ।। सुणर बिर्ळा जन जागे ।।
सुखराम मोख जे पहूँच सी ।। सत्तगुरू भेटया आय ।।
साझन सब ही प्रहरे ।। पुर्ब राहा न जाय ।।४४।।

असे घटाच्या बाहेरची मायेची क्रिया जपून तसेच घटाच्या आत श्वासाच्या आधाराने पूर्व दिशेला जाण्याचे सर्व साधन त्यागुन देतो व ने:अक्षर सतगुरुशी प्रेम प्रित करतो. तर हंस घटात बंकनाळेने उलटून पश्चिम दिशेने चढून हद बेहदला पार करुन अगमच्या पदात पोहचून जातो.हा अगममध्ये पोहचण्याचा रस्ता मायेच्या साधनेपेक्षा तसेच पूर्व दिशेने भृगुटीत चढण्याच्या साधनेपेक्षा वेगळा आहे.अश्या अगमच्या देशाला ने:अक्षर प्रगट करुन देणारे सतगुरु मिळाल्यावरच पोहचतात.असे मोक्षात सतगुरुपासून ने:अक्षराचे ज्ञान ऐकून बिरलाच जागृत होतात.याप्रकारे माया व ब्रम्हच्या रस्त्यापेक्षा वेगळ्या अश्या अगमच्या रस्त्याने बिरलेच मोक्षपदाला पोहचतात. ।।४४।।

विठ्ठलराव अब बोलीया ।। किसो पेम वो होय ।।
बिन साझन जड़ हंस ओ ।। चड़े पिछम दिस जोय ।।

चड़े पिछम दिस जोय ।। पेम वो मोय बतावो ।।
किस बिध आवे माय ।। रीत सब सोझर लावो ।।
ब्हो ग्यान म्हे ढूंढियो ।। एसी सुणी न कोय ।।
विठ्ठलराव अब बोलिया ।। किसो पेम वो होय ।।४५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांशी विठ्ठलराव बोलला की,असे कोणते प्रेम आहे की ज्याच्यात जगाच्या कोणत्या साधन वा क्रिया न करता हा जड जीव पश्चिम दिशेने अगमदेश पोहचून जातो.असे जे प्रेम आहे.ते मला सांगा.ते प्रेम हंसामध्ये कसे येते.ह्या सर्व रित्या शोधुन मला सांगा.मी ही खुप शोधले आहे आणि खुप साधु संतांशी भेटलो आहे. परंतु असे प्रेमाने अगमदेशात चढण्याची विधी कोणत्या ज्ञानात सांगीतली नाही किंवा कोणत्या साधु संताने सांगीतली नाही. ।।४५।।

सुखराम क्हे जिण पेम सूं ।। हंस आयो जुग माय ।।
वोइज प्रेम सुध भाक्हे ।। व्हे रूतवंती की चाय ।।
व्हे रूतवंती की चाय ।। सत्तगुरू साचा पावे ।।
जो उनमे तत्त होय ।। पेम इण घट मे आवे ।।
नख चख आपे सोझले ।। फाड़ पीठ चड़ जाय ।
सुखराम कहे जिण पेम सूं ।। हंस आयो जग माय ।।४६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सांगीतले की,हे ज्या प्रेमाने हंस जगात आला ते प्रेम शुध्द भावाचे प्रेम आहे. हंसाला खाली येण्यात जो शुध्द भावाचे प्रेम असते.त्याच शुध्द भावाचे प्रेम अगममध्ये जाण्याच्या वेळी होते. खाली येते वेळी हे प्रेम मायावी वासनेच्या प्रति असते.तर उलटून वर जाते वेळी हे प्रेम विज्ञान वैराग्याच्या प्रति असते.दोन्ही वेळेस म्हणजे खाली येते वेळी आणि वरती जाते वेळी प्रेमाच्या सारख्यापणात आणि शुध्द भावात काही फरक राहत नाही.ऋतुवंत स्त्रीला बालकासाठी चाहणा असते.तेंव्हा ती पतीशी प्रेम करते.असेच शुध्द भावाचे प्रेम शिष्याच्या हंसाला सतगुरुपासून ने:अक्षर प्राप्त करण्याकरीता असायला हवे असे प्रेम जेंव्हा शिष्याच्या हंसाला येते.तेंव्हा कित्येक वेळा ने:अक्षर प्रगट करुन देणारे खरे सतगुरु मिळत नाही. याकरीता शिष्यामध्ये उलटून गगणात चढण्याचे प्रेम ही हवे.आणि अश्या शिष्याला खरे ने:अक्षर प्रगट करुन देणारे सतगुरु ही हवेत. जेंव्हा असे सतगुरु शिष्याला मिळतात. तेंव्हा त्या सतगुरुमध्ये जे ने:अक्षर तत्त प्रगट असते ते तेच ने:अक्षर शिष्यामध्ये शुध्द भावाच्या प्रेमाने प्रगट होऊन जाते.ते ने:अक्षर तत्त हंसाच्या साऱ्या शरीरात नखापासून डोळ्यापर्यंत आपले आपणहून पसरुन प्रगट होउन जाते आणि हंसाच्या पाठीला फाडून हंसाला गगणात घेऊन चढून जाते.असे पाठीच्या रस्त्याने चढण्याकरीता हंस ज्या

शुध्द्भावाने प्रेमाने जगात आलेला असतो.तसेच शुध्द भावाचे प्रेम असते.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगत आहे. ।।४६।।

विठलराव कहे पेम वो ।। किम आवे सिष माय ।।
सो बिध बचन उचार कहो ।। क्या करणो क्या नाय ।।
क्या करणो क्या नाय ।। दया कोणे बिध पावे ।।
धिन वो पेम बिचार ।। उलट आनंद घर जावे ।।
अपणे बस कन ओर के ।। नेक बतावो छाय ।।
विठलराव क्हे पेम वो ।। किम आवे सिष माय ।।४७।।

विठ्ठलरावाने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना विचारले की,तो शुध्द भाव व प्रेम शिष्यात कसा येईल?ती विधी मला विचार करुन सांगा.त्या प्रेमाकरीता शिष्याने काय करायला हवे आणि ते प्रेम ज्या कारणाने येणार नाही.असे काय करायला नको.हे मला सांगा.आपल्या म्हणण्याने असे प्रेम माझ्यात प्रगट झाले तरच मी अगम देशात जाईल. तर माझ्यात असे प्रेम प्रगट होण्याची प्रेमाची दया कोणत्या विधीने होईल हे मला सांगा. (उदा.धनाची दया झाली तरच मी महल बनवेल)अश्या प्रकारे प्रेमाची दया शब्दाचा प्रयोग केला आहे.विठ्ठलराव आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगत आहे की, ज्या प्रेमाने हसं उलटून आनंदघरी जातो.ते प्रेम धन्य आहे.असे धन्य प्रेम हवे.हे हंसाच्या बसमध्ये राहते वा आणखी कोणाच्या बस राहते.असे प्रेम प्राप्त करण्याचे ज्ञान विज्ञान मला कोरे कोरे सांगा.त्या ज्ञान विज्ञानात मला कोणता भ्रम राहणार नाही. असे शोधुन शोधुन सांगा ।।४७।।

सुखराम क्हे सुण पेम ओ ।। इस बिध उत्पत होय ।।
काम राम सब माँय हे ।। संगत के गुण जोय ।।
संगत के गुण जोय ।। नार गुरू असल पावे ।।
वाँहां जागे घट काम ।। नाँव उलटर वहाँ जावें ।।
ग्यान ब्रम्ह का चेत हे ।। सो बरण बतावे कोय ।
सुखराम केहे सुण पेम ओ ।। इस बिध उत्पत्त होय ।।४८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगतात की,घटात हे प्रेम कसे उत्पन्न होते.ही विधी मी तुम्हाला सांगतो.जसे काम तनात असते.तसेच रामही तनात असतो.काम म्हणजे मायेचे पाची सुख घेण्याची वासना आणि राम म्हणजे मायेचे पाच विकारांपासून मुक्त होण्याचे विज्ञान वैराग्य हे दोन्ही ही प्रत्येकाच्या तनात असतात. काम म्हणजे मायेचे सुख घेण्याची विकारी वासना आणि राम म्हणजे मायेच्या विकारापासून मुक्त होण्याचे वैराग्य यांचास गुरु कोणाची संगत करतात त्यानुसार प्रगट

होतो.चांगल्या सुंदर स्त्रीची संगत केली तर काम म्हणजे वासना जागृत होते.तर ने:अक्षर खरे सतगुंरुची संगत मिळाली तर वैराग्य म्हणजे राम जागृत होते.चांगल्या स्त्रीच्या संगाने काम म्हणजे वासना जागृत होते.ज्याच्याने बिंदुच्या सोबत हंस भृगुटीतुन निघून संखनाळच्या रस्त्याने गर्भात येतो.तसेच ने:अक्षरी सतगुरु मिळाले तर ने:अक्षरा सोबत हंस घटात उलटून जेथे विज्ञान सतस्वरुप ब्रम्हचे पद आहे तेथे पोहचतो व संत सर्व चिन्ह तेथे पोहचल्यावर विज्ञान सतस्वरुपाच्या ब्रम्हला बघतो आणि ते चिन्ह सर्व जगाचे ज्ञानी,ध्यानी,साधु,सिध्द,ऋषी,मुनी तसेच जगातील लोकांना सांगतात.असे विज्ञान देशाचे पोहचण्याचे चरीत्र कोणता ही माया ब्रम्हचा ज्ञानी,ध्यानी,ऋषी-मुनी ने वर्णन केले आहे का?हे विठ्ठलराव तुम्ही मला सांगा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाशी बोलले.।।४८।।

**ने:कामी जग पुर्ष व्हे ।। तां को कहुँ सुण ग्यान ।।**
**ओषध खुवावो पुष्ट की ।। तांबेसर कहुं आण ।।**
**तांबेसर कहुं आण ।। फेर मेहेंन्या संग राखे ।।**
**सेज रमण रस ख्याल ।। गाय समज नही भाखे ।।**
**जब वो घट भै भित व्हे ।। त्याग्यो संका मान ।।**
**ने:कामी जग पुर्ष हुवे ।। तां को कहुँ सुण ग्यान ।।४९।।**

संसारात ने:कामी पुरुष असतो.अश्या पुरुषाला स्त्री सोबत भोगाची शंका किंवा भीतीमुळे कामवासना नाहीच्या बरोबर असते.त्याच्यात कामवासना कशी जागृत करवितात .हे ज्ञानी मी तुला सांगतो.तु ऐक.अश्या मनुष्याला कामवासना जागृत होण्याकरीता पोष्टीक औषधी खाऊ घालतात(देतात).ताम्बेश्वर खाऊ घालतात.अश्या पोष्टीक औषधी तसेच ताबेश्वर खाऊ घालुन त्या ने:कामी पुरुषाला स्त्रीयांच्या सोबत ठेवतात. सेजचा स्त्री संग रसाचे खेळ दाखवितात आणि स्त्री संगामध्ये रमण्याचे वासनिक गाणे ऐकवतात.असे केल्याने ने:कामीचा स्त्री संग करण्याचा भय आणि शंका निघुन जाते आणि तो कामी पुरुषासारखा स्त्री संगामध्ये रमु लागतो.याप्रकारे माझा हंस अमरलोकात जाऊ शकणार नाही.याची शंका किंवा भिती राहते.या कारणाने शिष्याला वैराग्य विज्ञानाची चाहणा नाहीच्या बरोबर असते.अश्या शिष्याला गर्भाची यातना कशी आहे, म्हातारपणाचे दु:ख कसे आहे,८४ लक्ष योनीमध्ये दु:ख कसे आहे,काही कारण नसतांना येऊन-येऊन पडणारे दु:ख कसे आहे,जालीम काळ नरकात कसे कसे दु:ख भोगवितो,तसेच अकाली मृत्यु झाल्यावर अगतीचे दु:ख कसे आहे.तसेच अमरलोकात पोहचल्यानंतर अनोख सुख कसे आहे?तेथे जालीम काळ कसा नाही.असे होणकाळ ज्ञान तसेच अमरलोकाचे चरीत्र वेगवेगळ्या प्रकारे समजावल्याने हंस अमरलोकात

पोह्चणार नाही.ही भिती किंवा शंका शिष्याची निघुन जाते आणि अश्या शिष्यामध्ये सतगुरुचे ने:अक्षराच्या प्रति प्रेम येऊन जाते आणि शिष्य आपल्या घटात उलटून अमरदेशात पोहचून जातो. ।।४९।।

खट रागाँ को भेद सुण ।। गाया प्रगटे जोय ।।
बिन गायाँ पढबो करो ।। लाख बरस लग कोय ।।
लाख बरस लग कोय ।। राग को गुण नही जागे ।।
बिन पुंगी पढ ग्यान ।। सरप के नेक न लागे ।।
षट गुण की षट राग रे ।। गम बिन लखे न कोय ।।
षट रागाँ को भेद सुण ।। गायाँ प्रगटे जोय ।।५०।।

जगात भेरुराग,हिंडोल राग,श्रीराग,मल्हार राग,दिपक राग,तसेच पंचम राग असे सहा प्रकारचे राग आहे.या रागांना अनेक सुरांनी गायले तरच रागांचा गुण प्रगटतो.या रागांना ताल सुरांनी गायले नाही आणि असेच वाचून घेतले किंवा गाऊन घेतले.ते राग लाख वर्षापर्यंत ही वाचले राहीले किंवा गात राहीले तरी ही त्या रागांचा गुण प्रगट होत नाही. जसे पुंगी म्हणजे बिन शिवाय सापाला पुंगीनाद वाचून दाखविला तर सापाला जराही पुंगी सोबत प्रेम येत नाही.तसेच साप डौल नाच करीत नाही.म्हणजे ज्याला पुगीनाद वाजविता येतो.त्याच्याने साप डोलतो.ज्याला पुंगीनाद वाजविता येत नाही.त्यांनी पुंगी, पुंगीनाद सोडून कितीही वाजविली तरी ही नाग कधी ही डोलत नाही.याप्रकारे राग सहा प्रकारचे आहे.हे सहा प्रकारचे राग कसे वाजवावे.याचे ज्ञान ज्याने समजले आहे. त्याच्याने सहा प्रकारचे राग वाजतील तर प्रत्येक रागाचा जो गुण आहे तो गुण प्रगट होईल. ।।५०।।

षट रागाँ साथे करे ।। अेकण समचे कोय ।।
तो गुण अेक न प्रगटे ।। अेसो गिनानी जोय ।।
अेसो गिनानी जोय ।। तत्त जागे सो बाणी ।।
वे न्यारा सुण सब्द ।। भेद बिन लखे न प्राणी ।।
सुखराम दास क्हे पेम वो ।। यूं नही प्रगट होय ।।
षट रागाँ साथे करे ।। अेकण समचे कोय ।।५१।।

सहा प्रकारच्या राग गाण्याचा ताल सुर जाणत नाही.तसेच सहा ही राग बेसुरमध्ये एकसाथ(एकासोबत)करुन गातो.तर एका ही रागाचा गुण प्रगट होणार नाही.याप्रकारे जगाचे सर्व ज्ञानी आहे.हे ज्ञानी तत्तचे ज्ञान जाणत नाही आणि माया ब्रम्हच्या आधाराने तत्तचे ज्ञान ऐकतात.याकारणाने तत्तची जागृती शिष्यामध्ये होत नाही.जसे बेसूर राग गाणाऱ्याला रागाचा खरा सुर काय आहे.तसेच तो या सुरांपेक्षा वेगळा कसा

आहे हे माहीत नाही.याकारणाने राग गायल्यानेही रागाचा गुण प्रगट होत नाही.याप्रकारे माया ब्रम्हच्या ज्ञानींना तत्तचा गुण काय आहे हे माहित नाही.हे ज्ञानी तत्त माया ब्रम्हपेक्षा वेगळे कसे आहे हे जाणत नाही आणि जगात मायाब्रम्हच्या आधाराने तत्तचे गुण गातात.याकारणाने आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगत आहे की,शिष्याला सतगुरुच्या तत्तशी प्रेम प्रगट होत नाही.प्रेम प्रगट होत नाही म्हणून शिष्य पश्चिम मार्गाने चढून दहाव्याद्वारात शिष्य पश्चिम मार्ग चढून दहाव्याद्वारात ब्रम्हांडात पोहचत नाही. ।।५१।।

जे कोलू कूं फेरणो ।। तो भेरूं ले राग ।।
जो हिंडोल ज छेडीये ।। तो झूला को लाग ।।
तो झूला को लाग ।। पाहाण प्रगळे इम भाई ।।
श्री राग भरपूर ।। मेहे मल्लार ले आई ।।
दिपक दीया जोड़िया ।। पंचम गुण गअे भाग ।।
जे कोलू को फेरणो ।। तो भेरूं ले राग ।।५२।।

जर घाण्याला बैलाशिवाय आपोआप चालवायचे असेल तर भैरव राग गायला हवा. झोक्याला आपोआप हलायचे आहे.तर हिंडोल राग गायला हवा.दगडाला वितळून पाणी करायचे आहे तर श्रीराग गायला हवा. मेघातून पाऊस पाडायचा असेल तर मल्हार राग गायला हवा.दिपक लावायचा आहे तर दिपक राग गायला हवा आणि पंचम रागाचा गुण प्रगट करायचा आहे तर तो पंचम राग वाजवायला हवा.याप्रकारे शिष्याच्या घटात कुद्रतकला जागृत करायची आहे तर शिष्याला कुद्रतकलेशी प्रेम होईल असे शिष्याला प्रेम द्यायला हवे.कुद्रतकलेशी प्रेम येणार नाही असे कीतीही ज्ञान शिष्याला सांगीतले तरी ही शिष्याला ने:अक्षर तत्त करीता प्रेम येणार नाही.तसेच शिष्य सतस्वरुप पदात कधी जाणार नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलराजाला सांगीतले आहे. ।।५२।।

ज्यूं गुण न्यारो राग मे ।। युं चर्चा मे होय ।।
उलट चड़े सो रीत सुण ।। और न सुणणी कोय ।।
ओर न सुणणी कोय ।। पेम वोईस बिध लागे ।।
ज्याँ च्रचा सुध होय ।। भेळ दूजो नही सागे ।।
सुखराम क्हे सुण राजवी ।। सब बिध न्यारी जोय ।।
ज्युं गुण न्यारो राग मे ।। युं च्रचा मे होय ।।५३।।

जसे सहा रागांचे वेगवेगळे गुण आहेत.तसेच मायेचे संत,होणकाळ पारब्रम्हचे संत तसेच सतस्वरुपी संत या सर्वांचे ज्ञाना चर्चेमध्ये वेगवेगळे गुण आहे.मायेच्या संताच्या ज्ञान

चर्चेने शिष्याला मायेशी प्रेम होते आणि हंस हदपर्यंतच राहतो.होणकाळच्या संताची चर्चा ऐकल्याने शिष्याला पारब्रम्हच्या पदाशी प्रेम होते आणि हंस होणकाळ पारब्रम्हच्या बेहद पदापर्यंत पोहचतो.तसेच सतस्वरुप विज्ञानाची चर्चा ऐकल्याने शिष्याला सतस्वरुपाशी प्रेम होते आणि हंस घटात बंकनाळच्या रस्त्याने उलटून हद बेहदच्या पलिकडे सतस्वरुप पदात जातो.याकरीता प्रत्येकाने ज्या ज्ञान चर्चेने घटात उलटून गगणात चढण्याची रीत बनते.अश्या माया ब्रम्हच्या ज्ञानाची चर्चा ऐकयलाच नको. ज्याची ज्ञान चर्चा ऐकाल तसे प्रेम लागेल.माया तसेच ब्रम्हशी प्रेम लागु नये आणि सतस्वरुपाशी प्रेम लागावे अशी सतस्वरुपाची शुध्द चर्चा जेथे आहे.ती चर्चा ऐकायला हवी.तसेच सतस्वरुपाच्या चर्चेमध्ये ब्रम्ह तसेच मायेच्या ज्ञानाचा भेद बिलकुल नाही.अश्या सतस्वरुप संताकडुनच सतस्वरुपाची ज्ञान चर्चा ऐकायला हवी. आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलराव राजाला सांगत आहे की,याप्रकारे ज्ञान चर्चा माया,ब्रम्ह तसेच सतस्वरुप असे तिघांची वेगवेगळी समज आहे.जसे सहा रागापासून सहा वेगवेगळे गुण प्रगट होतात.तसेच माया ब्रम्ह तसेच सतस्वरुपाच्या भेदाने मायेचे पद,होणकाळ पद तसेच सतस्वरुप पद असे वेगवेगळे पद प्रगट होते. ।।५३।।

**जिण तिण सूं सुण राग को ।। गुण नही प्रगटे आय ।।**
**यूं चर्चा ब्हो जाग हे ।। अेकी गुण नही माय ।।**
**अेकई गुण नही मांय ।। रीज खाली उट जावे ।।**
**ज्यूं बादीगर खेल । जक्त देख कर घर घर आवे ।**
**सुखराम क्हे सुण साच वाँहां । कर दिखावे लाय ।**
**जिण तिण सूं सुण राग को । गुण नही प्रगटे आय ।।५४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावास सांगत आहे की,हे विठ्ठलराव तु ऐक ज्याच्या त्याच्या जवळ रागांला सुरतालात वाजविण्याचा गुण राहत नाही.याकरीता ज्याच्या त्याच्याजवळ रागापासुन रागाचे गुण प्रगट होत नाही.याप्रकारे सतस्वरुप केवळच्या नावावर सतस्वरुप केवलची चर्चा तर खुप ठिकाणी होते.परंतु सतस्वरुप केवलचा एक ही गुण चर्चा करणाऱ्याच्या घटात प्रगट होत नाही.याकारणाने जीवाने अश्या जागी ज्ञानाची चर्चा ऐकली तरीही त्या कैवल्याशी प्रेम त्या ऐकणाऱ्यात प्रगट होत नाही.याप्रकारे जीव कैवल्याचे ज्ञान ऐकतो आणि खाली(रीकामे)उठून घरी जातो. जसे बाजीगरचा खेळ जागो जागी होतो आणि जगाचे लोक त्या खेळाला बघुनच खुश होतात आणि आपल्या आपल्या घरी काही न कमवता परत जातात.याप्रकारे बाजीगरच्या खेळासारखे जागो जागी कैवल्यच्या नावाने कैवल्याचे ज्ञान चालते.परंतु त्या ज्ञानी संताच्या घटात कुद्रतकला जागृत राहत नाही.याकारणाने त्यांचे ज्ञान ऐकून

कोणालाही सतस्वरुपाशी प्रेम येत नाही.याकारणाने अश्या ज्ञान चर्चेने कोणी ही आपल्या घटात उलटून बंकनाळच्या रस्त्याने ब्रम्हडांत पोहचत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगत आहे की,विठ्ठलराव ऐक ज्या सतगुरु संतामध्ये खरेच कुद्रतकला जागृत असेल तर असे सतगुरु संताचे ज्ञान ऐकल्यावर शिष्याला सतस्वरुपाशी प्रेम येईल आणि तो शिष्य आपल्या घटातच उलटून बंकनाळच्या रस्त्याने दहाव्याद्वारात पोहचून जाईल.ज्या शिष्याची दहाव्याद्वारात उलटून पोहचण्याची कला ज्या सतगुरुच्या घटात तत्त आहे तोच दाखवेल. ।।५४।।

प्रेम भक्त का बाण सो ।। छोड़े बदबद आण ।।
फेर भेद की सुध लियाँ ।। जिसो राग घर जाण ।।
जिसो राग घर जाण ।। नेक कसर नही कोई ।।
जाँ प्रगटे निजनाँव ।। ओर बक बक रे सोई ।।
सुखराम क्हे सुण राजवी ।। सोई जन लेय पिछाण ।।
प्रेम भक्त का बाण सो ।। छोड़े बदबद आण ।।५५।।

असे सतगुरु प्रेम भक्तिमुळे ज्ञानाचे बाण शिष्याचे भ्रम नष्ट होण्याकरीता एका मागे एक असे खुपसे(बदबद)सोड्तात.अश्या सतगुरु जवळ सतस्वरुपाच्या भेदीची समज असते. जसे रोगीला रागेचे घर समजते.त्याचे रागाचे घर समजण्यात जरा ही कसर राहत नाही. ठिक त्याचप्रकारे सतस्वरुपी सतगुरुत प्रगट झालेल्या सतस्वरुपाला समजण्यात जराही कसर राहत नाही.या कारणाने जसे सतगुरु शिष्याचा सतस्वरुप ज्ञान समजण्यात जरासी ही कसर ठेवत नाही.या कलेने शिष्याचे सर्व भ्रम मिटून जातात आणि शिष्याचे सतस्वरुपाशी प्रेम होते आणि शिष्याच्या घटात निजनाम प्रगट होते.बाकी ठिक ठिकाणी होणारे सर्व ज्ञान बकबक आहे.म्हणजे सतस्वरुपाच्या प्रतापाविना आहे.खाली रीकामे आहे.याकरीता हे राजन जे संत सतस्वरुप कैवल्याचेच ज्ञान सांगतात.तसेच शिष्याच्या घटात कैवल्य तत्त प्रगट करुन देतात.असा संत ओळख व त्या संताच्या शरणात जा. ।।५५।।

कवत ।।

निर्भे सब्द उचार ।। प्रेम सुं बोले आई ।।
ज्हाँ जागे वो प्रेम ।। नाव नख चख के माई ।।
जे दूजो व्हे भेळ ।। कष्ट साजन कोइ लावे ।।
तो नही प्रगटे नाव ।। राग ज्यूं घर तज गावे ।।
च्रचा लिव अर रेण सो ।। अेक सूत होय जोय ।।
जब प्रगटे सुखराम क्हे ।। असल पेम क्हुं तोय ।।५६।।

हे राजन संत निर्भय देशाचे निर्भय शब्द उच्चारण करतात.तसेच ते संत तत्तशी त्यांना झालेले प्रेमाचे बोल जगाला ऐकवतात.त्यांचे ज्ञान ऐक त्यांचे ज्ञान ऐकल्याने शिष्याच्या घटात प्रेम जागृत होते.आणि त्या प्रेमाने शिष्याच्या घटात नखापासून चखापर्यंत नाम प्रगट होते.ज्या ज्ञानात माया ब्रम्हचा मेल आहे.तसेच कष्टाने साधन करण्याच्या विध्या आल्या आहेत.अश्या संताचे ज्ञान ऐकल्याने जीवात प्रेम प्रगट होत नाही आणि प्रेम प्रगट न झाल्याने शिष्याच्या घटात नखापासून चखापर्यंत निजनाम प्रगट होत नाही. या संताची गती अशी राहते.असे राग वाजविणाऱ्याने राग रागाच्या घरात न वाजविता आणि दुसऱ्याच्या घरात वाजविला तरी ही ज्या रागाने जो गुण प्रगट करायला होता तो प्रगट होत नाही.याप्रकारे संताला सतस्वरुपाचे ज्ञान नाही आणि तो संत मायेचा आणि ब्रम्हचा आधार घेऊन सतस्वरुपाचे ज्ञान शिष्याला समजवितो. परंतु समजवणाऱ्या संतामध्ये सतस्वरुप प्रगट राहत नाही.याकारणाने अश्या संताच्या समजवण्याने शिष्याला सतस्वरुपाशी प्रेम येत नाही.तसेच शिष्याला सतस्वरुपाशी प्रेम न आल्याने शिष्य आपल्या घटात बंकनाळेने उलटून अगम पोहचत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की ज्या सतगुरुची ज्ञान चर्चा लिव तसेच राहणी सतस्वरुपाची एक सुतची राहील.म्हणजे सतस्वरुपासारखी राहील,कोणत्याही प्रकारची मिसळ राहणार नाही.असे सतगुरुच्या ज्ञानाने शिष्याला सतस्वरुपाशी अस्सल(खरे) प्रेम येईल आणि त्या शिष्याच्या घटात सतनाम नखापासून तर चखापर्यंत प्रगट होते. ।।५६।।

कुंडल्या ।।

विठलराव अब बोलीया ।। कहो भेद ओ मोय ।।
लिव चरचा अर रेण सो ।। अेक कोण बिध होय ।।
अेक कोण बिध होय ।। बात तीनु अे न्यारी ।।
रेणी चरचा बात । लिव अे तीन बिचारी ।
----------||----------||
विठलराव अब बोलीया ।। कहो भेद वो मोय ।।५७।।

विठ्ठलराव आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलले की याचा भेद मला सांगा. चर्चा लीव तसेच राहणी हे तिन्ही एक कसे होईल?ह्या तिन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत.राहणी, चर्चा तसेच लीव हे तिन्ही वेगवेगळे आहे.तर हे एक कसे होतील?याचा विचार येत आहे. ।।५७।।

सुखो वाच ।।

बिन गुरू गम निंदे बंदे ।। सो मद भागी होय ।।

पेड़ डाळ फळ पात कूं ।। चाख्याँ गम नही कोय ।।
चाख्यां गम नही कोय ।। दाद दरगा नही पावे ।।
लख चोरांसी माय ।। जूण सो अंधकी जावे ।।
सुखराम ब्रम्ह अगाध हे ।। क्या गत जाणे कोय ।।
बिन गुरू निंदे बंदे ।। सो मद भागी होय ।।५८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगतात की,गुरुच्या ज्ञानाशिवाय म्हणजे सतस्वरुपाच्या समजशिवाय सतस्वरुपी गुरुची निंदा करतात.ते भाग्य हिन आहेत. (वंदन हा शब्द साखी पूर्ण करण्याकरीता प्रयोग केला गेला आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना फक्त निंदा हाच शब्द सांगायचा आहे.)झाड,फळ,फ ांदी,पान याला चाखले नाही तर तर झाड,फांदी,फळ,पानात काय गुण आहे?याची समज कोणालाही कशी येईल?याप्रकारे संतात सतस्वरुप परमात्मा आहे याचा अनुभव घेतला नाही आणि त्या संता मध्ये सतस्वरुप नाही अशी खोटीच निंदा केली.तर अश्या मनुष्याला दर्गामध्ये दाद मिळत नाही.अश्या मनुष्याला सतस्वरुप परमात्मा ८४,००,००० योनीचे उल्लु,घुबड(चमदागड)असे अंध योनीत टाकतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगत आहे की,सतस्वरुप ब्रम्ह अगाध आहे. त्याची गती कोणी ही जाणत नाही.त्याची गती फक्त तेच जाणता ज्यांच्यात सतस्वरुप ब्रम्ह प्रगट झाले आहे. ।।५८।।

त्रुगुटी तक्त न देखिया ।। काना सुण्यो न कोय ।।
ब्रम्ह देसरी गम नही ।। के मे सत्तगुरू होय ।।
के मे सत्तगुरू होय ।। प्राण की गम न काई ।।
अे जासी किण देस ।। सिष गुरू दोनू भाई ।।
सुखराम दास बातां करे ।। अगम निगम की जोय ।
त्रुगटी तक्त न देखियो ।। काना सुण्यो न कोय ।।५९।।

ज्याने घटात त्रिगुटीचा तक्त(सिंहासन)बघितला नाही. म्हणजे जो मनुष्य घटात त्रिगुटीत पोहचला नाही.तसेच कानाने ही कधी त्रिगुटी काय आहे हे ऐकले नाही. सतस्वरुप ब्रम्हच्या देशाचे जरा ही ज्ञान नाही.स्वत:च्या प्राणाची माहिती नाही.असा मनुष्य सांगतो की,मी सतगुरु आहे.अश्या मनुष्याला सतगुरु समजून शिष्य शरणात येतो तर तो शिष्य अश्या सतगुरुच्या भरवश्यावर कोणत्या देशात जाईल?आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला विचारतात की,ज्या मनुष्याने कधी त्रिगुटी तक्त(सिंहासन)बघितले नाही, सतस्वरुपाचा ब्रम्हदेश कधी बघितला नाही आणि अगम तसेच निगम असे सतस्वरुप देशाच्या पोकळ गोष्टी करतात.तर तो सतस्वरुप

आणि त्याच्या शरणात आलेला शिष्य परमपदात कसा जाईल?हे विठ्ठलराव तुम्ही विचार करा. ।।५९।।

कवत ।।

सत्तगुरू सतस्वरूप ।। सत्त सोही क्रणी माही ।।
सत्त जोग बेराग ।। सत बिन कसणी नाही ।।
सत्त सब्द सोई मांय ।। सत्त सुंई उलटर चड़ हे ।।
लागे सेज समाध ।। नरम कबहूं नही पड़ हे ।।
सुखराम दास सत्तगुरू तिके ।। निजनांव सिष मांय ।।
उलट पीठ कूं फोड़ कर ।। लेर अगम घर जाय ।।६०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विठ्ठलरावाला सतगुरु आहे हे कसे ओळखावे याची पारख सांगीतली.त्या सतगुरुची करणी पूर्णत: सतस्वरुपाची असते.त्याची योग साधना सतवैराग्य विज्ञानाची असते.त्याची सतस्वरुपा शिवाय मायेच्या क्रिया करणीनी कसनी राहत नाही.अश्या सतगुरुच्या घटात सतशब्दाच्या आधाराने बंकनाळच्या रस्त्याने उलटून सतस्वरुप ब्रम्हमध्ये चढलेला असतो.अश्या सतगुरुच्या घटात सतशब्द असतो. असा सतगुरु घटात सतशब्दाच्या आधाराने बंकनाळच्या रस्त्याने उलटून सतस्वरुप ब्रम्ह मध्ये चढलेला असतो.अश्या सतगुरुला सत परमात्म्याशी सहज समाधी अखंड्ति लागलेली असते.अश्या सतगुरुची सहज समाधी कधी नरम पड्त नाही.असा जो सतगुरु आहे तो सतस्वरुप सतगुरु आहे.अश्या सतगुरुच्या शरणात जाण्याने शिष्याला घटात निजनाम प्रगट होऊन ते निजनाम शिष्याच्या हंसाला सोबत करुन उलटतो आणि पाठ फाडून हंसाला अगम निगमच्या देशात घेऊन जातो. ।।६०।।

कुंडल्या ।।

प्रममोख यूं केत हे ।। कोई जन बिर्ळा जाय ।।
तां को अर्थ बिचार सो ।। सुणो सकळ नर आय ।।
सुणो सकळ नर आय ।। गेल आ मिले न कोई ।।
जे पावे कोई भेद ।। धारणी मुस्कल होई ।।
सुखराम दास सतस्वरूप बिन ।। अमर रहया नही काय ।।
प्रममोख इण कारणे ।। बिरळा पोहोंचे जाय ।।६१।।

या प्रकारची सतस्वरुपाची स्थिती ज्या संताची बनली आहे.तोच जे सर्व संत परममोक्ष परममोक्ष सांगतात तेथे पोहचतो अश्या परममोक्षात कोणी बिरला(एखादाच)संत पोहचतो. अश्या परममोक्षात कोणी बिरलाच संत का पोहचतो.याचा अर्थ तसेच विचार सर्व जण येऊन ऐका हा परममोक्षाचा रस्ता आधी तर मिळणे मुश्किल आहे.जर कोणाला परममोक्षाचा रस्त्याचा भेद मिळून ही गेला तरी तो भेद धारण करणे मुश्किल आहे.

असा सतस्वरुपाचा भेद धारण केल्याशिवाय कोणी ही मोक्षाला जात नाही.परममोक्षाला गेला नाही तर परत परत प्रलयात जातो,सदाकरीता अमर होत नाही.याप्रकारे हा परममोक्षाचा भेद सर्वांना मिळत नाही मिळाला तर तो धारण केला जात नाही.यामुळे परममोक्षाला विरळाच पोहचतो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला समजावत आहे. ।।६१।।

**राहा मिले पहुँचे नही ।। तिण मे फेर न सार ।।**
**नही पोहोंचे इण कारणे ।। गेल न मिले बिचार ।।**
**गेल न मिले बिचार ।। धारणी दुलभ अेसे ।।**
**बेद भेद दोऊं मुढ ।। रात दिन झूठी केसे ।।**
**सुखराम दास संसार रे ।। क्हे भेष सो बार ।।**
**युं ग्यानी पिंडत साध सो ।। मेरो करो बिचार ।।६२।।**

परममोक्षाचा रस्ता भेटून गेला आणि रस्त्याचा भेद धारण करुन घेतला तरीही परममोक्षास पोहचत नाही हे खोटे आहे.परममोक्षाचा रस्ता भेटून गेला आणि त्या रस्त्याला भेद धारण करुन घेतला तर धारण करणारा पोहचतोच पोहचतो. यात काही फेरफार नाही हे समजा. परममोक्षाचा रस्ता ही भेटून गेला तसेच भेद ही भेटून गेला यात कोणतात फेरफार नाही हे समजा.परममोक्षाचा रस्ता ही भेटून गेला तसेच भेद ही भेटून गेला तरी ही धारण करणारा पोहचला नाही याचे कारण हे आहे की रस्ता धारण करणाऱ्याला खरा परममोक्षाचा रस्ताच मिळाला नाही.त्याने परममोक्षाचा रस्ता सोडून दूसराच चुकीचा रस्ता पकडून घेतला आणि त्या रस्त्याला परममोक्षाचा रस्ता समजुन चालू लागला.याकारणाने तो रस्ता धारण करणारा परममोक्षात पोहचला नाही.याप्रकारे कोणाला परममोक्षाचा रस्ता मिळाला परंतु पोहचला नाही.याचे कारण हे आहे की,रस्ता तर खऱ्या परममोक्षाचाच मिळाला परंतु त्या रस्त्याला धारण करणे मुश्किल होते. याकरीता त्याने तो रस्ता धारण केला नाही सोडून दिला.याकारणाने तो संत परममोक्षाला पोहचला नाही.असे वेद तसेच भेदाने जो रस्ता परममोक्षाला पोहचत नाही असा परममोक्षाच्या नावाने चुकीचा रस्ता जगाला दाखवला.असे हे वेद,भेद दोन्ही मुर्ख आहे.हे दोन्ही वेद तसेच भेद त्या परममोक्षाच्या अशा चुकीच्या रस्त्याने जगाला रात्रंदिवस चालायला सांगतात.याकारणाने जो कधी परममोक्षाला नाही पोहचला अश्या चुकीच्या रस्त्याला संसाराच्या लोकांनी वेष धारींनी,ज्ञानी,पंडीतांनी,साधुंनी धारण करुन घेतले आहे.याकरीता हे संसाराचे लोक,वेषधारी,ज्ञानी,पंड्ति,साधु त्या वेद भेदाच्या चुकीच्या रस्त्यालाच परममोक्षाचा खरा रस्ता समजुन परत परत त्या रस्त्यालाच परममोक्षाचा खरा रस्ता समजून परत परत त्या रस्त्याचाच उल्लेख जगात

करतात.हे वेषधारी,ज्ञानी,पंडीत,साधू तसेच जगाचे लोक हे विचार करत नाही की वेदाचा तसेच भेदाचा परममोक्षाचा रस्ता धारण ही केला तसेच नित्य चालत ही राहिले तरी आम्ही परममोक्षाला का पोहचत नाही?याचा विचार हे सर्व करतील तरी मी जे समजावून राहीलो आहे की वेद,भेदाच्या करणीच्या रस्त्याने परममोक्षाचा रस्ता आधी पासूनच वेगळा आहे.याचा ह्या सर्व लोकांना विचार येईल. या सर्वांना परममोक्षाचा रस्ता मिळाला आणि धारण ही केले तरी ही आम्ही परममोक्षाला पोहचत नाही.याचा यांना विचार ही आला नाही.तर परममोक्षाचा खरा रस्ता आम्ही धारण केलेल्या रस्त्यापेक्षा वेगळा आहे.असे या कोणाला विचारही येणार नाही.याप्रकारे यांना ही समज आली नाही तर परममोक्ष जाण्याचा आणखी दुसरा रस्ता आहे.याचा यांना विचार ही येणार नाही.यामुळे हे सर्व लोक परममोक्षाला जाऊ शकत नाही.यामुळे हे सर्व लोक परममोक्षाला जाऊ शकत नाही.असे विठ्ठलरावाला आदि सतगुरु सुखरामजी महाराज समजावून राहीले आहे. ।।६२।।

बेद भेद की क्रणीयाँ ।। करे अनंत जुग माय ।।
मोख न पहुंतो आज लग ।। ओ अर्थ सूझे नाय ।।
ओ अर्थ सूझे नाय ।। राहा कोई न्यारो होई ।।
असंख जुग गया बीच ।। काँय नेःपूतो कोई ।।
सुखराम दास राहा चालतां ।। नगर न आवे कांय ।।
बेद भेद की करणियाँ ।। करे अनंत जुग माँय ।।६३।।

वेद भेदाच्या करण्या जगाचे लोक अनंत युगांपासुन विना कसरने करतात.तरी ही आजपर्यंत एक ही परममोक्षात पोहचला नाही पोहचत नाही.हा अर्थ वेद तसेच भेदाचा ज्ञानी,पंडीत,साधु तसेच जगातील लोकांना सुचत नाही.आता पर्यंत वेद भेदाच्या करण्या करुन कोणी ही मोक्षाला गेला नाही.तेंव्हा मोक्षचा रस्ता कोणता वेगळाच असायला हवा.याची समज वेदाचे तसेच भेदाचे ज्ञानी,पंडीत,साधु तसेच जगाच्या लोकांनी आणायला हवी.हा जीव जेंव्हापासून होणकाळ पारब्रम्ह पासुन वेद भेदाच्या देशात आला.तेंव्हापासुन आज पर्यंत असंख्य युग व्यतीत होऊन गेले तरी ही आज पर्यंत वेदाची तसेच भेदाच्या करण्या साधुन कोणी ही परममोक्षात का नाही पोहचलो. याचा या कोणालाही विचार सुचत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी, ध्यानी,साधुंना सांगत आहेत की नगरचा रस्ता चालत आहात.तरीही नगर येत नाही याचा अर्थ नगर जाण्याचा रस्ता योग्य पकडला नाही.चुकीचा पकडला यामुळे वेद भेदाच्या अनुसार परममोक्षाचा चुकीचा रस्ता पकड्डुन घेतला आणि तशी वेदाची,भेदाची करण्यावर करण्या करत आहे तरी ही परममोक्षाला पोहचत नाही.याचा अर्थ हा होतो

की परममोक्षात पोहचण्याचा रस्ता वेद भेदाच्या करणी यांचा नाही.या वेद भेदाच्या करण्यापेक्षा वेगळा दुसरा रस्ता आहे. ।।६३।।

केईक मुक्त लग पुंतिया ।। बिस्न लोक लग जाय ।।
केईक पदवी इंद्र लग ।। केइंक अढळ कहाय ।।
केइंक अढळ कहाय ।। सक्त लग पूंता जाई ।।
से प्रगट जग माँय ।। पुराण सायद मे भाई ।।
सुखराम राहा आ बेद की ।। हद बेहद लग माय ।।
केईक मुक्त लग पूंतिया ।। बिस्न लोक लग जाय ।।६४।।

वेद भेदाच्या करण्या करुन कित्येक संत विष्णुलोकाच्या चार मुक्ती पर्यंत पोहचले तर कित्येक प्रल्हादा सारखे इंद्रपदापर्यंत पोहचले.तर कित्येक ध्रृव सारखे अटल पदात पोहचले तर कित्येक शक्तीलोकापर्यंत पोहचले हे जगात प्रगट आहे.हे संत मुक्तीपद, अटलपद,इंद्रपद पोहचले याची पुराणात अनेक साक्ष आहे.याप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगत आहे की वेदाचा रस्ता हा हद बेहद पर्यंतचा आहे.सत्तलोकात पोहचण्याचा नाही हे समजा. ।।६४।।

सत्तलोक जे जावसी ।। ज्यां की आ बिध होय ।।
दसवों द्वार उघाड़ के ।। चले संत कहुं तोय ।।
चले संत क्हुँ तोय ।। ओर सुण राह न कोई ।।
नऊं गेला हद माय ।। ताय कूं सुध न होई ।।
दसवे लग सुखराम के ।। मोख पहूंतो कोय ।।
सत्तलोक जे जावसी ।। ज्याँ की आ बिध होय ।।६५।।

जे सतलोकात जातात त्यांची ही विधी होते.ते संत दहाव्येद्वार उघडून सत्तलोकात जातात.सत्तलोकात दहावेद्वार उघडून जाण्याच्या शिवाय दुसरा कोणता रस्ता ही राहत नाही.जे संत शेवटच्या वेळी(अंतीम वेळी)दोन डोळे,दोन कान,दोन नाक,एक मुख,एक लिंग,एक गुदा असे नऊ दरवाज्याने जातात.ते हदमध्ये म्हणजे तीन लोकातच राहतात ते सत्तलोकात कधी ही पोहचत नाही.या नऊ दरवाज्याने जाणाऱ्या संताला ही समज नाही की दहाव्याद्वारापर्यंत म्हणजे नऊ दरवाजाने जाणारे संत आजपर्यंत परममोक्षाला गेले आहे का?नऊ दरवाज्यातून सतलोकात आजपर्यंत कोणी पोहचला नाही.तरी हे संत जे अंतिम समयी नऊ दरवाज्याने जाण्याची साधना करत आहे ते सत्तलोकात कसे पोहचतील? ।।६५।।

म्हे सत्तगुरू हुँ आद का ।। आत्म का गुरू कवाय ।।
मेरी मेहेमा अगम हे ।। क्या जाणे जग माय ।।

क्या जाणे जग माय ।। काग बुध ग्यानी सारा ।।
जे आत्म बिन ग्यान ।। रात दिन करे बिचारा ।।
सुखराम हंस प्रमहंस व्हे ।। सो बुध चेटे नाय ।।
म्हे सत्तगुरू हुं आद का ।। आतम का गुरू क्वाय ।।६६।।

आधीपासून चार पद आहेत.
१.सतस्वरुप पद
२.होणकाळ पद
३.इच्छा मायापद
४.जीवात्मा पद

सतस्वरुप म्हणजे अखंडीत ध्वनीचे विज्ञान सतगुरुपद होणकाळ पारब्रम्ह म्हणजे ब्रम्ह पिता पद इच्छा माया माता पद
जीवात्मा म्हणजे चेतन आत्मा पुत्र वा शिष्य पद
मी सतगुरु आहे आदचा म्हणजे माझ्यात जे सतस्वरुप पद प्रगट झाले आहे ते आदिपासून सतगुरु आहे.
आतम का गुरु कवाय म्हणजे माझ्यात जे सतस्वरुप प्रगट झाले आहे ते आधीपासूनच सर्व आत्म्यांचे सतगुरु आहे.
माझी महीमा अगम आहे.क्या जाने जग माय म्हणजे माझ्यामध्ये प्रगट झालेल्या सतस्वरुपाची महीमा अगम आहे.
असे अगम महीमावाले सतस्वरुप सतगुरुला जगाचे ज्ञानी,ध्यानी काय जाणतील? जगाचे ज्ञानी,ध्यानी या सर्वांची बुध्दी कावळ्याच्या बुध्दीसारखी आहे.जसे कावळ्याला हंस परमहंसासारखे मोती खाण्याची बुध्दी राहत नाही.मेलेल्या प्राण्याचे मास खाण्याचीच राहते .याप्रकारे ज्ञानी,ध्यानींची बुध्दी आत्माज्ञाना शिवाय वेद भेदाच्या करण्या रात्रं दिवस कसुन करुन काळाच्या हातात खपण्याची राहते.असे ज्ञानी,ध्यानींना हंस परमहंसासारखे मोती खाण्याची बुध्दी चिकटते म्हणजे ब्रम्ह आत्म्याला सतस्वरुप सतगुरु सतस्वरुप करुन देतील.तसेच ब्रम्ह आत्म्याला काळापासून मुक्त करुन सतस्वरुपाच्या महासुखाच्या पदात पोहचून देतील ही बुध्दी उपजत नाही(उगत नाही).
आदि सतगुरु सुखरामजी महाराज मी आदिचा सतगुरु आहे.तसेच आत्म्याचा गुरु आहे हे स्वत:च्या हंस भावाने या मन भावाने (मनाच्या)देहाच्या भावाने नाही सांगीतले.हे घटात प्रगट झालेल्या सतस्वरुपाच्या भावाने सांगीतले हे सर्वांनी लक्षात घ्यायचे आहे. ।।६६।।

आतम का गुरू सिष्ट मे ।। ताँ सूं सन्मुख होय ।।

ताँ के सिर नही खून रेहे ।। ब्रम्ह लग कहुँ तोय ।।
ब्रम्ह लग कहुँ तोय ।। जन्म ऊंचे घर पावे ।।
बुध प्रबीण धन पूर ।। राव होय जग मे आवे ।।
सुखराम जनम फिर दोय ले ।। सुख पावे कहुँ तोय ।।
आत्म का गुरू सिष्ट मे ।। ताँ सू सनमुख होय ।।६७।।

असा आत्म्याचा गुरु जेंव्हा संसारात प्रगटतो आणि अश्या सतगुरुच्या सन्मुख कोणी जीव जातो तर अश्या हंसाच्या वरचे माया तसेच होणकाळ ब्रम्हचे कोणतेही गुन्हे या दोष राहत नाही.असा शिष्य एकाच जन्मात आनंदपदात आनंदपदाचे सुख भोगण्या–करीता जातो.कोणत्या कारणाने नाही गेला तर जास्तीत जास्त दोन जन्म मृत्युलोकात व मनुष्य देहात येतो.असा शिष्याचा पुढचा जन्म उच्च घरात होतो.तो बुध्दीने प्रविण म्हणजे तेज राहतो,धनाने भरपूर राहतो,राजासारखे अनेक सुख भोगतो.असे सुख तो शिष्य मृत्युलोकात मनुष्य देहात अधिक दोन जन्म भोगतो आणि महासुखाच्या आनंदलोकात जातो.।।६७।।

सतगुरू रूपि संतने ।। जे नही माने आय ।।
जिण सिर खून अपार हे ।। क्हेत बणे नही काय ।।
क्हेत बणे नही काय ।। करे जो निंद्या कोई ।।
तो पड़े अगत के माय ।। ताय की गत न होई ।।
सुखराम दास ओ खून रे ।। कहुं न छुटे जाय ।।
सत्तगुरू रूपी संत ने ।। जे नही माने आय ।।६८।।

आणि जो सतगुरु रुपी संताला मानत नाही.त्याच्यावर सांगता येत नाही असे अपार खुनाचे आरोप लागतात.तसेच जो अश्या सतगुरुरुपी संताची निंदा करतो तो भूत,प्रेत आदि अगतीच्या योनीत पडतो.तसेच महाप्रलयापर्यंत भयंकर भारी दुःख भोगतो.त्या दुःखाची मर्यादा राहत नाही.असे दुःख पडते आणि महाप्रलयापर्यंत या भयंकर दुःखातुन गती होऊ शकत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरुरुपी संताना न मानण्याचे आणि निंदा करण्याचे गुन्हे,दोष ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती चिदानंद ब्रम्ह,शिवब्रम्ह,पारब्रम्ह तसेच स्वतः सतस्वरुप या कोणाजवळ गेले तरी ही मिटत नाही.।।६८।।

कवत ।।

ब्रम्हा को सुण खून ।। बिस्न की च्रणा जावे ।।
सिव को खूनी होय ।। बिष्ण जूं आण मिटावे ।।
याँ तीना को खून ।। सक्त के चर्णा छूटे ।।

सक्त खून सिर होय ।। ब्रम्ह बिन परथन तूटे ।।
सुखराम दास सतस्वरूप को ।। जो खूनी जग माय ।।
सो सुण दोष न छूटसी ।। बिन सत्तगुरू कहुँ जाय ।।६९।।

जर ब्रम्हाचा गुन्हेगार असला आणि तो विष्णूच्या शरणात गेला तर ब्रम्हाचा खुन सुटून जातो आणि शंकराचा खुनी राहीला आणि विष्णूच्या शरणात गेला तर शक्ती त्याचा गुन्हा सोडविते.जर कोणी शक्तीचा गुन्हेगार असला तर तो गुन्हा होणकाळ ब्रम्हच्या शरणात गेला तर सुटून जातो.अश्या शक्तीचा गुन्हेगार शक्तीचे खाली पराक्रमवाले ब्रम्हा,विष्णू,महादेवाच्या शरणात गेला तर यांच्या शरणात जाण्याने त्याचे गुन्हे सुटत नाही.याप्रकारे होणकाळ ब्रम्हचा गुन्हा असला आणि सतस्वरुपाच्या बळाने ते गुन्हे मिटून जातात. सतस्वरुपाचे गुन्हे केले आणि तो गुन्हेगार सतस्वरुपी संताच्या शरणात गेला तर त्याचे सर्व गुन्हे मिटून जातात.परंतु सतगुरु रुपी संता सोबत गुन्हा केला तर अश्या गुन्हेगाराचे गुन्हे ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,पारब्रम्ह,सतस्वरुप या कोणाकडेही गेले तरी सुटत नाही.कारण सतगुरुरुपी संतापेक्षा वरती माया,ब्रम्ह तसचे सतस्वरुपात कोणी ही पराक्रमी नाही. ।।६९।।

जत्यां को सिष होय ।। जंगम को व्हे आई ।।
तो नही लागे दोष ।। ऊंच पदवी आ भाई ।।
जंगम गुरू कूं त्याग ।। ब्यास को ध्रम संभावे ।।
तो नही लागे दोष ।। ऊंच पदवी नर पावे ।।
सुखराम दास तज ब्यास कूं ।। सन्यासी व्हे कोय ।।
ताँ कूँ दोष न लागसी ।। सुण ग्यानी क्हुँ तोय ।।७०।।

जर यती गुरुचा शिष्य असला आणि तो यती गुरुला सोडून जंगम गुरुचा शिष्य बनून गेला तर त्याला दोष लागत नाहीकारण जंगम गुरुची पदवी यती गुरुच्या पदवीपेक्षा उंच आहे.जर कोण जंगम गुरुला सोडून व्यास गुरुचा धर्म धारण केला तर जंगम गुरुच्या शिष्याला दोष लागत नाही.कारण व्यास गुरुची पदवी जंगम गुरुच्या पदवी पेक्षा उंच आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,व्यास गुरुला त्यागुन जर संन्यासी गुरुचा शिष्य बनला तर त्याला दोष लागत नाही.कारण संन्यासी गुरुची पदवी व्यास गुरुपेक्षा उच्च आहे. ।।७०।।

कुंडल्या ।।

सन्यास क्रम कूं छोड़ रे ।। हुवे बेष्णू आण ।।
तो नही लागे क्रमरे ।। ओ पद ऊंचो जाण ।।
ओ पद ऊँचो जाण ।। बेष्णव पंथ मे आवे ।।

तो नही लागे पाप ।। सर्ब सूं ऊंचो पद पावे ।।
सुखराम सकळ पंथ त्याग कर ।। बित्त राग व्हे जाण ।।
तां कूँ दोषन सिष्ट मे ।। ओ मत्त ऊँच बखाण ।।७१।।

तर कोणी संन्यासी गुरुचे कर्मकांड त्यागून वैष्णव गुरुचा शरणा घेतो आणि वैष्णव गुरुचे क्रियाकर्म करतो तर त्याला पाप लागत नाही.कारण वैष्णव गुरुचा पंथ यतीगुरु,जंगम गुरु,व्यास गुरु,संन्यासी गुरु या गुरु पदापेक्षा उच्च आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,यती पंथ,जंगम पंथ,व्यासपंथ,संन्यासी पंथ,वैष्णव पंथ हे सर्व पंथ त्यागुन वित्तराग विज्ञानाचा धर्म धारण करतो.तर त्याला या सृष्टीत दोष किंवा पाप लागत नाही.कारण वित्तराग हा सर्व पंथांपेक्षा उंच पंथ आहे.।।७१।।

बित राग बिग्यान होय ।। इन को सिष व्हे आय ।।
जे सत्तगुरू संसार मे ।। जनम धरे जग माय ।।
जनम धरे जग माय ।। दोष ताँ कूं नही कोई ।।
ओ पद केवळ ब्रम्ह ।। ताय कूँ दुलभ जोई ।।
सुखराम दास अे गुरू किया ।। अब गुरू नही जग माय ।।
बित राग बिग्यान होय ।। इनको सिष व्हे आय ।।७२।।

जो कोणी वित्तराग विज्ञानी गुरुचा शिष्य असेल व त्याने वित्तराग विज्ञानी गुरुला त्यागुन दिले आणि सतगुरुरुपी संताच्या शरणात आला तर वित्तराग विज्ञानी शिष्यावर कोणता दोष किंवा गुन्हा राहत नाही.हे संसारात असे सतगुरुरुपी संत जन्म धारण करतात.ते स्वत: केवळ ब्रम्हच राहतात.ते सतस्वरुप आनंदपदातच राहतात.असे सतगुरुरुपी संत संसारात मिळणे दुर्लभ आहे.कोणी यतीगुरु,जंगमगुरु, व्यासगुरु, संन्यासी गुरु,वैष्णव गुरु, वित्तगुरु विज्ञानी गुरु त्यागले आणि सतस्वरुपी सतगुरुच्या शरणात आला तर त्याचे वर या कोणाचा कोणताही दोष राहत नाही.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अश्या सतस्वरुपी सतगुरुला गुरु केले आणि त्यांना सोडून दिले तर ते पाप, दोष तसेच गुन्हे मिटण्या करीता सृष्टी मध्ये दूसरा सतस्वरुपी सतगुरुपेक्षा पराक्रमी असा गुरु नाही. ।।७२।।

ओर खून सब छूटसी ।। जिण सिर ब्होत उपाय ।।
अेक न छूटे खून ओ ।। सत्तगुरू को जग माय ।।
सत्तगुरू को जग माय ।। पद ईण आगे नाही ।।
कहो कुण छोडे आण ।। ब्रम्ह लग पूंच न माही ।।
सुखराम दास ओ खून रे ।। सत्तगुरू सर्णे जाय ।।
ओर खून सब छूटसी ।। जिण सिर ब्होत उपाय ।।७३।।

दुसरे सर्व दोष सुटून जातील कारण दुसऱ्या सर्व खुनांवर खुपसे उपाय आहेत. परंतु हा सतगुरुचा गुन्हा संसारात ३ लोक १४ भवन आणि ४ पुरींमध्ये तसेच ३ ब्रम्हचे १३ लोकांमध्ये कोठे ही गेले तरी ही सुटू शकत नाही.कारण या सतस्वरुपी सतगुरुच्या पुढे कोणतेच पद नाही.स्वत: सतस्वरुप ब्रम्हला ही यांच्या करीता खुन सोडवण्याची ताकद नाही.तर दुसरा कोण सोडवेल.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की हा सतस्वरुप सतगुरुचा खुन सतगुरुच्या शरणात जाऊनच सुटेल. ।।७३।।

सत्तगुरू सत्तगुरू के दियाँ ।। सत्तगुरू व्हे न कोय ।।
ना सत्तगुरू किण अंग सूं ।। ना प्रचा कर होय ।।
ना परचा कर होय ।। सत्तगुरू असा होई ।।
तां के भ्रम रहे नही कोय । सिष निपजे सब लोई ।
सुखराम नाव सिष मे जगे । से सुण साचा होय ।।
सत्तगुरू सत्तगुरू के दियाँ ।।सत्तगुरू व्हे न कोय ।।७४।।

परंतु सतगुरु सतगुरु तोंडाने बोलल्याने कोणीही सतगुरु होऊ शकत नाही.सतगुरु कोणत्या स्वभावाने ही होत नाही.स्वभाव चांगला राहील्यानेही कोणी सतगुरु होऊ शकत नाही आणि कोणतेही पर्चे चमत्कार करणारे ही सतगुरु होऊ शकत नाही.सतगुरु तर असे असतात की,त्याच्याशी भेटताच त्या शिष्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रम राहत नाही. त्यांचे जे सर्व लोक शिष्य बनतील ते चांगले फलद्रुप होतात.सतगुरु सुखरामजी महाराज सांगातात की,ज्या सतगुरुच्या योगाने,शिष्यामध्ये नाम जागृत होते तेच खरे सतगुरु.असे सतगुरु सतगुरु तोंडाने सांगीतल्याने कोणी सतगुरु होत नाही. ।।७४।।

उत्तम चिज संसार मे ।। सुण बिरळी सी होय ।।
मधम चीज बिन पार हे ।। गिणत न आवे कोय ।।
गिणतन आवे कोय ।। ग्यान कर देखो ग्यानी ।।
मेरो ग्यान अगाध ।। समज सी बिरळा आणी ।।
सुखराम बेद मत जक्त मे ।। घर घर घट घट जोय ।।
उत्तम चीज संसार मे ।। सुण बिर्ळी सी होय ।।७५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विठ्ठलरावाला सांगतात की,उत्तम वस्तू संसारात विरळीच असते.परंतु हलकी वस्तु खुप(ज्याला पार नाही,अंत नाही)अशी राहते.त्या हलक्या वस्तु मोजल्याही जात नाही.अश्या अनगिनत असतात.याप्रकारे माझे ज्ञान अगाध आहे.माझे ज्ञान ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,इच्छा,पारब्रम्ह यांना कोणाला पार येत नाही.असे अगाध आहे.याकरीता माझ्या ज्ञानाला सर्व ज्ञानींनी न्यायाने बघायला हवे.या अगाध ज्ञानाची समज विरळ्यांच संताला असते.यामुळे माझे ज्ञान घट घट

घराघरात मिळत नाही.कोण्या विरळ्या ठोड्लाच मिळते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जसे हलक्या वस्तु अपार मिळतात.घरा घरात मिळतात.याप्रकारे वेद वेदाचे क्रिया कर्माचे ज्ञान, मत,विध्या,जगात घराघरात,घटा घटात मिळते,परंतु माझे ज्ञान विरळ्या जागी मिळते. ।।७५।।

काच कथील फिर लोहो मे ।। समजे सब सेंसार ।।
कंचन लग जग बुध हे ।। यु मत्त बेद बिचार ।।
यूं मत्त बेद बिचार ।। रतन कोई बिर्ळा जाणे ।।
ज्यूं चीजां की प्रख ।। ब्रम्ह कूं संत पिछाणे ।।
सुखराम दास हीरे परे ।। कोय न समझण हार ।।
कवडी कांच कथीर मे ।। समजे सब नर नार ।।७६।।

काच,कथील तसेच लोखंडाला सर्व जाणतात.सोने पण समजण्याची जगातील काही लोकांची बुध्दी असते.याप्रकारे वेदाचे मत समजण्याची बुध्दी जगातील काही लोकांना असते.परंतु रत्न आणि हिऱ्यापर्यंत जाणण्याची बुध्दी काही विरळ्याच लोकांना असते. याप्रकारे जसे रत्न आणि हिरा पारखण्याची बुध्दी विरळ्याच व्यक्तींमध्ये असते.अशीच होणकाळ ब्रम्हपर्यंतच्या संताना ओळखण्याची बुध्दी काही विरळ्याच लोकांमध्ये असते. परंतु रत्न आणि हिऱ्याच्या पलिकडे अमरफळ,अमृत,अमरजडी पारखण्याची बुध्दी कोणामध्ये ही राहत नाही.अश्याप्रकारे माझ्या अगाध ज्ञानाला समजणारे कोणी ही राहत नाही. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे. ।।७६।।

कवत ।।

कळ ब्रछ कहिये जोय ।। रतन चिंत्रामण होई ।।
अमर जडी संसार ।। फेर इम्रत कहुँ तोई ।।
पारस पथर होय ।। नाव जाणे नर नारी ।।
आसा करे कोय ।। चीज प्रगट अे सारी ।।
सुखराम सजीवण ग्यान रे ।। यूं मेरो जग माय ।।
प्रख बिना सब लोप दे ।। पचे बेद सूं आय ।।७७।।

कल्पवृक्ष,रत्न,चिंतामणी,अमरजडी,अमृत,पारस दगडांचे नाव सर्व जगातील स्त्री-पुरुष जाणतात आणि या वस्तुंची आशा ही करतात.ह्या वस्तु प्रगटरुपात संसारातही आहे. याप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.माझ्या जवळ अमरफळ,अमृत, अमरजडी,संजीवन जडी सारखे सदा करीता परत परत प्रलयात जाण्यापासुन काढून अमर करुन देणारे विज्ञान ज्ञान आहे.परंतु जगाच्या लोकांना परीक्षा नसल्याने माझे ज्ञान सोडून देतात आणि वेदात अमर होण्याकरीता पचतात. ।।७७।।

चोरासी का जीव ।। अनंत जाँ पार न कोई ।।
नर देहे छुछम जाण ।। भेद बिर्ळा कहुं तोई ।।
यूं बिरळा नर नार ।। होय मोख कूं जावण हारा ।।
क्रणी करे अनेक ।। ताय को अंत न पारा ।।
सुखराम कहे सुण ग्यान ओ ।। मेरो बिर्ळी ठोर ।।
ओर ग्यान घर घर फिरे ।। ज्यूं चोरासी ढोर ।।७८।।

जगात चौऱ्यांशी लाख प्रकारचे जीव अनंत ज्याच्या पार येत नाही इतके आहेत. याप्रकारे वेदांच्या करण्या करणारे अनंत आहे.८४ लाख योनीचे जीव(मनुष्य देह ८४ लाख योनीच्या गिणतीत खुप कमी सतस्वरुप संत विरळेच)त्याच्यात मनुष्य देह खुप कमी आहे.त्याच्यात सतस्वरुपाचा भेद प्राप्त केलेले संत सतगुरु विरळेच आहे. जसे ८४ लाख योनीचे जीव घराघरात आहे.त्याचप्रमाणे वेदाच्या करण्यांचा भेद धारण केलेले साधक खुप आहेत.(त्यांचा पार नाही)असे घराघरात अनंत आहेत.तसेच जसे मनुष्य मनुष्य ८४ लक्ष्य योनीच्या जीवाच्या समोर सुक्ष्म आहे.त्याप्रकारे होणकाळ पारब्रम्हचे ब्रम्हज्ञान धारण करणारे ब्रम्हज्ञानी,वेदाची साधना करणाऱ्यासमोर सुक्ष्म संख्येमध्ये आहे.याप्रकारे मोक्षाला जाणारे,सतस्वरुपाचा भेद प्राप्त केलेले सतगुरु संत विरळे आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की माझे सतज्ञान घराघरात नाही,कोणत्या विराळ्याच घरात आहे.जसे ८४ चे प्राणी घराघरात असतात.तसेच भेदाचे ज्ञान घराघरात असते.परंतु माझे सतविज्ञान ज्ञान कोणत्या विरळ्याच घरात मिळते.ते घराघरात मिळत नाही. ।।७८।।

चिंत्रामण कळ ब्रछ ।। फेर पारस कहुँ तोई ।।
यां लग समझे जक्त ।। कसणी करे जन कोई ।।
अे सुण प्रचा होय ।। निजर देखे नर नारी ।।
यूं हूण काळ लग भक्त ।। नार नर लागे प्यारी ।।
सुखराम दास फळ अमर में ।। क्युँ कर समजे लोय ।।
यूं सुण मेरा ग्यान कूं ।। बेद न जाणे कोय ।।७९।।

चिंतामणी,कल्पवृक्ष,पारस येथपर्यंतच्या वस्तुंना जग समजते.त्याचप्रमाणे होणकाळ पारब्रम्हच्या भक्तीला जग समजते.जसे या चिंतामणी,कल्पवृक्ष,पारस प्राप्त करण्या–करीता कष्ट करतात आणि प्राप्त केल्यानंतर या वस्तुंच्या गुणांना बघुन बघुन खुश होतात. असेच ब्रम्हज्ञानी संत होणकाळ पारब्रम्हची भक्ती कष्टाने करतात.होणकाळ पारब्रम्हची भक्ती प्रगट केल्याने संतामध्ये परचे चमत्काराचे गुण येतात.अश्या संताचे परचे चमत्काराचे गुण स्त्री–पुरुष डोळ्यांनी बघतात आणि स्त्री–पुरुषांना अश्या संताचे

परचे चमत्कार प्रिय ही वाटतात.जसे चिंतामणी,कल्पवृक्ष तसेच पारस जगात आहे.तसे अमरफळ ही जगात आहे.परंतु जसे चिंतामणी चिंता दूर करण्याचा,कल्पवृक्षात मनाची कल्पना पूर्ण करण्याचा,पारसमध्ये लोखंडाला सोने बनविण्याचा गुण आहे.तसे अमरफळात नाही.अमरफळात स्त्री-पुरुषांना महाप्रलयापर्यंत अमर करण्याचा गुण आहे.या अमरफळात चिंतामणी सारखे चिंता दुर करण्याचा,कल्पवृक्षासारखे मनाची कल्पना पूर्ण करण्याचा,पारस सारखे लोखंडाला सोने बनविण्याचा डोळ्यांना दिसतील असे चमत्कार नसतात.त्याच्यात स्त्री पुरुष अमर होण्याचा चमत्कार असतो.हे जगातील स्त्री-पुरुष अमर होण्याचा चमत्कार ज्या दिवशी हे स्त्री पुरुष अमर होतात.त्या दिवशी कोणाच्या नजरेने दिसत नाही.हे अमर झालेले स्त्री-पुरुषाच्या बरोबरीने स्त्री-पुरुष मरतात व पिढ्यान पिढ्या अमर झालेले स्त्री-पुरुष मरत नाही.तेंव्हा जगाचे स्त्री पुरुष समजतात की अमरफळ खालेले स्त्री-पुरुष अमरफळ खाल्यामुळे अमर झाले आहे जसे होणकाळ पारब्रम्हच्या भक्तीमध्ये जगातील स्त्री-पुरुषांच्या दृष्टीला आवडेल असे चमत्काराचे गुण येतात.परंतु सतस्वरुपी सतगुरुमध्ये नजरेत येणारे कोणते गुण येत नाही.याच्यात घटात उलटून बंकनाळच्या रस्त्याने चढून दहावेद्वार उघडून अमरलोकात जाण्याचे परचे होतात.हे परचे जो अमरलोकात जातो.त्याला होतात.इतर कोणाला समजतील असे परचे हे राहत नाही.याकरीता माझ्या अमरपदात जाणाऱ्या ज्ञानाला कोण कश्या प्रकारे समजेल. ॥७९॥

अम्र जडी अम्रफळ इम्रत ॥ ताय न जाणे लोय ॥
भोळप माँय खाय सो खावे ॥ प्रख न लेवे कोय ॥
ऐसी भक्त हमारी जग मे ॥ समझ हात नही आवे ॥
आतो बात ब्रम्ह सुंई आगे । अरथ कोण बिध लावे ।
सुखराम जक्त की बुधरे ॥ रतन पारस परखे आय ॥
चिंत्रामण कळ ब्रछ सूं ॥ आगे बुध न काय ॥८०॥

जसे चिंतामणीत चिंता दूर करण्याचा परचा आहे.कल्पवृक्षात मनाची कल्पना करण्याचा परचा आहे,पारसमध्ये लोखंडाला सोने करण्याचा परचा आहे.तसा जगाच्या स्त्री-पुरुषांना नजरेने समजेल असा परचा अमरजडी,अमरफळ,अमृतमध्ये नाही.याकरीता अमरजडी,अमरफळ अमृताला जगाचे लोक जाणत नाही.भोळ्यापणात खाऊन घेतले तर खाऊन गेले,जसे चिंतामणीने मनाची चिंता दूर होते,कल्पवृक्षाने मनाची कल्पना दूर पूर्ण होते,पारसपासून लोखंडाचे सोने बनते हे पारखुन स्त्री-पुरुष या वस्तुंना घेतात.परंतु अमरजडी,अमरफळ,अमृत खाण्याने अमर होतो हे नजरेत येईल असे पारखले जात नाही.या कारणाने अमृत,अमरफळ,अमरजडीला कोणी भोळेपणात खाऊन

घेतले तर खाऊन घेतले. पारखुन खायचे म्हटले तर खाल्ले जात नाही.अशी माझी भक्ती जगात आहे.भोळा बनुन माझ्यावर विश्वास ठेवून धारण केली तरच ही भक्ती हातात येते.याच्याने अमर होतो का ही पारखुन घेण्याची इच्छा केली तर याच्यात जगाच्या माया ब्रम्हच्या नजरेत येईल असे परचे चमत्कार राहत नाही.याकारणाने ही भक्ती ही माझी भक्ती होणकाळ पारब्रम्ह पेक्षा पुढे आहे.या भक्तीला डोळ्याने दृष्टीत येईल या विधीने धारण करता येईल?आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील ज्ञानी, ध्यानींची बुध्दी रत्न,पारस,चिंतामणी कल्पवृक्ष पर्यंतची आहे.याच्या पुढे अमरफळ, अमरजडी,अमृताला ओळखण्याची नाही.माझे तर ज्ञान होणकाळ पारब्रम्हच्या पुढचे आहे.ज्याला होणकाळ पारब्रम्हही जाणत नाही.असे आहे.तर माया तसेच होणकाळ पारब्रम्हपर्यंतचे ज्ञान बुध्दीवाले माझ्या सतस्वरुप आनंदपदाच्या ज्ञानाला कसे समजतील? असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।८०।।

कंचन लग की भक्त मे ।। सब जग समझे आय ।।
फेर पारस लग जाणसी ।। बिरळा सा जग माय ।।
सब चीजा की प्रख ।। ओर आगे लग जाणे ।।
चिंत्रामण कळ ब्रछ ।। परख केसी बिध आणे ।।
सुखराम ग्रंथ कोटाँ कथ्या ।। रूम न पावे कोय ।।
ब्रम्ह लगरी भक्त रे ।। अर्था करले जोय ।।८१।।

सोन्यापर्यंत सर्व जग जाणते म्हणजे सोन्यापर्यंतच्या वेदाच्या भक्त्या सर्व जग जाणते. जवरळे लोक सोन्याच्या पुढे पारसपर्यंत जाणतात.म्हणजे होणकाळ पारब्रम्हपर्यंतची भक्ती विरळे लोक जाणतात.सोन्याच्या पुढे पारसची पारख,पारसच्या पुढे चिंतामणी, कल्पवृक्षाची पारख सुक्ष्म लोक जाणतात.परंतु अमरजडी,अमरफळ,अमृताची परीक्षा सोने, पारस,चिंतामणी,कल्पवृक्षासारखी करता येत नाही.तर जगाचे लोक कोणत्या विधीने अमरजडी, अमृत, अमरफळाची परीक्षा करतील?आणि अमृत, अमरजडी,अमरफळाला खातील?ज्या प्रकारे जगातील लोकांना अमरजडी,अमृत,अमरफळाची परीक्षा करता येत नाही.याप्रकारे जगातील लोकांना अमरपदाच्या भक्तीची परीक्षा करता येत नाही. याकारणाने जगाचे लोक अमरपदाची भक्ती धारण करीत नाही.कोणी संताने माया ब्रम्हच्या ज्ञानाचे करोडो ग्रंथ वाचले व सांगीतले ही तरी ही अमरलोकाचा भेद एक रोम भर ही तो संत प्राप्त करणार नाही.करोडो ग्रंथ वाचल्याने होणकाळ पारब्रम्ह पर्यंतच्या भक्तीचा भेद समजून होणकाळ पारब्रम्हला प्राप्त करुन घेतो.परंतु असे ग्रंथ सांगीतल्याने सतस्वरुपाची भक्ती रोमभर ही समजत नाही.याकारणाने करोडो ग्रंथ सांगणारे संत सतस्वरुपाची भक्ती प्राप्त करु शकत नाही.।।८१।।

कुंडल्या ।।

अनंत चीज की परख हे ।। कळ ब्रछ लग कहुं तोय ।।
अेक अमर जड़ी फळ अमर की ।। किमत परख न होय ।।
किमत परख न होय ।। यूं सुण ग्यान हमारा ।।
जे माने हंस आय ।। जक्त सूं होय रेहे न्यारा ।।
सुखराम अमी रस पीवियाँ ।। मुवा सजीवण होय ।।
यूं हंस मो सूं मिलत ही ।। गिगन चड़े कहुं तोय ।।८२।।

कल्पवृक्षापर्यंत अनंत वस्तुंची परीक्षा जगात आहे.हे मी तुला सांगत आहे.परंतु एक अमरजडी अमरफळाच्या हिकमतची पारख जगात नाही.हे तु ऐक जे माझ्या सतविज्ञान ज्ञानाला मानतात.ते संत माया ब्रम्हच्या होणकाळ जगापासून वेगळे होऊन राहतात. आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,अमीरस पाजल्याने मेलेला मनुष्य सजीव होऊन जातो.याप्रकारे हंस माझ्याशी मिळाल्यावर घटात उलटून हंस बंकनाळच्या रस्त्याने गगणात पोहचून जातो आणि अमर होवून जातो. ।।८२।।

अष्ट धात का पारखू ।। जग मे ब्होता होय ।।
हीरे लग कोई पारखू ।। ज्यूं त्यूं करले जोय ।।
ज्यूं त्यूँ करले जोय ।। प्रख पारस लग होई ।।
चित्रामण कळ ब्रछ ।। तॉ हाँ लग जाणे कोई ।।
सुखराम दास अम्र जड़ी ।। अमर फळ दे कोय ।।
तो पारख नर क्यूं गहे ।। सो बिध कहिये मोय ।।८३।।

अष्टधातूची पारख करणारे पारखी जगात खुप असतात आणि हीरे तसेच पारस पर्यंतचे पारखी जगात जसे तसे ज्ञान मिळवून बनून जातात.याप्रकारे जसे जसे पारसच्या पुढे चिंतामणी,कल्पवृक्ष पर्यंतचे ज्ञान मिळून चिंतामणी,कल्पवृक्षाला जाणणारे पारखी बनुन जातात.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात अमरजडी,अमरफळ कोणी दिले तरीही घेणारा मनुष्य त्याला कसे पारखेल आणि घेईल हा भेद मला सांगा. ।।८३।।

हीरो घण सु परखिये ।। पारस संग लोहो लाय ।।
चित्रामण की परख आ ।। चित्वन करे नर आय ।।
चितवन करे नर आय ।। सर्ब की पारख होई ।।
इम्रत फळ की प्रख ।। कोण बिध कहोनी मोई ।।
सुखराम कहे यूं जक्त सूं ।। मेरी प्रखन होय ।।
ओर संत कूं प्रख ले ।। जे अरथा मे होय ।।८४।।

हिऱ्याला ऐरण्याच्यावर ठेवून घनाने मारल्याने फुटला नाही तर तो खरा हिरा आहे.असे

पारखी हिऱ्याची परीक्षा करुन घेऊन घेतो आणि पारस मिळाल्यावर त्याची परीक्षा करण्याकरीता लोखंडाला लावून लोखंड सोने झाले तर तो दगड पारसच आहे ही परीक्षा होऊन जाते.अशीच चिंतामणीची ही परीक्षा आहे.की त्याला हातात घेऊन मनात जे ही चिंतन कराल तसेच होऊन जाते.याप्रकारे या परीक्षा आहेत.परंतु अमृतफळाची परीक्षा कोणत्या विधीने होईल हे मला सांगा.कोणी म्हणेल मी अमरफळाची परीक्षा करुनच खाईल,परीक्षा केल्या शिवाय खाणार नाही.तर त्याला अमृतफळाची परीक्षा कशी होईल ?त्याची परीक्षा खाणाऱ्याकडून होणारच नाही.तसेच ती परीक्षा केल्या शिवाय खाईल तर तो अमर होणारच नाही.अश्या प्रकारे माझे विज्ञान ज्ञान आहे.जो संत परीक्षा करुन घेऊ इच्छील तर त्याच्याने परीक्षा होणार नाही आणि तो माझे ज्ञान प्राप्त करु शकणार नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जसे हिरा,पारस, चिंतामणी या वस्तुंसारखी अमरजडीची परीक्षा होत नाही.याप्रकारे अन्य संतांची परीक्षा करुन त्यांच्या कडून भेद धारण करता येतो.परंतु माझ्या सतस्वरुपाचा भेद परीक्षा करुन धारण करता येत नाही.अन्य संताच्या भेदाची समज अनेक ग्रंथात दिली आहे आणि त्या विध्या बाहय चमत्काराने समजतात ही.परंतु माझ्या जवळच्या सतस्वरुपाची विधी अमरजडीच्या परच्या सारखी नजरेन समजणारी आहे. ।।८४।।

कवत ।।

हिरे लग की भक्त ।। आतमा इंद्रि मारो ।।  
आ पारख जो होय ।। ओर कुछ नाय बिचारो ।।  
पारस लग की भक्त ।। बिष्ण लग प्रचा देवे ।।  
चिंत्रामण प्रब्रम्ह ।। सरब दु:ख मेटर लेवे ।।  
सुखराम क्हे आ भक्त रे ।। यूँ प्रख न सक्के कोय ।।  
जे अमर फळ की प्रख रे ।। तो याँ की पारख होय ।।८५।।

हिऱ्या पर्यंतची भक्ती पाची आत्मा म्हणजे पाची इंद्रिय मारुन जिंकतात ही आहे.हिऱ्या पर्यंतची भक्ती म्हणजे हिरा घनाचा मार सहन करतो आणि फुटत नाही.तसेच पाची इंद्रियांना न फुटू देता दृढ ठेवणारी हिऱ्यासारखी भक्ती आहे.कच्चा हिरा घनाच्या मारेने फुटून जातो.परंतु पक्का हिरा फुटत नाही.अशी हिऱ्यापर्यंतची भक्तीची परीक्षा आहे. यापेक्षा जास्त दुसरी कोणत्या परीक्षेची समज याच्यात नको असावी.विष्णूलोका पर्यंतची भक्ती पारस सारखी आहे.जसे पारस लोखंडाला लागताच लोखंड सोने होते हा चमत्कार होतो.असे विष्णू लोकापर्यंतच्या भक्तीमध्ये मायेचे परचे चमत्कार होतात. परब्रम्हची भक्ती चिंतामणी सारखी आहे.चिंतामणी जसे मनात चिंतण केले तसे फळ देतो आणि दु:ख मिटवतो.याप्रकारे पारब्रम्हची भक्ती मनाला आवडेल अश्या सिध्दीचे

फळ देते आणि होणकाळ पारब्रम्हमध्ये पोहचून आवागमनाचे दु:ख मिटवते.जसे या भक्तींची पारख करता येते.तसे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, सतस्वरुपाच्या भक्तीची पारख करता येत नाही.ज्याप्रकारे हिरा,पारस,चिंतामणीची परीक्षा करता येते.तसे अमरफळाची परीक्षा करता येते.तसे अमरफळाची परीक्षा करता येत होती.तर मी सांगत असलेल्या सतस्वरुपाच्या भक्तीची ही परीक्षा करता आली असती. ।।८५।।

कुंडल्यो ।।

अम्र जडी फळ अम्र सें ।। अमर हुवा जग माय ।।
इण गुण बिन गुण दूसरो ।। और न प्रगटे आय ।।
अवरन प्रगटे आय ।। सुत्त बित्त धन न पावे ।।
यूं पद सतस्वरूप ।। भूत परचा नही आवे ।।
यूं वो ग्रभ न पाछो आवसी ।। क्हे सुखदेव बजाय ।।
अमर जडी फळ अमर सूं ।। अमर हुवा जग माय ।।८६।।

अमरजडी,अमरफळ खाणारे जगात अमर होतात.मरत नाही.असा भारी गुण खाण्या–यामध्ये प्रगटतो.या गुणा शिवाय पारस,चिंतामणी सारखे धन वित्त प्राप्त होण्याचा दुसरा कोणता सामान्य गुण प्रगट होत नाही.याप्रकारे सतस्वरुपाच्या भक्तीत राक्षस, भूतांसारखे जगातील लोकांना पुत्र,धन वित्त प्राप्त करुन देण्याचे परचे चमत्कारांचे गुण प्रगटत नाही.जसे अमरजडी खाण्याने खाणारा महाप्रलयापर्यंत मरत नाही आणि न मरण्याने गर्भात येत नाही.याप्रकारे माझ्या सतस्वरुपाच्या भक्तीमध्ये सदाकरीता अमर होतो,कधी मरत नाही आणि याप्रकारे कधीही गर्भात येत नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बजाऊन बजाऊन सांगत आहे. ।।८५।।

अमर फळ जो पावसी ।। सोई सोई जाणण हार ।।
ओर न जाणे प्राणीया ।। तिल भर भेद बिचार ।।
तिल भर भेद बिचार ।। सरब पीछे जस गावे ।।
यूं अमर जग माय ।। ओर मर मर दु:ख पावे ।।
सुखराम हंस मोकूं मिल्या ।। ताँ कूं लाँगू पार ।।
अम्र फळ जो पावसी ।। सोई सोई जाणण हार ।।८७।।

अमरफळ जो खातो तोच या अमरफळाच्या गुणाला जाणतो.ज्याने अमरफळ खाल्ले नाही.असा दुसरा मनुष्य अमरफळाच्या भेदाला तिळभर ही जाणत नाही.ज्याने ज्याने अमरफळ खाल्ले नाही.असे दुसरे लोक मरुन मरुन जातात आणि खाणारा अमर राहतो,मरत नाही हे समजण्याच्या मागे(समजल्यावर)सर्व अमरफळाचे यश गातात.

।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

परंतु जेंव्हा अमरफळाचा वृक्ष सकुन गेलेला असतो.याप्रकारे समज आल्यानंतर खाऊ इच्छीत तर मिळत नाही.याप्रकारे जे हंस माझ्यात मिळतात.त्यांना मी अमर करतो आणि प्रलयात जाण्याऱ्या काळाचा देश पार करुन देतो.।।८६।।

अम्र फळ कूं प्रहरे ।। से सब मर मर जाय ।।
यूं मेरो उपदेश तज ।। जुग जुग गोता खाय ।।
जुग जुग गोता खाय ।। मुढ अब समझे नाही ।।
उलटी निंद्या ठाण ।। सरब प्रळे कू जाही ।।
बड भागी सुखराम क्हे ।। से हंस माने आय ।।
अम्र फळ कूं प्रहरे ।। से सब मर मर जाय ।।८८।।

अमरफळाला जे त्यागुन देतात ते सर्व मरुन मरुन जातात. याप्रकारे माझ्या सतस्वरुप विज्ञानाचा उपदेश जे त्यागुन देतात.ते युगायुगात गोते खातात हे ज्ञानी,ध्यानी,पंडीत ऋषी तसेच जगातील लोक मुर्ख आहे.माझ्या कैवल्य विज्ञानाला समजत नाही. उलट माझी निंदा करतात. माझी निंदा करतात म्हणजे माझ्यामध्ये सतस्वरुप प्रगट झाला आहे. त्या सतस्वरुपाची निंदा करतात.माझ्यात सतस्वरुप प्रगट झाला आहे हे न समजल्यामुळे माझी निंदा करतात.अशी निंदा केल्यामुळे निंदा करणारे प्रलयात जातात आणि काळाचे महादु:ख भोगतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी,ध्यानी, सिध्द,ऋषी,मुनी, षटदर्शनी तसेच जगातील लोकांना समजावत आहे की,तेच हंस मोठे भाग्यशाली आहे जे मी सांगत आहे.त्या सतस्वरुपाच्या भेदाची गोष्ट मानतात. ।।८७।।

कवत ।।

कही न माने कोय ।। भेद अर्था मे नाही ।।
किम तारूं जग सेंग ।। सोच मोटो मुझ माही ।।
म्हे आयो सेंसार ।। धार कारण इण सोही ।।
सत्तलोक नर नार ।। लेर जाऊं सब लोई ।।
सुखराम कहे सतस्वरूप की ।। आ अग्या मुज होय ।।
हंस हंस सब भेज दे ।। जग मे रखो मत कोय ।।८९।।

आज माझे सांगणे ज्ञानी,ध्यानी,साधु तसेच जगाचे लोक हे कोणी ही मानत नाही आणि अमरलोकात जाण्याचा भेद,वेद,शास्त्र,पुराण तसेच माया ब्रम्हचा ज्ञानींच्या ग्रंथात नाही.याकरीता हे सर्व जग जालीम काळाचे दु:ख भोगत आहे.अश्या सर्व जगाला मी कसा तारु ही मला खुप चिंता लागली आहे.मी संसारात असे मनात धारण करुन आलो होतो की हे जगातील सर्व स्त्री–पुरुष मी सतलोकात घेऊन जाऊ.परंतु असे मी करु शकत नाही आहे.सोबत सतस्वरुप परमात्म्यापासून मला सर्व हंस,हंस काळाच्या

मुखातून काढून सतस्वरुपात पाठवून द्या,मायेच्या जगात ठेवू नका ही आज्ञा ही झाली आहे.परंतु मी सर्व हंसांना अमरलोकात घेऊन जाण्याचे काम करु शकत नाही आहे. ।।८८।।

कुंडल्यो ।।

मत्त ग्यान माने नही ।। श्रुत ग्यान मे न्याव ।।
अवध ग्यान मे सूझसी ।। लाख कोस को डाव ।।
लाख कोस को डाव ।। मन प्रचे सोई कर हे ।।
आ केवळ की प्रख ।। अमर फळ खाय न मर हे ।।
सुखराम बरस बदीत हुवाँ ।। नर के उपजे भाव ।।
मत्त ग्यान माने नही ।। श्रुत ग्यान मे न्याव ।।९०।।

मतज्ञानी हा आपल्या मतात पक्का असतो.तो मतज्ञानी कोणाचे मत मानत नाही. शृतज्ञानी प्रत्येक छोटी मोठी वस्तुचा ज्ञानाने न्याय करतो.अवधी ज्ञानी लाख कोसाची गोष्ट बसल्या ठिकाणी बघतो.मनपर्चेचा ज्ञानी मनाला हवे तसे पर्चे करतो.याप्रकारे या मतज्ञानी,श्रृतज्ञानी,अवधी ज्ञानी,मनपर्चे ज्ञानी या सर्वांची पारख जगात समजेल अशी आहे.परंतु केवळ म्हणजे सतस्वरुप ज्ञानाची परीक्षा अशा प्रकारे समजेल अशी नाही. अश्या केवळ म्हणजे सतस्वरुपाच्या ज्ञानीची परीक्षा अमरफळ खाण्यासारखे आहे. अमरफळ खाणारा मरत नाही,इतर न खाणारे मरुन मरुन जातात.तेंव्हा जगातील लोकांना पारख येते व अमरफळाच्या प्रती भाव उपजतो.याप्रकारे केवळची परख आहे. आज मी कितीही समजवितो तरी ही जगाच्या लोकांना माझी पारख होत नाही.माझी पारख काही वेळ व्यतीत झाल्यावरच होईल.या व्यक्तीत झालेल्या वेळेत अनेक लोक अमरलोकात जातील.जेंव्हा जगातील लोकांना माझा पराक्रम समजेल व माझ्या प्रति भाव उपजेल.त्यावेळी जगातील सर्व हंस अमरलोकात जातील. ।।८९।।

।। इति ब्रम्हचारी विठ्ठलराव को संमाद संपूरण ।।